सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | सोमवार, ३० मार्च २०२६ | वर्ष ४ थे अंक २२ | पाने १२ | किंमत रु. ६/-
■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


**आजचा सामना**

राजस्थान वि.चेन्नई

वेळ : सायं.७ वाजता

ठिकाण : गुवाहाटी

## विचारपुष्प



हिंदू अध्यात्मावर आधारित हिंदू जीवनदृष्टीची सार्थकता, जी एका नवीन सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्थेसाठी योग्य आधार प्रदान करू शकते आणि यासाठी हिंदूंनाच पुढे येऊन नेतृत्व करावे लागेल, हेच जीवनकार्य आहे.

**- कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## महत्त्वाचे

### अमेरिकेचे ई-३ अवॉक्स विमान नष्ट; इराणचा दावा

**तेहरान** : सौदी अरब येथील हवाई तळावर केलेल्या क्षेपणास्त्राच्या माऱ्यात अमेरिकेचे ई-३ अवॉक्स हे विमान पूर्णपणे नष्ट झाल्याचा दावा इराणने रविवारी केला. या हल्ल्यात सौदी अरबमधील हवाई तळाचे नुकसान झाले. उद्ध्वस्त विमानाचे छायाचित्र त्यांनी प्रसिद्ध केले आहे. सौदी अरब येथील अमेरिकन हवाई तळावर शनिवारी क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मारा करण्यात आला. यात हवाई तळाचे नुकसान झाले तसेच, अमेरिकेचे -ई ३ अवॉक्स विमान नष्ट झाले. या हल्ल्यात १० अमेरिकन सैनिकही जखमी झाल्याची माहिती इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात आयआरजीसीने निवेदनातून दिली. या हल्ल्यासाठी सहा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि २९ धोकादायक ड्रोनचा वापर करण्यात आला. क्षेपणास्त्र हल्ल्यात अमेरिकेचे सर्वात प्रगत कमांड उद्ध्वस्त झाले आहे. विमानाचा संपूर्ण मधला भाग उडून गेला तसेच विमानात इंधन भरण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विमानाचेही नुकसान झाले. ■

### महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा इशारा

**मुंबई** : महाराष्ट्रातील हवामानात सतत बदल होत आहे. मागील काही दिवसांपासून राज्याच्या विविध भागात गारपीटासह पाऊस सुरू आहे. दोन दिवस विश्रांती घेतल्यानंतर आता पुन्हा वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने मराठवाडा आणि मध्यमहाराष्ट्रातील जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी केला. दरम्यान, गेल्या वेळच्या अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. यंदा हवामान खात्याने वर्तविलेल्या यलो ॲलर्टमुळे शेतकरी बांधव चांगलाच धास्तावलेला दिसून येत आहे.



# युद्धामुळे जागतिक ऊर्जा संकट

### 'मन की बात'मधून पंतप्रधान मोदींचे आवाहन

### अफवांवर विश्वास ठेवू नका

### एकजुटीने संकटाचा सामना करू



**◆ नवी दिल्ली, २९ मार्च**

मार्च महिना जागतिक स्तरावर अत्यंत घडामोडींचा राहिला. गेल्या काळात कोरोनामुळे संपूर्ण जगाला प्रदीर्घ काळ अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. कोरोना संकटातून बाहेर पडल्यानंतर जग नव्या सुरुवातीसह प्रगती पथावर पुढे जाईल, अशी सर्वांची अपेक्षा होती, परंतु जगाच्या विविध भागांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक ऊर्जा संकट निर्माण झाले आहे. हा काळ निश्चितच आव्हानात्मक आहे. १४० कोटी जनतेच्या सामूहिक शक्तीच्या जोरावर या कठीण परिस्थितीतून नक्कीच यशस्वीपणे बाहेर पडू, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमातून व्यक्त केला.

मध्यपूर्वेतील संघर्षामुळे कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचे संकट निर्माण झाले आहे. कठीण प्रसंगात अफवांवर विश्वास न ठेवता संयमाने आणि एकजूटतेने आपण सर्वजण परिस्थितीवर मात करू, असे मोदी यांनी रविवारी 'मन की बात' या मासिक रेडिओ कार्यक्रमाच्या १३२ व्या भागाला संबोधित करताना स्पष्ट केले. ज्या भागात युद्ध सुरू आहे, ते आपल्या ऊर्जा गरजांचे मुख्य केंद्र आहे. आव्हानानंतरही भारताची स्थिती मजबूत आहे. जागतिक संबंध, विविध देशांचे सहकार्य आणि गेल्या दशकात देशाने निर्माण केलेली क्षमता यामुळे भारत या आव्हानांचा खंबीरपणे सामना करत आहे. लाखो भारतीय कुटुंबांचे नातेवाईक आखाती देशांमध्ये राहतात आणि काम करतात. तेथे उपस्थित असलेल्या एक कोटींपेक्षा अधिक सर्व प्रकारची मदत पुरवल्याबद्दल मी या देशांचा मनापासून आभारी आहे.

> **चुकीची माहितीमुळे राष्ट्रीय हिताला हानी**
>
> **सामूहिक जबाबदारीचे आवाहन करताना मोदी म्हणाले, नागरिकांना एकजूट राहण्याची ही वेळ आहे. चुकीची माहिती राष्ट्रीय हिताला हानी पोहोचवू शकते. येथे स्वार्थी राजकारणाला स्थान नाही. जे अफवा पसरवत आहेत ते देशाला मोठे नुकसान पोहोचवत आहेत. त्यामुळे, मी सर्वांना सतर्क राहण्याचे आवाहन करतो.** ■

**गुलमर्गला मिळाली नवी ओळख**

पंतप्रधानांनी हस्तलिखितांची माहिती गोळा करण्यासाठी ज्ञान भारतम् सर्वेक्षणाबद्दल माहिती दिली. भारतीय क्रिकेट संघाने टी-२० विश्वचषकात मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाचे मोदींनी कौतुक केले. गुलमर्ग आता क्रीडा स्पर्धांचे केंद्र बनत असल्याचे ते म्हणाले.

**'माय भारत'चे राष्ट्र उभारणीत योगदान**

'माय भारत' ही संस्था तरुण पिढीला सकारात्मक उपक्रमांमध्ये गुंतवून राष्ट्रउभारणीत सक्रिय भूमिका बजावत आहे. 'माय भारत'ने आयोजित केलेल्या बजेट क्वेस्टचे उदाहरण देताना नरेंद्र मोदी म्हणाले, तरुणांना अर्थसंकल्पीय प्रक्रिया आणि धोरणनिर्मितीशी जोडणे हा त्याचा उद्देश होता. ◀(वृत्तसंस्था)

# राज्याच्या तिजोरीतील महसुलात घट

### नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाला उद्दिष्टपूर्ती साधण्यात अपयश

### युद्ध, मंदी, गैरव्यवहार, दिरंगाईमुळे महसुलावर परिणाम झाल्याचे तज्ज्ञांचे मत



**विनय पुराणिक**

**◆ पुणे, २९ मार्च**

नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाला चालू आर्थिक वर्षात (२०२५-२६) उद्दिष्टपूर्ती साधण्यात अपयश आले. मुद्रांक शुल्क विभागात झालेली गैरव्यवहार, चुकीची दस्त नोंदणी, प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे, वसुलीसाठी होणारा विलंब, बांधकाम क्षेत्रातील मंदी आणि आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम खरेदी-विक्री व्यवहारांवर झाल्याची कारणे बांधकाम तज्ज्ञांकडून दिली जात आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर या महानगरांमधील खरेदी-विक्री व्यवहारांत सात टक्क्यांची घट नोंदविण्यात आली आहे.

वस्तू व सेवा करानंतर राज्याला सर्वाधिक महसूल मिळवून देण्यात नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाचा क्रमांक लागतो. जमीन, सदनिका, दुकाने आदींची खरेदी-विक्री, दोन व्यक्ती किंवा संस्थांमध्ये होणारे करार, बक्षीसपत्र, ऑनलाईन भाडेकरार अशा विविध दस्तांची नोंदणी करताना मुद्रांक शुल्क भरावे लागते. यातून नोंदणी विभागाला हा महसूल प्राप्त होत असून, दरवर्षी वाढत्या गृह खरेदीमुळे राज्य सरकारने नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाला ६३,५०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट दिले. मात्र, उद्दीष्टपूर्ती करताना मुद्रांक शुल्क विभागाची दमछाक झाली असून, फेब्रुवारी अखेरपर्यंत केवळ ५३,८९३ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे. आर्थिक वर्ष संपण्यासाठी अवघे दोन दिवस राहिल्याने मार्च अखेरपर्यंत ५८ ते ६० हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट साध्य होईल, असा अंदाज नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत असला, तरी साडेतीन हजार कोटी महसूल कमी मिळणार असल्याचे दिसून येते.

तुकडेबंदी, गावठाणांच्या हद्दीतील २०० मीटर (शेवटच्या पानावर ▶

**तीन वर्षांचा आढावा**

| आर्थिक वर्ष | उद्दिष्ट | प्राप्त महसूल | टक्के |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | ५० हजार कोटी | ५० हजार ४२ कोटी | १०० टक्के |
| २०२४-२५ | ५५ हजार कोटी | ५८ हजार २६६ कोटी | १०६ टक्के |
| २०२५-२०२६ | ६३ हजार ५०० कोटी | अंदाजे ६० हजार कोटी | ९६ टक्के |

> मुळातच शासनाच्या मुद्रांक शुल्क विभागाला उद्दिष्टपूर्ती नसावी. युद्धाच्या पृष्ठभूमीवर हळूहळू परिणाम जाणवतो आहे. मात्र, गेल्या वर्षभरात मोठ्या प्रमाणात चुकीची दस्त नोंदणी आणि गैरव्यवहार झाल्याने महसुलावर परिणाम झाल्याचे जाणवते. यंत्रणेतील तांत्रिक बिघाड, नादुरुस्ती आणि वसुली अथवा लिलाव पद्धतीत मालमत्तांवर टाच आणताना होणारा विलंब, रखडलेली प्रक्रिया यामुळे महसुलावर परिणाम होत आहे.
>
> **- श्रीकांत जोशी**
> सल्लागार, अवधूत लॉ फाऊंडेशन

> वाढती महागाई आणि बाजारपेठांमध्ये निर्माण झालेली अनिश्चितता यामुळे बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मंदीचे सावट आहे. खरेदी-विक्री व्यवहारांवर मोठी घट झाली आहे.
>
> **- कपिल गांधी,** सल्लागार, क्रेडाई

> मागील दोन आर्थिक वर्षांच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात सर्वाधिक उद्दिष्ट देण्यात आले आहे. पुढील दोन दिवसांत ६० हजार कोटी रुपयांपर्यंत महसूल प्राप्त होण्याचा अंदाज आहे.
>
> **- रवींद्र बिनवडे**
> महानिरीक्षक, नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभाग

# युद्धामुळे अर्थव्यवस्थेचा वेग मंदावला

### अर्थ मंत्रालयाचा अहवाल

**◆ नवी दिल्ली, २९ मार्च**

मध्यपूर्वेतील संघर्षामुळे कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठा साखळीत आलेला व्यत्यय, जागतिक बाजारात वाढलेले दर आणि उत्पादन खर्चात झालेल्या वाढीमुळे मार्च महिन्यात अर्थव्यवस्थेचा वेग मंदावला आहे. पर्यायाने आगामी काळात महागाई वाढण्याची शक्यता अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाने प्रसिद्ध केलेल्या मासिक आर्थिक आढावा अहवालातून वर्तवण्यात आली.

इराणविरुद्ध सुरू असलेल्या युद्धामुळे होर्मुझ सामुद्रीधुनीतून होणारी आयात-निर्यात कमी झाली आहे. आखाती देशांना भारतातून होणारी अन्नधान्य आणि इतर वस्तूंच्या आयातीने मार्च महिन्यांत नीच्चांक गाठला आहे. पश्चिम आशिया प्रदेशासोबत होणारा व्यापार, गुंतवणूक आणि देशांतर्गत परकीय चलनात मार्च महिन्यात घट झाली. भारताच्या प्रमुख तेल आयातदार देशातील परिस्थितीने व्यापार अतिशय गुंतागुंतीचा आणि जोखमीचा झाला असून, याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीवर होत आहे. आर्थिक आढावा अहवालात पश्चिम आशियातील संघर्षामुळे भारतासमोर निर्माण होणाऱ्या विविध स्थूल-आर्थिक आणि क्षेत्रीय समस्यांवर प्रकाश टाकण्यात आला. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर चढेच राहिल्यास आगामी काळात देशात महागाई वाढण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी २०२६ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था खूप मजबूत स्थितीत होती. देशांतर्गत मागणी, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि सरकारी धोरणांच्या मदतीने पुरवठा आणि मागणी या दोन्ही आघाड्यांवर कामगिरी चांगली राहिली होती असेही स्पष्ट करण्यात आले. ◀(वृत्तसंस्था)

## सुकमात माओवाद्याचा खात्मा

**◆ सुकमा, २९ मार्च**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात रविवारी झडलेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी माओवाद्याचा खात्मा केला. मुचाकी कैलाश असे त्याचे नाव असून, त्याच्या शिरावर पाच लाख रुपयांचे बक्षीस होते.

पोचमपल्ली पोलिस ठाण्यात माओवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर जिल्हा राखीव रक्षक दलाने अभियान राबवले. त्यावेळी ही चकमक झडली. यात मुचाकीला ठार करण्यात आले. तो प्लॅटून क्रमांक ३१ चा सेक्शन कमांडर होता. ■

# रूपाली चाकणकरांना एसआयटीचे समन्स

**◆ मुंबई, २९ मार्च**

अशोक खरातची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रूपाली चाकणकर यांना समन्स बजावला. यामुळे चाकणकर यांच्यावर चौकशी आणि यानंतर अटकेची टांगती तलवार उभी आहे.



अशोक खरातशी असणाऱ्या कथित संबंधांवरून रूपाली चाकणकरांना प्रथम राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद आणि नंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदावरून राजीनामा द्यावा लागला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली ठोंबरे पाटील यांनी या प्रकरणी नाशिकच्या पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेऊन रूपाली चाकणकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. त्यांना सहआरोपी करण्याची मागणी केली होती.

**अशोक खरातला १ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी**

नाशिक येथील एका विशेष न्यायालयाने रविवारी अशोक खरातची १ तारखेपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली. यामुळे पोलिसांना या बहुचर्चित प्रकरणाच्या आणखी मुळाशी जाण्याची संधी मिळाली आहे. दरम्यान, पोलिसांनी खरातच्या ३०० चित्रफिती जप्त केल्या आहेत. ◀(वृत्तसंस्था)

## ९४ हजार टन एलपीजी भारतात येणार

**◆ नवी दिल्ली, २९ मार्च**

इराणने पुकारलेल्या संभाव्य नाकेबंदीच्या धास्तीत अडकलेले भारतीय ध्वज असलेले दोन एलपीजी जहाज 'स्टेट ऑफ होर्मुझ'मधून निघाले आहे. ते भारताच्या दिशेने रवाना झाले आहेत. पेट्रोलियम मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, या जहाजांच्या सुरक्षित प्रवासामुळे देशातील गॅस पुरवठ्यावरील संकट टळण्यास मदत होणार आहे.

बीडब्ल्यू टीवायआर आणि बीडब्ल्यू ईएलएम ही दोन महाकाय जहाजे सुमारे ९४,००० टन लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस (एलपीजी) घेऊन येत आहेत. यापैकी बीडब्ल्यू टीवायआर हे जहाज मुंबईच्या वेशीवर पोहोचले असून ३१ मार्चपर्यंत ते बंदरात दाखल होईल. तर, बीडब्ल्यू ईएलएम हे जहाज न्यू मंगळूरच्या दिशेने मार्गस्थ झाले असून ते १ एप्रिलपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. इराणने केवळ शत्रूत्व नसलेल्या जहाजांनाच या मार्गावरून जाण्याची परवानगी दिली आहे. ◀(वृत्तसंस्था)



## जल्लोष डबल महाराष्ट्र केसरीचा...

सोलापूर : कोल्हापूरच्या अमृता पुजारीने दुसऱ्यांदा महिला महाराष्ट्र केसरीचा मान मिळविल्यांनतर ह.दे. प्रशालेच्या मैदानावर तिला कुस्तीप्रेमींनी खांद्यावर उचलून जल्लोष केला. (छायाचित्र : केवल तिवारी) (सविस्तर वृत्त पान ८ वर...)




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### वाघाची विषप्रयोग करून शिकार; पाच जणांना अटक

**भोपाळ** :मध्यप्रदेशातील सातपुडा व्याघ्र प्रकल्पाजवळ एका रेडीओ-कॉलर लावलेल्या वाघाला विष देऊन ठार मारल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली. त्यांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. वाघाने त्यांच्या गुरांचा फडशा पाडल्यामुळे या आरोपींनी भक्ष्यात विष मिसळले असल्याचा आरोप आहे. हे आरोपी अफूच्या बेकायदेशीर लागवडीतही सहभागी आहेत, अशी माहिती सातपुडा व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालिका राखी नंदा यांनी शनिवारी दिली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी पश्चिम छिंदवाडा वनविभागाच्या हद्दीत एका खड्ड्यात पुरलेल्या अवस्थेत वाघाचा मृतदेह आढळला. या वाघाला डिसेंबर २००४ मध्ये उमरिया येथील बांधवगड व्याघ्र प्रकल्पातून येथे आणण्यात आले होते.

### डॉ. विजयपत सिंघानियांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**मुंबई** : भारताच्या उद्योग जगतातील प्रभावशाली व्यक्तिमत्व असणारे पद्मभूषण एयर कमांडर डॉ. विजयपत कैलाशपत सिंघानिया यांचे शनिवारी निधन झाले. त्यांच्यावर रविवारी दुपारी तीन वाजता शासकीय इतमामात चंदनवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी कुटुंबीय आणि नातेवाईक उपस्थित होते. विजयपत सिंघानिया हे फक्त यशस्वी व्यावसायिकच नव्हे, तर धाडसी वैमानिकही होते. त्यांच्या नेतृत्वाखाली रेमंड ग्रुपने भारतासह जागतिक बाजारपेठेत वर्चस्व प्रस्थापित केले. त्यांच्या या कर्तृत्वामुळे संपूर्ण जगात भारताचे नाव झाले. त्यांच्या निधनाने भारतीय उद्योगसृष्टीची मोठी हानी झाली आहे. भारतीय हवाई दलाने विजयपत सिंघानिया यांना मानद एअर कमोडोर हा दर्जा दिला होता. त्यांच्या अन्त्यसंस्कारावेळी हवाई दलाने विजयपत सिंघानिया यांना आदरांजली वाहिली.

### कुपवाडात गोळीबार; तीन जवान जखमी

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यात जवानांमध्ये झालेल्या गोळीबाराच्या घटनेत तीन जवान जखमी झाल्याचे अधिकाऱ्यांनी रविवारी येथे सांगितले. शनिवारी रात्री त्रेहगाम भागातील एका लष्करी छावणीत, एका जवानाने आपल्याच सहकाऱ्यांवर गोळीबार केल्याचा आरोप आहे, असे त्यांनी नमूद केले. गोळीबार करणाऱ्या त्या जवानाला ताब्यात घेण्यापूर्वी, या घटनेत तीन सहकारी जखमी झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# खाजगी बस व स्कॉर्पिओची तळोधीत धडक; ४ ठार

## १२ गंभीर, चामोर्शी-कुरुल-रामपूर मार्गावरील अपघात



◆ **चामोर्शी, २९ मार्च**

तालुक्यातील तळोधी (मो.) जवळील हायवेवर रविवारी सायंकाळी ६.३०च्या सुमारास खाजगी बस व स्कॉर्पिओ वाहनाची समोरासमोर भीषण धडक होऊन चार जणांचा जागीच मृत्यू, तर १२ जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

गडचिरोलीहून गोंडपिपरीकडे जाणारी प्रवीण टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्सची बस प्रवासी घेऊन जात होती. दरम्यान, चामोर्शी-कुरुल-रामपूर मार्गावरून स्कॉर्पिओ १५ प्रवासी घेऊन भाडभिडी (मो.) येथे जात होती. तळोधीजवळील नवीन पेट्रोल पंपासमोर हायवेवर दोन्ही वाहनांची जोरदार धडक झाली.

या अपघातात स्कॉर्पिओमधील विमल कान्हुजी गव्हारे, सुमन देवाजी गव्हारे, अनिकेत साईनाथ बरलावार आणि आरोही मोगरकर (८ वर्ष) यांचा जागीच मृत्यू झाला. प्रतिमा रतन मोगरकर, गुरुदेव चूरकुट कुणघाडकर, निखिल जराते, संजय नागेश्वर वैरागडे, कुणाल श्रावण कन्नाके, सुधाकर कुणघडकर, अमर सखाराम चलाख, रेखा अमर चलाख, देवाजी गोमाजी गव्हारे, वेदांत संजय वैरागडे, करण कुमरे तसेच चालक गुरुदास वासेकर गंभीर जखमी झालेत. अपघातानंतर जखमींना तातडीने तळोधी येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी गडचिरोली येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. काही जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. या भीषण अपघातामुळे परिसरात शोककळा पसरली असून, पोलिस पुढील तपास करीत आहेत. (तभा वृत्तसेवा)

# 'पीडी'मुळे मिळाली आसामच्या राजकारणाला कलाटणी

## हिमंता बिस्व सरमा यांचा बाणेदारपणा काँग्रेसला भोवला

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २९ मार्च**

कुत्र्यामुळे एखाद्या राज्याच्या राजकारणाला कलाटणी मिळू शकते, असे म्हटले तर त्यावर कोणाचा विश्वास बसणार नाही, पण ही वस्तुस्थिती आहे. विधानसभा निवडणूक होत असलेल्या आसाममध्ये दहा वर्षापूर्वी काँग्रेसनेते राहुल गांधी यांच्या पीडी नावाच्या पाळीव कुत्र्यामुळे तेथील राजकारणाला मोठ्या प्रमाणात कलाटणी मिळाली.

तत्कालीन काँग्रेस नेते हिमंता बिस्व सरमा यांनी नेतृत्वबदलाची मागणी करीत तेव्हाचे आसामचे काँग्रेसचे मुख्यमंत्री तरुण गोगोई यांच्याविरुद्ध बंड पुकारले होते. या मुद्यावर दिल्लीत काँग्रेस नेतृत्वाशी चर्चा करायला हिमंता बिस्व सरमा आणि अन्य नेते राहुल गांधी यांच्या निवासस्थानी गेले होते. बिस्व सरमा राज्यातील राजकीय स्थितीबद्दल सांगत असताना राहुल गांधी आपल्या लाडक्या कुत्र्याशी म्हणजे पीडीशी खेळत होते, त्याला बिस्कीट खाऊ घालत होते.




काँग्रेसचे नेते जे काही सांगत आहे, त्याकडे राहुल गांधींचे लक्ष नव्हते. राहुल गांधींच्या या बेजबाबदार वागणुकीमुळे हिमंता बिस्व सरमा संतप्त झाले आणि त्यांनी काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला. बिस्व सरमा यांनी भाजपात प्रवेश केला. २०१६ मध्ये राज्यात पहिल्यांदा भाजपाचे सरकार आले, सर्बानंद सोनोवाल यांच्या मंत्रिमंडळात बिस्व सरमा यांचा समावेश झाला. नंतर २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला दुसऱ्यांदा बहुमत मिळाले आणि मुख्यमंत्रिपदाची माळ बिस्व सरमा यांच्या गळ्यात पडली.

हिंमता बिस्व सरमा बोलत असताना राहुल गांधी आपल्या कुत्र्याशी खेळत नसते, त्याला बिस्कीट खाऊ घालत नसते आणि त्यांचे म्हणणे पुरेशा गांभीर्याने ऐकत असते, तर कदाचित हिमंता बिस्व सरमा यांनी काँग्रेस सोडली नसती आणि भाजपात प्रवेश केला नसता.

पीडीला ज्या प्लेटमधून राहुल गांधींनी बिस्कीट खाऊ घातले, त्याच प्लेटमधून त्यांनी मलाही बिस्कीट दिले होते, पण मी ते खाल्ले नाही, असा आरोप करीत बिस्व सरमा यांनी नंतर आसामच्याच नाही तर देशाच्या राजकारणातही खळबळ उडवली. राहुल गांधींच नाही तर, संपूर्ण गांधी परिवाराने मला पीडीच्या प्लेटमधून बिस्कीट खाऊ घालण्याचा प्रयत्न केला, पण मी ते खाल्ले नाही. कारण, मी एक गौरवांकित आणि स्वाभिमानी आसामी आणि भारतीय आहे, असे बिस्व सरमा यांनी सांगत आपल्या बाणेदारपणाचे प्रदर्शन केले.

२०१७ मध्ये राहुल गांधींनी एक व्हिडीओ जारी केला, यात ते पीडीच्या नाकावर बिस्कीट ठेवताना दिसतात, नंतर पीडी ते बिस्कीट उडवून खाताना दिसतो. नंतर गमतीच्या मुडमध्ये राहुल गांधी यांनी म्हटले, सगळ्यांना प्रश्न पडतो की, माझे ट्विट कोण करतो, त्याचे उत्तर आहे, पीडी.

# खडगे यांनीही केली काँग्रेस कार्यकर्त्यांची तुलना कुत्र्याशी

◆ **नवी दिल्ली, २९ मार्च**

राहुल गांधी, कुत्रा आणि बिस्कीट यांचा काय ऋणानुबंध आहे, माहिती नाही, पण या मुद्यावरून ते वारंवार अडचणीत येत असतात. राहुल गांधीच नाही तर अन्य काँग्रेस नेतेही कुत्र्यामुळे वादग्रस्त ठरतात.

आपल्या भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान बाहेर आलेल्या अशाच एका व्हिडीओवरून राहुल गांधी पुन्हा अडचणीत आले होते. या व्हिडीओमध्ये राहुल गांधीच्या गाडीवर एक कुत्रा दिसतो, राहुल गांधी या कुत्र्याला एक बिस्कीट खाऊ घालण्याचा प्रयत्न करतात, पण तो खात नाही, त्यामुळे राहुल गांधी ते बिस्कीट एका कार्यकर्त्याला देतात. यावरून वाद निर्माण होतो. कुत्र्याने न खाल्लेले बिस्कीट राहुल गांधी यांनी कार्यकर्त्याला खायला दिले, असा आरोप झाला, भाजपाने या मुद्यावरून त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला.



राहुल गांधी आणि काँग्रेसच्या लेखी आपल्या कार्यकर्त्यांची इज्जत कुत्र्यापेक्षाही कमी आहे, ज्या नेत्याच्या लेखी आपल्या कार्यकर्त्याची किंमत कुत्र्यापेक्षाही कमी आहे, त्या पक्षाचे पतन होणारच, असा आरोप भाजपाने केला. याचा काँग्रेसने आणि राहुल गांधी यांनी खंडन करण्याचा प्रयत्न केला. कुत्रा खात नसल्यामुळे मालकाच्या हातून कुत्र्याला खाऊ घालण्यासाठी ते बिस्कीट त्या व्यक्तीला देण्यात आले, असा खुलासा तेव्हा काँग्रेसला करावा लागला. जनरल मनोज नरवणे यांच्या पुस्तकातील मजकुराचा मुद्दा लोकसभेत उपस्थित करण्याचा प्रयत्न विरोधी पक्षनेते राहुल गांधी काही दिवसांपूर्वी सातत्याने करत होते, या मुद्यावरून होत असलेल्या गदारोळामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित झाल्यानंतर राहुल गांधी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांच्या नातीला दिलेल्या कुत्र्याच्या पिलासोबत फुटबॉल खेळत असल्याचा आणखी एक ताजा व्हिडीओही चर्चेत आला आहे.

कुत्रा प्रकरणामुळे राहुल गांधीच नाही तर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगेही वादग्रस्त ठरले. दिल्लीत रामलीला मैदानावर आयोजित मेळाव्यात भाषण करताना खडगे यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांची तुलना कुत्र्यांशी करत वाद निर्माण केला. ज्यांना तुम्ही बुथ एजंट बनवता, विचारपूर्वक बनवा, असे आवाहन करत खडगे म्हणाले की, आमच्या येथे एक म्हण आहे, कुत्रा घेताना त्याला चांगल्या प्रकारे भुंकता येते का, ते पाहा, त्याचप्रमाणे बुथ एजंट ठरवताना त्याला कुत्र्याप्रमाणे चांगले भुंकता यायला पाहिजे. (तभा वृत्तसेवा)



पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या राज्य विधानसभा निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर भाजपाच्या उमेदवार पापिया अधिकारी टॉलिगंज विधानसभा मतदारसंघात रविवारी प्रचार करताना

### राज्याच्या तिजोरीतील महसुलात घट

(पान १ वरून)

क्षेत्राची मर्यादा, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील (यूडीसीपीआर) तरतुदी आणि बंधने यामुळे बांधकामाच्या क्षेत्रात मर्यादा वाढल्या आहेत. तसेच, २०२५-२६ मध्ये चालू बाजार मूल्यदरात (रेडी रेकनर) चार टक्क्यांनी वाढ आणि शुल्कावर एक लाखांपर्यंत दंडाची तरतूद अशा निर्णयांमुळे आणि मिळकतींचे भाव गगनाला भिडल्याने खरेदी-विक्री व्यवहारांवर परिणाम जाणवत असल्याचे मत बांधकाम व्यावसायिकांकडून नोंदविण्यात आले.

# आता जमीन मोजणी होणार वेगाने

## प्रत्येक जिल्ह्यात खाजगी भूमापकांची नियुक्ती

◆ **मुंबई, २९मार्च**

जमीन मोजणी प्रकरणांचा निपटारा अचूक, जलद, गुणवत्तापूर्ण व पारदर्शी पद्धतीने व्हावा, यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षित परवानाधारक भूमापक आणि भूमापन एजन्सी नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला.

याबाबतची कार्यपद्धती निश्चित करून शासनाने आदेश जारी केला आहे. मोजणी प्रकरणांचे निश्चित वेळापत्रक ठरवून त्यानुसारच प्रत्यक्ष जमिनीची मोजणी व हद्द कायम करावी लागेल. वेळापत्रक निश्चित करूनच भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक संबंधितासाठी नोटीस काढतील. कामाशी संबंधित कागदपत्रे नसतील तर जबाब पंचनामे करून अहवाल द्यावा लागेल. या कामात भ्रष्टाचार अथवा गुन्हेगारी कारण समोर आले तर परवाना रद्द करण्यात येणार आहे.

भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणीचे काम केले जाते. तथापि, मोजणीसाठी वाढते अर्ज व मर्यादित शासकीय मनुष्यबळामुळे जमीन मोजणीची प्रकरणे प्रलंबित राहू नयेत, यासाठी जिल्हास्तरावर परवानाधारक भूमापकांची नियुक्ती तांत्रिकदृष्ट्या पात्र असणाऱ्या एजन्सीकडून करण्यात येत आहे. (वृत्तसंस्था)

# महाविद्यालयीन तरुणीवर सामूहिक अत्याचार

## भानखेडच्या जंगलातील घटना ● पाच जणांना अटक

◆ **अमरावती, २९ मार्च**

अठरा वर्षीय महाविद्यालयीन तरुणी मित्रासोबत दुचाकीवर चांदूर रेल्वे मार्गाने फिरायला गेली होती. ते दोघे परत येत असताना पाच जणांनी त्यांना पकडले. दोघांनाही मारहाण केली. त्यापैकी एकाने तरुणीला जंगलात ओढून नेले व बलात्कार केला. इतरांनी तिच्या मित्राला पकडून ठेवले. ही थरारक घटना शनिवारी रात्री साडेअकराच्या सुमारास उघड झाली. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी सामूहिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करून रविवारी पहाटेपर्यंत पाच जणांना ताब्यात घेतले.



ही तरुणी शनिवारी रात्री मित्रासोबत वडाळी परिसरात गेली होती. पुढे ते दोघे दुचाकीने फेरफटका मारण्यासाठी चांदूर रेल्वे मार्गाने गेले. या मार्गावरून भानखेडच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याजवळ तरुणीचा दुपट्टा खाली पडल्यामुळे ते थांबले. त्यावेळी अनोळखी पाच जण त्यांच्याजवळ आले व दोघांनाही पकडले. त्यांना मारहाण करून तुमच्याकडे असलेले पैसे द्या, अशी मागणी केली. त्यावेळी घाबरलेल्या तरुणीने तिच्याजवळ असलेले १२० रुपये त्यांना दिले. चौघांनी तरुणीच्या मित्राला पकडून ठेवले, तर एकाने तरुणीला जंगलात ओढत नेऊन अमानुष अत्याचार केला.

झालेल्या प्रकाराबाबत कोणालाही माहिती दिल्यास जीवे मारण्याची धमकी तरुणी व तिच्या मित्राला आरोपींनी दिली. सुमारे तासाभराच्या या थरारानंतर तरुणी व तिच्या मित्राला आरोपींनी रस्त्यावर आणून सोडले. झालेल्या प्रकाराने तरुणी व तिचा मित्र चांगलेच घाबरले. या संपूर्ण घटनेत तरुणी गंभीर जखमी झाली. शहरात आल्यानंतर तरुणी रुग्णालयात पोहोचली. त्या ठिकाणी तिला दाखल करून घेण्यात आले. पीडित तरुणीवर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. पोलिस पुढील तपास करीत आहे. (तभा वृत्तसेवा)

### प्रेम आमच्यासोबत पण लग्न त्यांच्यासोबत...

**राज्यसभेत** ५९ सदस्यांचा निरोप समारंभ सुरू होता, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांचेही यावेळी भाषण झाले. खडगे स्वत:च येत्या काही महिन्यात निवृत्त होणार आहेत. माजी पंतप्रधान आणि जनता दल धर्मनिरपेक्षचे नेते एच. डी. देवेगौडा यांचाही निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये समावेश आहे. देवेगौडा यांचा पक्ष गेल्या काही वर्षांपासून रालोआत आहे, याचे काँग्रेसला दु:ख आहे. हा संदर्भ घेत खडगे यांनी देवेगौडा यांना निवृत्त होत असल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. देवेगौडा यांना मी ५४ वर्षांपासून ओळखतो, त्यांनी पंतप्रधानपदासह अनेक पदांवर काम केले, त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत, असे सांगताना, देवेगौडा यांनी प्रेम आमच्यासोबत केले आणि लग्न मात्र मोदींसोबत केले, त्यांनी असे का केले, ते आम्हाला समजलेच नाही, असा टोला खडगे यांनी लगावला.




यावर सभागृहात हास्याचे कारंजे निर्माण झाले. पंतप्रधान मोदी यांनाही हसू आवरले नाही. खडगे यांच्या या विधानावर देवेगौडा काय प्रतिक्रिया व्यक्त करतात, याबाबत उत्सुकता होती. पण, देवेगौडा यांनी खडगे यांच्या या आक्षेपाला एका पत्रातून मजेदार उत्तर दिले. खडगे यांनी माझ्याबाबत प्रेम आणि लग्नाबाबत जे विधान केले, त्यावेळी मी सभागृहात नव्हतो, पण काँग्रेससोबतचे आमचे लग्न जबरदस्तीने झालेले होते, त्यामुळे आम्हाला तलाक घ्यावा लागला. कारण, हे नाते निकोप नव्हते, असे देवेगौडा यांनी आपल्या उत्तरात म्हटले.

●● ●●

### राज्यसभेत शेरोशायरींची जुगलबंदी

राज्यसभेत ५९ सदस्यांचा निरोप समारंभ सुरू होता. निवृत्त होणाऱ्या सदस्यांत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचाही समावेश आहे, पण त्यांची महाराष्ट्रातून तिसऱ्यांदा राज्यसभेवर अविरोध निवडही झाली आहे. आठवले म्हणजे शेरोशायरी. आठवले भाषण देत नाही तर, यमक साधणाऱ्या कविता म्हणत असतात, त्याला सदस्यांचाही प्रतिसादही मिळत असतो. आधी पंतप्रधान मोदी यांच्या भाषणात मोठ्या प्रमाणात शेरोशायरी राहात होती, आता मात्र ती कमी झाल्यासारखी दिसते, असे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे म्हणाले. याचा उल्लेख करत मोदी म्हणाले की, मी शेरोशायरीवाला माणूस नाही, ते काम प्रतापगडी (इम्रान प्रतापगडी) यांचे आहे. मात्र, तुम्ही म्हणता तर मी एक शेर सादर करतो, असे म्हणत, मोदी यांनी 'करम ऐसा करो मन मे, जहां से गुजरी तुम्हारी नजरे, उधर से तुम्हे सलाम आयेद', असा शेर सादर करत खडगे यांची इच्छा पूर्ण केली. त्याआधी खडगे यांनी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचाही उल्लेख केला. पंतप्रधानाचे गुणगौरव करणाऱ्या कविताच आठवले नेहमी वाचत असतात, तुम्हाला सोडून दुसऱ्या कोणाची कविता त्यांना लिहिता येत नाही, रामदास आठवलेंनी फक्त तुमच्याबाबतचीच कविता लिहिली आहे, असे खडगे म्हणाले. यमक साधणाऱ्या चारोळी कविता सभागृहात सादर करणाऱ्या रामदास आठवले यांच्या शैलीची मोदी यांनी प्रशंसा केली. कधीकाळी सभागृहात हास्य आणि मनोरंजन होत होते, असे आम्ही ऐकले आहे, पण आता त्याचे प्रमाण कमी झाले आहे, मात्र सभागृहात रामदास आठवलेसारखे सदाबहार नेते आहे, ते निवृत्त होत आहे, पण त्यांची कमी सभागृहात जाणवणार नाही, ते सभागृहात आपल्या चारोळ्या सादर करतच राहतील, असे मोदी म्हणाले. पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या स्तुतीमुळे आठवले, यांच्या शायरीला आणखी रंग चढला. जो मेंबर हो रहे रिटायर, वो नही होंगे टायर, मै जल्दी नही हो जाऊंगा रिटायर, क्योंकी मै हू शायर, मैने तो बोला था, मै वापस आऊंगा, और नरेंद्र मोदी जी के विकास के गीत गाऊंगा, अशी शेरोशायरी सादर करत आठवले यांनी आपल्या नेहमीच्या शैलीत सभागृहाचे मन जिंकले.

●● ●●

### पुस्तक प्रकाशन आणि तुरुंग रिटर्न नेते

**शिवसेनेचे** प्रवक्ते आणि राज्यसभा सदस्य संजय राऊत यांनी मुंबईच्या ऑर्थर रोड तुरुंगातील आपल्या अनुभवावर आधारित 'नरकातील स्वर्ग' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाच्या मराठी आवृत्तीचे मुंबईत प्रकाशन झाले होते. आता राजधानी दिल्लीत या पुस्तकाच्या 'अनलाईकली पॅराडाईज' या हिंदी आणि इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. कॉन्स्टिट्युशन क्लब परिसरातील मावळणकर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य म्हणजे याला तुरुंगाची वारी करून आलेल्या बहुतांश नेत्यांनाच आमंत्रित करण्यात आले होते. संजय राऊत स्वत: तुरुंगात जाऊन आले. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, आपचेच संजयसिंह, तृणमूल काँग्रेसचे साकेत गोखले हे सगळे तुरुंग रिटर्न नेते या कार्यक्रमाला उपस्थित होते. तुरुंगात न गेलेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजयसिंह, ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल, तृणमूल काँग्रेसचे डेरेक ओ ब्रायन आणि पत्रकार संजय शर्माही या कार्यक्रमाला उपस्थित होते. उपस्थित सर्वच नेत्यांची भाषणे केंद्र सरकारवर टीका करणारी होती. तुरुंगात जाऊन आल्यामुळे आमच्यातील भीती पळाली, आम्ही बेडर झालो, असे संजय राऊत यांनी सांगितले. सपाच्या जया बच्चन यांचे नावही कार्यक्रमाच्या पत्रिकेत होते, व्यासपीठावरील बॅनरवरही त्यांचे नाव नाव होते. पण, त्या कार्यक्रम सुरू झाल्यानंतर आल्या. त्यांना व्यासपीठावर येण्याची विनंती वारंवार करण्यात आली. मात्र, त्यांनी व्यासपीठावर जाण्यास नकार देत खाली बसून कार्यक्रम पाहिला. जया बच्चन व्यासपीठावर का गेल्या नाही, असा प्रश्न नंतर सर्वांना पडला होता.

●● ●●

### महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक केव्हा?

**संसदेच्या** अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याचे सोमवार वा मंगळवारी सूप वाजणार आहे. हे अधिवेशन संपायच्या आधी महिलांना लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ३३ टक्के आरक्षण देण्यासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक सरकार संसदेत मांडेल, असे मानले जात होते. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक लागू करण्याचा सरकारचा विचार आहे. पण, त्यासाठी मतदारसंघांचे परिसीमन आवश्यक आहे, त्यासाठी आधी जनगणना व्हायला हवी. या दोन्ही प्रक्रिया अजून सुरूच झाल्या नाही, तसेच या दोन्ही प्रक्रिया अतिशय वेळखाऊ आहे. त्यामुळे त्यामार्गाने गेलो तर २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत महिलांसाठी ३३ टक्के वाढीव जागा लागू करता येणार नाही. त्यामुळे घटनादुरुस्ती करून यातून मार्ग काढण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. लोकसभा आणि राज्य विधानसभांतील जागांमध्ये सरसकट ५० टक्के वाढ करून त्यातील ३३ टक्के टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जाणार आहे. याला एखादुसरा अपवाद वगळता सर्वच राजकीय पक्षाचा पाठिंबा आहे, त्यामुळे हे घटनादुरुस्ती विधेयक पारित होण्यात कोणतीच अडचण येणार नाही. पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीत याचा राजकीय फायदा घेता यावा, म्हणून सरकार या घटनादुरुस्ती विधेयकाची घाई करत आहे, असा काँग्रेसचा आरोप आहे. त्यामुळे पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीचे मतदान आटोपल्यानंतर म्हणजे २९ एप्रिलनंतर या मुद्यावर सर्वपक्षीय बैठक बोलावावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. त्यावर सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली नाही. पण सरकार एप्रिल महिन्यात सरकारचे संसदेचे दोन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावून हे घटनादुरुस्ती विधेयक पारित करेल, असा अंदाज आहे.

● **दिल्लीवाला**

# विनायक चतुर्थीच्या दिवशी भाविकांना दर्शनापासून रोखले

## हिंदू संघटनांचा आरोप

◆ **पुणे, २९ मार्च**

सारसबाग गणपती मंदिर परिसरात विनायक चतुर्थीच्या दिवशी (२२ मार्च) दर्शनापासून रोखण्यात आल्याचा आरोप हिंदू संघटनांनी केला आहे. विनायक चतुर्थीच्या दिवशी सारस बागेत एका विशिष्ट समुदायातील शेकडो नागरिकांनी एकत्र येत भोजन केले व त्यानंतर बागेत धार्मिक विधी केल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या विशिष्ट समुदायाला प्रशासनाने परवानगी दिली कशी, असा सवाल हिंदू संघटनांनी केला आहे.

सारस बागेत विनायक चतुर्थीच्या दिवशी विशिष्ट समुदायातील नागरिकांना त्यांच्या धार्मिक विधीसाठी महापालिका आणि पोलिस प्रशासनाने कोणाच्या आदेशाने ही परवानगी दिली, असा प्रश्न हिंदू संघटनांनी उपस्थित केला. चतुर्थी असल्याने अनेक हिंदुत्ववादी कार्यकर्ते गणपतीच्या दर्शनासाठी जात असताना पोलिसांनी रोखल्याचा आरोपही हिंदू एकजूट संघटनेकडून करण्यात आला आहे.

सारसबाग ही पेशवेकालीन असून आतमध्ये गणपतीचे मंदिर आहे. दररोज हिंदू भाविक या मंदिरात जातात. चतुर्थीच्या दिवशी अनेक लोक व्रतवैकल्य आणि उपवास करतात. मात्र, विनायक चतुर्थीच्या दिवशी एका विशिष्ट समुदायाला मंदिर परिसरात भोजन करण्याची परवानगी दिल्याने हिंदूंच्या भावना दुखावल्याचे हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सांगितले.

त्या ठिकाणी भोजनासाठी उपस्थित असलेले नागरिक फक्त पुण्यातील नव्हते, तर ते चाकण, तळेगाव, लोणावळा आणि शिक्रापूर या भागांतून आले होते. त्या नागरिकांना त्यांच्या परिसरात असे धार्मिक कार्यक्रम करण्याऐवजी हिंदूंच्या धार्मिक स्थळी येण्याची आवश्यकता का वाटते, याची चौकशी करण्याची गरज आहे. यामागे पुण्यात धार्मिक तेढ निर्माण करण्याचे षडयंत्र आहे का, याचाही विचार करायला हवा, असे हिंदुत्ववादी कार्यकर्ते विश्वजीत भिसे म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

> आम्ही पुणे महापालिका प्रशासनाला १५ दिवसांपूर्वीच सारसबागेत चतुर्थीच्या दिवशी विशिष्ट समुदायातील नागरिकांना प्रवेश देऊ नये, अशी मागणी केली होती. प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसादही देण्यात आला होता. परंतु, पोलिस प्रशासनाने हिंदूंच्या भावना लक्षात न घेता त्यांना प्रवेश दिला. त्यादिवशी आम्हाला गणपतीच्या दर्शनालाही जाऊ देण्यात आले नाही. त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन ज्या व्यक्तींनी त्या नागरिकांना परवानगी दिली, त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी आमची मागणी आहे.
>
> **मिलिंद एकबोटे**
> अध्यक्ष, समस्त हिंदू आघाडी

> सारसबागेतील कार्यक्रमासंदर्भात आम्हाला महापालिकेकडून कोणतीही सूचना किंवा पत्र देण्यात आले नाही. त्यामुळे त्या ठिकाणी कुणाला प्रवेश द्यायचा, हे महापालिकेने ठरवावे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून घटनास्थळी फौजफाटा तैनात करण्यात आला होता.
>
> **यशवंत निकम**
> पोलिस निरीक्षक, स्वारगेट पोलिस स्टेशन

> पर्वती संस्थानचा ताबा मंदिर आणि मंदिराच्या पायऱ्यांपर्यंतच आहे. इतर सारसबाग महापालिकेच्या अधिपत्याखाली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी घडणाऱ्या घटनांवर आमचे नियंत्रण नसते. तरीही विनायकी चतुर्थीच्या दिवशी मुस्लिम समुदायाकडून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याची कल्पना आम्ही स्थानिक नगरसेवकांना आणि पोलिस प्रशासनाला दिली होती.
>
> **सुधीर पंडित**
> ट्रस्टी, सारसबाग गणपती मंदिर देवस्थान



'अशोक खरात प्रकरणात यापूर्वीच कारवाई व्हायला पाहिजे होती. असे झाले असते तर बऱ्याच गोष्टी टाळता आल्या असत्या. अनेक महिलांचे जीवन वाचले असते. आपण आंधळा विश्वास ठेवतो तेव्हा आपला घात होतो.
- **अमृता फडणवीस**, सामाजिक कार्यकर्त्या

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, सोमवार, ३० मार्च २०२६ 

अशोक खरातच्या फार्म हाऊसमधील झाडाला पाणी कोणी दिले हा प्रश्न नाही. यानंतर मागील वर्षभरात घडलेल्या गंभीर गुन्ह्यांचा प्रश्न आहे. महिलांचे शोषण, ब्लॅकमेलिंग आणि धमक्या हा या प्रकरणातील क्रमांक एकचा गुन्हा आहे.
-**संजय राऊत**, उबाठा गटाचे नेते





पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर सुरक्षा व्यवस्था कठोर करण्यात आली असताना झारखंडमधील रांची जिल्ह्याच्या तुलिन येथील आंतरराज्यीय सीमा तपासणी नाक्यावर एका वाहनाची तपासणी करताना सीआरपीएफ जवान

# अमेरिकेची त्रिपोली युद्धनौका इराणवर हल्ल्यासाठी सज्ज

● ३,५०० नौसैनिक सेंट्रल कमांडच्या हद्दीत दाखल ● जमिनीवरून कारवाईची शक्यता

◆ **दुबई, २९ मार्च**

पश्चिम आशियातील यूएस सेंट्रल कमांड क्षेत्रात यूएसएस त्रिपोली युद्धनौका रविवारी दाखल झाली. यावर ३५०० नौसैनिक तैनात असून, इराणवर जमिनीवरून कारवाई करण्यासाठी युद्धनौकेला जपानच्या हद्दीतून आणले गेले. या हालचालीकडे पश्चिम आशियातील अमेरिकेच्या लष्करी सामर्थ्याचा एक महत्त्वपूर्ण संकेत म्हणून पाहिले जात आहे.

यूएस सेंट्रल कमांडने एका पोस्टमध्ये म्हटले की, यूएसएस त्रिपोलीवरील अमेरिकी मरीन सैनिक यूएस सेंट्रल कमांडच्या अखत्यारीतील क्षेत्रात दाखल झाले. त्यांनी पोस्टसोबत छायाचित्र जारी केले त्यात हे मरीन सैनिक लढाऊ गणवेश, हेल्मेट आणि गॉगल्स घातलेले दिसत आहेत. हे अतिरिक्त सैन्य या प्रदेशात आधीच तैनात असलेल्या सुमारे ५० हजार अमेरिकी सैनिकांना अधिक बळकटी देईल. यूएसएस त्रिपोली नौकेवर लढाऊ विमाने, हेलिकॉप्टरचा समावेश आहे. ही नौका जपानमध्ये तैनात असलेल्या ३१ व्या मरीन एक्सपेडिशनरी युनिटचा भाग आहे. दोन आठवड्यांपूर्वी त्यांना मध्य पूर्वेकडे पाठवण्याचा आदेश देण्यात आला होता. खार्ग बेटावरून इराणमध्ये जमिनी मार्गाने कारवाई करणे हा अमेरिकेचा उद्देश असून, यामुळेच 'त्रिपोली' तैनात करण्यात आली. (वृत्तसंस्था)



### इराणमध्ये येणारे शवपेटीत परत जाईल

**त्रिपोली युद्धनौकेच्या तैनातीवर इशारा देताना इराणच्या आयआरजीसीने इशारा देत म्हटले की, जमिनी मार्गाने हल्ला झाल्यास अमेरिकेला भयंकर परिणामाला सामोरे जावे लागेल. इराणी भूभागात दाखल होणारे सैनिक शवपेटीत परत जाईल. इराणी भूभागात अमेरिकेच्या कोणत्याही हस्तक्षेपाचा किंमत आखाती देशांना मोजावी लागेल.**

### हुथींचा पुन्हा इस्रायलवर हल्ला

**येमेनच्या हुथी गटाने इस्रायलविरुद्ध लष्करी कारवाई सुरू ठेवली आहे. रविवारी त्यांनी इस्रायलच्या अनेक भागांत क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मारा केला. हुथीचे प्रवक्ते याह्या सारी यांनी सांगितले की, इस्रायलवर केलेल्या हल्ल्या क्रूझ क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा वापर करण्यात आला.**

# बहरीन, ओमान, यूएईवर क्षेपणास्त्रांचा मारा

## इराणच्या हल्ल्यात दोन अ‍ॅल्युमिनियम प्रकल्प उद्ध्वस्त | इस्रायलच्या ५० लढाऊ विमानांचा तेहरानवर बॉम्बवर्षाव



◆ **तेहरान, २९ मार्च**

अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देत इराणने सलग दुसऱ्या दिवशी आखाती देशांना लक्ष्य केले. बहरीन, ओमान आणि संयुक्त अरब अमिराती अर्थात यूएईवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. यात बहरीनमधील 'अ‍ॅल्युमिनियम बहरीन' (अल्बा) आणि यूएईच्या 'एमिरेट्स ग्लोबल अ‍ॅल्युमिनियम' या दोन सर्वांत मोठ्या प्रकल्प उद्ध्वस्त झाले. या हल्ल्यात प्रकल्पातील कर्मचारी जखमी झाल्याची माहिती बहरीन यूएईने दिली, मात्र आकडेवारी त्यांनी प्रसिद्ध केलेली नाही. इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात् आयआरजीसीने हल्ल्याची माहिती दिली.

बहरीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने निवेदनात म्हटले की, रविवारी पहाटे इराणने अल्बा प्रकल्पावर क्षेपणास्त्रांचा मारा केला, यात दहा कर्मचारी जखमी झाले. हल्ल्यात प्रकल्पाचेही नुकसान झाल्याने कामकाज थांबविण्यात आले. आमच्या कर्मचाऱ्यांची सुरक्षा हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. सध्या आम्ही सुविधेच्या नुकसानीचे मूल्यमापन करीत असून, कामकाजाची लवचिकता टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहोत. दुसरीकडे आयआरजीने निवेदनात म्हटले की, बहरीन आणि यूएईमधील अ‍ॅल्युमिनियम प्रकल्प अमेरिकन संरक्षण उत्पादनाशी जोडलेले आहेत. हे उद्योग अमेरिकन लष्करी आणि एरोस्पेस क्षेत्राला कच्चा माल आणि तांत्रिक पाठिंबा देतात. त्यामुळे आम्ही त्यांना लक्ष्य केले. इराणच्या औद्योगिक पायाभूत सुविधांवर केलेल्या हल्ल्यांचा आम्ही सूड घेतला. याशिवाय ओमानमध्ये पायाभूत सुविधांना लक्ष्य करीत जोरदार हल्ले केले, तेथे झालेल्या नुकसानीचा तपशील समोर आलेला नाही. (वृत्तसंस्था)

### शस्त्रास्त्र निर्मिती प्रकल्पावर इस्रायलचे हल्ले

इराणच्या हद्दीत शिरून इस्रायलच्या ५० लढाऊ विमानांनी तीन भागांतील शस्त्रनिर्मिती कारखाने आणि अणू कार्यक्रमाशी संबंधित तळांना लक्ष्य केले. हल्ल्यांमध्ये अराक आणि यज्द यासारख्या महत्त्वाच्या भागांचा समावेश आहे. ज्या ठिकाणांवर हल्ले झाले, त्यात लष्करी शस्त्रास्त्र उद्योग आणि बॅलिस्टिकसह अँटी-एअरक्राफ्ट क्षेपणास्त्रांचे सुटे भाग बनवणाऱ्या कारखान्यांचा समावेश असल्याची माहिती आयडीएफ अर्थात इस्रायलच्या संरक्षण विभागाने दिली. अराकमधील खांडब अणुभट्टीवर, तसेच अर्दाकानमधील युरेनियम संवर्धन सुविधेवर हल्ला केला.

### लेबनॉनमध्ये पाच पत्रकारांचा मृत्यू

दक्षिण लेबनॉनमध्ये झालेल्या इस्रायली हल्ल्यात पाच परदेशी पत्रकारांचा मृत्यू झाला. हे पत्रकार जेझिन गावातून वार्तांकन करून परतत असताना त्यांच्या वाहनांवर ड्रोन धडकले. इस्रायलने रविवारी दक्षिण लेबनॉनच्या अनेक भागांत हिजबुल्लाहच्या अड्ड्यांवर हल्ले चढविले. यात पत्रकारांशिवाय सात नागरिक ठार झाल्याची माहिती लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने दिली. दुसरीकडे हिजबुल्लाहने इस्रायलच्या महावा अलोन आणि बेरिया लष्करी तळावर क्षेपणास्त्राचा मारा केला. हे दोन्ही तळ उत्तरेकडील सफाद शहराजवळ आहेत.

### माजी लष्करप्रमुख कमार बाजवा यांचे निधन

◆ **इस्लामाबाद, २९ मार्च**

पाकिस्तानचे माजी लष्करप्रमुख जनरल कमार जावेद बाजवा यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी शनिवारी रात्री निधन झाले.



फेब्रुवारीमध्ये घरातील बाथरूममध्ये पाय घसरल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती, त्यानंतर रावळपिंडी येथील लष्करी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते.

डॉक्टरांनी त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली होती, परंतु त्यांची प्रकृती सातत्याने खालवत गेली आणि शनिवारी त्यांचे निधन झाले. बाजवा २०१६ ते २०२२ पर्यंत पाकिस्तानचे लष्करप्रमुख होते आणि निवृत्तीनंतरही ते देशाच्या राजकारण आणि सुरक्षा बाबींमध्ये प्रभावशाली मानले जात होते. (वृत्तसंस्था)

# इराकवर ड्रोनचा मारा, राष्ट्राध्यक्षांच्या घराला आग

◆ **बगदाद, २९ मार्च**

इराकच्या कुर्दिस्तान प्रदेशातील राष्ट्राध्यक्षांच्या निवासस्थानावर इराणने ड्रोनचा मारा केला. यात निवासस्थान पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. अमेरिकेने हल्ल्याचा निषेध करीत इराणला कठोर प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला.

राष्ट्राध्यक्षांच्या निवासस्थानावरील हल्ल्याचा निषेध करताना अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, इराणने केलेले कृत्य दहशतवादी असून, कुर्दिस्तान आणि इराकच्या सार्वभौमत्व आणि सुरक्षेसाठी अमेरिका वचनबद्ध आहे. इराणला याची किंमत मोजावी लागेल. इराणकडून थेट पुरवठा आणि शस्त्रे मिळवणारे दहशतवादी गट अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य करीत आहे. त्यांचा नायनाट करण्यासाठी तीव्र मोहीम सुरू करण्यात आली आहे. दुसरीकडे, इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, अमेरिका कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय इराणला बदनाम करण्याचा कट रचत आहे. (वृत्तसंस्था)

### अमेरिकेकडून इराणला कठोर प्रत्युत्तर देण्याचा इशारा

### मंदिराचे छत कोसळून एकाचा मृत्यू

**तिरुचिरापल्ली** : तमिळनाडूमधील तिरुचिरापल्ली येथील समायपुरम मरियम्मन मंदिरात छत कोसळल्याने एक भाविक ठार झाला तर दोन जण जखमी झाले आहेत. घटना सन्नाथी स्ट्रीट मंडपममध्ये घडली. दर्शनासाठी आलेले भाविक झोपलेले होते. मंदिराचे छत त्यांच्यावर कोसळले. तंजावुर जिल्ह्यातील नादिया या तरुणीचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर, दोन जखमींना रुग्णालयात दाखल केले.



तामिळनाडू येथील मैलापूर येथील कपालेश्वर मंदिराच्या वार्षिक महोत्सवादरम्यान रविवारी भगवान कपालेश्वराची रथयात्रा काढण्यात आली

## चित्रपट वार्ता

### 'मटका किंग'चा टीझर प्रदर्शित

**मुंबई** : विजय वर्मा 'मटका किंग' या मालिकेद्वारे ओटीटीवर पदार्पण करणार आहे. या मालिकेचा टीझर प्रदर्शित झाला आहे. प्राईम व्हिडीओने प्रदर्शनाची तारीखही जाहीर केली आहे. 'पॉट' हा शब्द उलट्या क्रमाने लिहिल्यास टॉप होतो आणि तिथेच एक राजा आहे. 'मटका किंग' १७ एप्रिल रोजी प्राईम व्हिडीओवर प्रदर्शित होत आहे, असे टीझर प्रदर्शित करीत, प्राईम व्हिडीओने इन्स्टाग्रामवर लिहिले. या पोस्टमध्ये मालिकेशी संबंधित सेलिब्रिटींना टॅग करण्यात आले होते. या मालिकेत विजय वर्मा, कृतिका कामरा, सई ताम्हणकर, सिद्धार्थ जाधव आणि इतर कलाकार आहेत. ही मालिका नागराज मंजुळे यांनी दिग्दर्शित केली आहे.




### 'धुरंधर-२' ठरला सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट

**मुंबई** : रणवीरसिंहचा चित्रपट 'धुरंधर : द रिव्हेंज' हा जगभरातील कमाईच्या बाबतीत सहावा सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट ठरला आहे. चित्रपटाचे जगभरातील कलेक्शन १,२२६.४४ कोटी रुपये झाले आहे. यामुळे त्याने कमाईच्या बाबतीत 'केजीएफ चॅप्टर-२' आणि 'जवान'ला मागे टाकले आहे. चित्रपटाने प्रदर्शनाच्या दहाव्या दिवशी भारतात ६२.८५ कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले. जगभरात १,२२६.४४ कोटी रुपयांचे ग्रॉस कलेक्शन केले आहे. 'धुरंधर'च्या पहिल्या भागाने भारत आणि आंतरराष्ट्रीय बॉक्स ऑफिसवर उत्कृष्ट कामगिरी केली आणि जगभरात सुमारे १,३०७ कोटी रुपये कमावले. ८९४.४९ कोटी रुपयांच्या कमाईसह हा हिंदी भाषेतील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला होता.



# उत्तर कोरियाचे अमेरिकेला आव्हान

## अमेरिकेवर मारा करू शकणाऱ्या क्षेपणास्त्र इंजिनची चाचणी

◆ **सेऊल, २९ मार्च**

उत्तर कोरियाने एका नवीन उच्च-शक्तीच्या घन-इंधन क्षेपणास्त्र इंजिनची चाचणी घेतली आहे. याची क्षमता अमेरिकेपर्यंत मारा करण्याची आहे. सर्वोच्च नेते किम जोंग उन यांनी यासंदर्भात माहिती देताना देशाची लष्करी क्षमता वाढवण्यासाठी हे महत्त्वपूर्ण असल्याचे म्हटले. ही चाचणी मारक क्षमता वाढवण्याच्या प्रयत्नांचा भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उन यांनी रविवारी क्षेपणास्त्र इंजिनच्या चाचणीची पाहणी केली. हे इंजिन एका सुधारित, उच्च-शक्तीच्या, घन-इंधन इंजिनवर आधारित आहे. अमेरिका आणि त्यांच्या मित्र राष्टांना लक्ष्य करू शकणाऱ्या शस्त्रास्त्रांचा विकास करण्याच्या मोहिमेंतर्गत इंजिन विकसित करण्यात आले. कोरियन सेंट्रल न्यूज एजन्सीने वृत्तात म्हटले की, हे इंजिन कार्बन फायबरपासून बनवलेले आहे. ही चाचणी देशाच्या अण्वस्त्र-सक्षम बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचे आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने असलेल्या पंचवार्षिक शस्त्र विकास कार्यक्रमाचा हा एक भाग आहे. किम जोंग उन म्हणाले की, या चाचणीने देशाची सामरिक शक्ती सर्वोच्च पातळीवर पोहोचवली आहे. तथापि, चाचणीची नेमकी वेळ आणि ठिकाण उघड केले नाही. (वृत्तसंस्था)

### इंजिनसाठी घेतली रशियाच्या मदत

**दक्षिण कोरियाचे नेते ली चुन-ग्युन म्हणाले, उत्तर कोरिया काही तपशील लपवत आहे. त्यांनी इंजिनच्या एकूण ज्वलन वेळेसारखी महत्त्वाची माहिती दिली नाही. उत्तर कोरियाने सप्टेंबरमधील चाचणीचे वर्णन घन-इंधन इंजिनची नववी आणि अंतिम जमिनीवरील चाचणी असे केले होते. रशियाच्या मदतीने क्षेपणास्त्र इंजिने विकसित करत आहेत. यामुळे अमेरिकेच्या संरक्षण यंत्रणेला असलेला धोका वाढेल.**

# जोराहाटमधील घरात स्फोट; दोन ठार

◆ **जोराहाट, २९ मार्च**

आसामच्या जोरहाट जिल्ह्यातील राजामैदाम न्यू कॉलनीमध्ये दुपारी घरात स्फोट झाला. या घटनेत एका मुलीसह दोन जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

मृतांची ओळख नूर मोहम्मद आणि नैना बेगम अशी पटली असल्याचे जोरहाटचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक सुभ्रजित बोरा यांनी सांगितले. जखमींमध्ये एका चिमुकलीचा आणि एका शेजाऱ्याचा समावेश आहे. सर्व जखमींना तत्काळ जोरहाट वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, मुलीची प्रकृती अजूनही चिंताजनक आहे. हा स्फोट भंगार विक्रेता भाड्याने राहत असलेल्या घरात झाला. स्फोटामुळे खोलीच्या भिंती पडल्या असून, जमिनीवर खड्डा पडला आणि शरीराचे अवयव विखुरले गेले. सुरुवातीला एलपीजी सिलेंडरच्या स्फोटाचा संशय होता. (वृत्तसंस्था)

# विदेशी प्रवाशांसाठी 'ई-अरायव्हल कार्ड' १ एप्रिलपासून अनिवार्य




◆ **नवी दिल्ली, २९ मार्च**

भारत सरकारने विदेशी प्रवाशांसाठी 'ई-अरायव्हल कार्ड' प्रणालीबाबत नवीन निर्णय लागू केला आहे. यानुसार १ एप्रिलपासून भारतात प्रवेश करणाऱ्या सर्व विदेशी नागरिकांना आगमनापूर्वी डिजिटल' ई-'अरायव्हल कार्ड' भरणे अनिवार्य ठरणार आहे.

हे प्रस्तावित नियम ७२ तासांच्या आत ऑनलाईन सादर करावे लागणार आहे. यामुळे पारंपरिक कागदी आगमन दाखला (डिसएम्बार्केशन कार्ड) रद्द केला जाईल. पर्यटन, व्यवसाय, अभ्यास किंवा इतर कारणांसाठी भारतात येणाऱ्या विदेशी नागरिकांना ७२ तासांच्या आत 'ई-अरायव्हील कार्ड' अधिकृत संकेतस्थळांद्वारे भरणे आवश्यक आहे. या नव्या डिजिटल पद्धतीचा उद्देश प्रवाशांची वाट पाहण्याची वेळ कमी करून, आगमन प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेगवान करणे हा आहे. आधीच्या कागदी पद्धतीत प्रवाशांना विमानात किंवा विमानतळावर घाईमध्ये माहिती भरावी लागायची. परंतु, आता ऑनलाईन पद्धत वापरल्याने हंगामाच्या वेळात आणि गर्दीतून मुक्त होण्यास मदत होणार आहे.

पूर्वीच्या परीक्षणानुसार काही प्रमुख विमानतळांवर या डिजिटल प्रणालीमुळे इमिग्रेशन काउंटरवरची प्रतीक्षा वेळ लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे कागदी आगमन कार्ड ३१ मार्चनंतर स्वीकारले जाणार नाही. डिजिटल प्रणाली ही भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रवास प्रक्रिया आधुनिकीकरणाचा एक भाग आहे आणि देशाचा प्रवेश अनुभव अधिक प्रभावी बनवण्यास मदत करेल, असे सरकारच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. नवीन नियम लागू झाल्यानंतर, विमानतळांवर आणि इमिग्रेशन कंट्रोल पॉइंटवर प्रवाशांना या डिजिटल प्रणालीचा वापर करण्याचा निर्देश देण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

### भरधाव कारला आग, तिघांचा होरपळून मृत्यू

◆ **बालाघाट, २९ मार्च**

मध्यप्रदेशच्या बालाघाट जिल्ह्यातील बैहर-मलाजखंड मार्गावरील केवलारी चौकाजवळ भरधाव कारला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील तीन सदस्यांचा होरपळून मृत्यू झाला, तर इतर दोघे गंभीर जखमी आहे. या घटनेत आठ वर्षांची मुलगी वाचली. हा अपघात शनिवारी मध्यरात्रीनंतर घडला. भरधाव अल्टो कारवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि ती दुभाजकाला धडकली, त्यानंतर कारला आग लागली. (वृत्तसंस्था)

## तातडीने पाहिजेत

सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील लोकप्रिय **दैनिक सोलापूर तरुण भारत** मध्ये तातडीने खालील पदांची भरती करावयाची आहे.

**१) डेस्क उपसंपादक — २ पदे**
**२) बातमीदार — ४ पदे**

किमान तीन वर्ष कामाचा अनुभव आवश्यक आहे. संगणकावर स्वतंत्रपणे काम करता येणे आवश्यक आहे. आकर्षक पगार. इच्छुकांनी तीन दिवसात अर्जासह समक्ष कार्यालयात भेटावे.

**संपर्क: ९८८११९१४४३**

पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# ऊर्जेतही हवी आत्मनिर्भरता

'ऊर्जा' हा शब्द केवळ वीज, पेट्रोल, गॅस किंवा कोळसा यापुरताच मर्यादित नाही; तो राष्ट्राच्या प्रगतीचा, स्वाभिमानाचा आणि सार्वभौमत्वाचा प्राणवायू आहे. जशी मानवी शरीरासाठी रक्ताभिसरण व्यवस्था अत्यावश्यक असते, तशीच अर्थव्यवस्थेसाठी ऊर्जा ही जीवनदायी रक्तवाहिनी आहे. या रक्तवाहिनीत बाह्य अवलंबित्वाचा अडथळा निर्माण झाला, तर राष्ट्राच्या प्रगतीचा प्रवाह कुंठित होतो. म्हणूनच भारतासारख्या विकसनशील आणि वेगाने उभारी घेत असलेल्या देशाने ऊर्जा सुरक्षेत आत्मनिर्भरतेचा दीप प्रज्वलित करणे काळाची गरज बनली आहे. मध्यपूर्वेत निर्माण झालेल्या संकटामुळे ही गरज अधिकच तीव्रतेने अधोरेखित झाली आहे. यापूर्वी अमेरिका-इराक युद्धामुळे काही प्रमाणात ऊर्जा संकट निर्माण झाले होते. भारताची ऊर्जा गरज दिवसेंदिवस वाढत आहे. औद्योगिकीकरणाच्या चाकांना गती देण्यासाठी, शहरीकरणाच्या लाटेला आधार देण्यासाठी आणि डिजिटल क्रांतीच्या मशालीला तेज देण्यासाठी प्रचंड प्रमाणात ऊर्जा आवश्यक आहे. परंतु, या ऊर्जेच्या गरजांसाठी भारत मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. कच्चे तेल, नैसर्गिक वायू यासारख्या संसाधनांसाठी विदेशी बाजारपेठेकडे हात पसरण्याची वेळ येते. हे परावलंबित्व म्हणजे जणू एखाद्या बलाढ्य योद्ध्याच्या पायात बांधलेली बेडीच आहे. त्यामुळे आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारणे अपरिहार्य ठरते.

ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न केवळ आर्थिक नसून तो राष्ट्रीय सुरक्षेशी निगडित आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या पटावर तेलाच्या किमतीचे चढ-उतार वादळी समुद्रातील लाटांसारखे असतात. या लाटांवर अवलंबून राहणारा देश कधीही अस्थिरतेच्या भोवऱ्यात अडकू शकतो. मध्यपूर्वेतील तणाव किंवा जागतिक संघर्षाचा थेट परिणाम भारताच्या ऊर्जा पुरवठ्यावर होतो आहे. अशा परिस्थितीत आत्मनिर्भरता म्हणजे वादळातही स्थिर राहणारा दीपस्तंभ असतो. आत्मनिर्भरतेचा मार्ग म्हणजे केवळ स्वदेशी उत्पादन वाढवणे नाही, तर ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण होय. भारताने सौर, पवन, जल आणि जैवऊर्जा यासारख्या नूतनीकरणक्षम स्रोतांकडे झेप घेतली आहे. सूर्य हा भारतासाठी जणू अखंड ऊर्जा देणारा सुवर्णकुंभ आहे. 'सौरऊर्जा' ही त्या कुंभातून ओतली जाणारी अमृतधारा आहे. राजस्थानच्या वाळवंटात उभारलेले सौरऊर्जा प्रकल्प, तामिळनाडूच्या किनाऱ्यावर फिरणाऱ्या पवनचक्क्या हे सारे आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेले भक्कम पाऊल आहे. पण आता अधिक वेगाने पुढे गेले पाहिजे. मध्यपूर्वेतील संकटामुळे देशात गॅस सिलेंडरची मागणी अचानक वाढली. भीतीपोटी लोक सिलेंडरचा साठा मोठ्या प्रमाणात घरांमध्ये करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या साठेबाजीवर अंकुश ठेवण्यासाठी पाईप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) आवश्यक आहे. पीएनजी ही नैसर्गिक वायू थेट घरांपर्यंत आणि उद्योगांपर्यंत सुरक्षित पाईपलाईनद्वारे पोहोचवण्याची प्रणाली होय. या प्रक्रियेत प्रथम जमिनीखालून किंवा समुद्रातून काढलेला नैसर्गिक वायू प्रक्रिया केंद्रात शुद्ध केला जातो. त्यानंतर उच्च दाबाने तो मुख्य पाईपलाईन नेटवर्कमध्ये पाठवला जातो. शहरांमध्ये 'सिटी गॅस डिस्ट्रिब्युशन' (सीजीडी) नेटवर्कद्वारे हा वायू कमी दाबात रूपांतरित करून घरगुती स्वयंपाक, उद्योग आणि वाहनांसाठी (सीएनजी) वापरला जातो. मीटरिंग प्रणालीमुळे वापरानुसार बिल आकारले जाते. त्यामुळे ही यंत्रणा सुरक्षित, स्वच्छ आणि कार्यक्षम मानली जाते. देशात पीएनजी यंत्रणा झपाट्याने विस्तारत असली, तरी त्यात आपण अद्याप पूर्ण आत्मनिर्भर झालेलो नाही. कारण, देशातील नैसर्गिक वायू उत्पादन मर्यादित आहे आणि मोठ्या प्रमाणावर 'लिक्विफाईड नॅचरल गॅस'(एलएनजी) आयात करावा लागतो. त्यामुळे पुरवठा साखळी अजून परावलंबी आहे. तथापि, सरकारकडून सीजीडी नेटवर्क विस्तार, गॅस पायाभूत सुविधा आणि स्थानिक उत्पादन वाढवण्यावर भर दिला जात आहे.

पेट्रोल-डिझेलला पर्याय म्हणून भारतात अनेक स्वदेशी इंधनाचे पर्याय वेगाने पुढे येत आहेत. यामध्ये प्रामुख्याने इथेनॉल, बायोडिझेल, सीएनजी, इलेक्ट्रिक वाहने आणि हरित हायड्रोजनचा समावेश आहे. इथेनॉल हे ऊस, मका यासारख्या कृषी उत्पादनांपासून तयार होणारे जैवइंधन आहे. भारतात २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे धोरण राबवले जात असून, हे जणू शेतातून थेट इंजिनपर्यंत पोहोचणारे इंधन आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्न आणि देशाला आयात कमी करण्याचा दुहेरी फायदा होतो. बायोडिझेल हे वनस्पती तेल किंवा वापरलेल्या तेलापासून तयार होते, ते डिझेलचा पर्याय ठरू शकते. सीएनजी आणि बायोगॅस हे स्वच्छ इंधन पर्याय आहेत. शेण, कृषी अवशेषांपासून तयार होणारा बायोगॅस म्हणजे ग्रामीण भारतासाठी ऊर्जा स्वावलंबनाचा दीप आहे. दुसरीकडे इलेक्ट्रिक वाहने ही इंधनमुक्त क्रांती घडवत आहेत. जर वीजनिर्मिती नूतनीकरणक्षम स्रोतांपासून झाली, तर इलेक्ट्रिक वाहने पूर्णपणे स्वदेशी आणि पर्यावरणपूरक ठरतात. हरित हायड्रोजन हा भविष्यातील सर्वांत महत्त्वाचा पर्याय मानला जातो. पाण्याचे विघटन करून तयार होणारे हे इंधन प्रदूषणमुक्त असून, भारत 'ग्रीन हायड्रोजन मिशन'द्वारे यात आघाडी घेण्याचा प्रयत्न करीत आहे. तथापि, आत्मनिर्भरतेचा वेग पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीवर अवलंबून आहे. इलेक्ट्रिक वाहने चार्जिंग नेटवर्क, गॅस पाईपलाईन, हायड्रोजन साठवणूक यासारखी आव्हाने आपल्यासमोर असली, तरी त्यातून मार्ग काढणे आवश्यक आहे.

ऊर्जा क्षेत्रातील आत्मनिर्भरता अशक्य नसली, तरी हा मार्ग निश्चितपणे सोपा नाही. यामध्ये गुंतवणूक, संशोधन, पायाभूत सुविधा आणि धोरणात्मक नियोजनाची आवश्यकता आहे. ग्रामीण भागात ऊर्जा पोहोचवणे, सौर प्रकल्पांसाठी जमीन उपलब्ध करणे आणि यासाठी असलेली भारताची इच्छाशक्ती म्हणजे पर्वतांवर चढणाऱ्या जिद्दी गिर्यारोहकांप्रमाणे आहे. ऊर्जा कार्यक्षमतेलाही तितकेच महत्त्व आहे. 'ऊर्जा बचत म्हणजे ऊर्जा निर्मिती' हे सूत्र आत्मसात करण्याची गरज आपल्याला आहे. एलईडी दिवे, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे आणि जनजागृती मोहिमा याद्वारे ऊर्जा वापर कमी करणे शक्य आहे. हे जणू लहान-लहान थेंब साठवून मोठा सागर निर्माण करण्यासारखे आहे. शेवटी ऊर्जा आत्मनिर्भरता म्हणजे केवळ आर्थिक स्वातंत्र्य नव्हे, तर राष्ट्राच्या आत्मसन्मानाचा प्रश्न आहे. जसे स्वातंत्र्य संग्रामात भारताने परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी संघर्ष केला, त्याचप्रमाणे आज ऊर्जा क्षेत्रात परावलंबित्वाच्या जोखडातून मुक्त होणे आवश्यक आहे. हा संघर्ष तलवारीचा नाही, तर तंत्रज्ञान, धोरण आणि जनसहभागाचा आहे. भारताने जर ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भरतेचा दीप प्रज्वलित केला, तर तो केवळ आपल्या देशालाच उजळवणार नाही, तर संपूर्ण जगासाठी मार्गदर्शक ठरेल. कारण, भारत हा केवळ एक देश नाही, तो संधीचा महासागर आहे. त्या महासागराला ऊर्जा आत्मनिर्भतेची लाट मिळाली, तर तो विकासाच्या किनाऱ्यावर अभूतपूर्व यशाची मोहर उमटवेल. ऊर्जा क्षेत्रातील आत्मनिर्भरता म्हणजे देशाच्या ऊर्जा गरजा देशांतर्गत स्रोतांद्वारे पूर्ण करण्याची क्षमता होय. ही आत्मनिर्भरता अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरते. भारताच्या वाढत्या अर्थव्यवस्थेसाठी ऊर्जा ही विकासाचा कणा मानली जाते. त्यामुळे ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबन प्राप्त झाल्यास त्याचे अनेक सकारात्मक परिणाम दिसून येतात. त्यामधील पहिला म्हणजे आयातीवरील अवलंबित्व कमी होते. भारत मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू आयात करतो. ऊर्जा आत्मनिर्भरतेमुळे विदेशी चलनाची बचत होते. त्यामुळे व्यापार तुटीवर नियंत्रण मिळते परिणामी देशाची आर्थिक स्थिरता मजबूत होते. ऊर्जा किमतीमध्ये स्थिरता येते. जागतिक बाजारातील किंमत चढ-उतारांचा देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर कमी परिणाम होतो. यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि स्पर्धात्मकता वाढते. ऊर्जा सुरक्षेत आत्मनिर्भरता म्हणजे भारताच्या भवितव्याचा पाया आहे. हा पाया जितका मजबूत असेल, तितकी प्रगतीची इमारत उंच आणि भक्कम उभी राहील. म्हणूनच, आजची गरज आहे ती ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबन, स्वाभिमान आणि सतत प्रगतीच्या संकल्पाची!

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# केवळ ४६० किलोंसाठी!

४६० किलो शुद्ध युरेनियम इराणजवळ असलेले हे युरेनियम ताब्यात घेण्यासाठी अमेरिका व इस्रायल यांनी इराणवर हल्ला चढविला असे आता सांगितले जाऊ लागले आहे. ट्रम्प मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रथमच इराणजवळ असलेल्या ४६० किलो युरेनियमची माहिती देण्यात आली. या युरेनियमचा वापर करून ११ अणुबॉम्ब तयार करता आले असते असेही या बैठकीत सांगण्यात आले. इराणजवळ आण्विक शस्त्रक्षमता असता कामा नये अशी अमेरिका व इस्रायलची भूमिका राहत आली आहे. इराणचे आण्विक संयंत्र २०२५ च्या जून महिन्यातच उद्‌ध्वस्त करण्यात आले होते. या संयंत्राचे जे काही अवशेष बाकी होते, ते हल्ल्याच्या पहिल्या दिवशी म्हणजे २८ फेब्रुवारीला संपविण्यात आले. मात्र, इराणजवळ असलेले ४६० किलो युरेनियम अद्याप अमेरिका व इस्रायलला ताब्यात घेता आलेले नाही. त्यासाठी ३२ दिवसांपासून सुरू असलेल्या युद्धात काही लाख टन गोळा बारुद वापरण्यात आला आहे. एकीकडे अमेरिका व इस्रायल आणि दुसरीकडे इराण, हिजबुल्ला यांनी काही लाख टन दारूगोळा एकमेकांवर डागला आहे. मात्र अद्याप तरी हे युरेनियम कुठे आहे याचा शोध अमेरिका व इस्रायलला घेता आलेला नाही.

**इराणचा अणुबॉम्ब** : इराणजवळ असलेले हे ४६० किलो युरेनियम ६० टक्के शुद्धतेचे असल्याचे मानले जाते. अणु ऊर्जा तयार करण्यासाठी ३ ते ५ टक्के शुद्ध युरेनियम वापरले जाते तर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी वापरले जाणारे युरेनियम किमान ९० टक्के शुद्धतेचे असावे लागते. इराणने हा टप्पा अद्याप गाठला नसल्याने तो अणुबॉम्ब तयार करण्याच्या स्थितीत पूर्वीही नव्हता व आजही नाही.

**ओबामा करार** : इराणच्या आण्विक कार्यक्रमाला २०१६ मध्ये तत्कालीन अमेरिकन राष्ट्रपती बराक ओबामा यांनी कायदेशीर लगाम घातला होता. इराण एका विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक युरेनियम शुद्ध करणार नाही अशा करारावर इराणने सही केली होती. आंतरराष्ट्रीय आण्विक संस्थेकडून इराणच्या आण्विक संयंत्राचे वेळोवेळी परीक्षण-निरीक्षण केले जाण्याची तरतूद त्यात करण्यात आली होती. त्यालाही इराणने मान्यता दिली होती. विशेष म्हणजे या करारावर चीन व रशिया यांनीही सह्या केल्या होत्या. २०१६ च्या कराराचा परिणाम म्हणजे इराण, युरेनियम शुद्धतेचा ६० ते ९० टक्के हा निर्णायक टप्पा गाठू शकत नव्हता. मग, इराणजवळ असलेले ४६० किलो युरेनियम ताब्यात घेण्यासाठी अमेरिका व इस्रायल यांना एवढा अट्टहास करण्याची काय गरज होती? या दोन देशांनी केवळ मध्यपूर्वेला नाही साऱ्या जगाला जणू अंधारयुगाकडे लोटले आहे. विशेष म्हणजे इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू इराणविरुद्ध युद्ध सुरू करतील असा अंदाज माजी राष्ट्रपती बिल क्लिंटन यांनी ८ महिन्यांपूर्वी वर्तविला होता.

**युरेनियमचा काळाबाजर** : अमेरिका व इस्रायल यांनी हे युरेनियम ताब्यात घेतले तरी त्यामुळे काही इराणचा आण्विक कार्यक्रम संपणार नाही. आंतरराष्ट्रीय काळ्याबाजारात अशुद्ध युरेनियम उपलब्ध आहे. याशिवाय चीन-रशिया हे दोन देश इराणला सर्व प्रकारची मदत करण्यास सज्ज बसले आहेत. उत्तर कोरियाने अणुबॉम्ब तयार केला आहे, तो केवळ चीनच्या मदतीने. उद्या चीन इराणला युरेनियमचा पुरवठा करील. त्याचा उपयोग करीत इराण अणुबॉम्ब तयार करील.

**पुन्हा एकदा चीन** : भारत-पाकिस्तान संघर्षात पाकिस्तानने वापरलेली बहुतेक क्षेपणास्त्रे चिनी बनावटीची होती. आज इराण वापरत असलेली सारी प्रक्षेपणास्त्रे चिनी बनावटीची आहेत. इराण ज्या अचूकपणे लांब पल्ला असलेली प्रक्षेपणास्त्रे वापरीत आहे, ती त्याने स्वतः विकसित केलेली नाहीत. त्याला ती चीनकडून मिळालेली आहेत आणि एवढी साधी बाब अमेरिकेला समजू नये? काही आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या मते राष्ट्रपती ट्रम्प आता आपल्या सल्लागारांचेही ऐकेनासे झाले आहेत.

**संयुक्त वायुसाठा** : खार्गे द्वीप हे इराण व कतार यांच्या मालकीचे संयुक्त वायुक्षेत्र असून तेथे जगातील सर्वांत मोठा वायुसाठा असल्याचे म्हटले जाते. यावर अमेरिकेने हल्ला चढविल्यानंतर इराणने कतारच्या वायुसंयंत्रावर हल्ला चढविला. यात कतारचे झालेले नुकसान अभूतपूर्व असल्याचे सांगितले जाते. हे संयंत्र दुरुस्त करण्यासाठी किमान एक वर्ष लागेल तर त्याचे उत्पादन पूर्ववत होण्यासाठी ३ ते ५ वर्ष लागतील असे सांगितले जात आहे.

**२० वर्ष माघारले** : मध्यपूर्वेतील देशांनी मागील काही दशकात मोठी आर्थिक प्रगती केली होती. हे सारे देश आता किमान २० वर्षांनी माघारले असल्याचे सांगितले जात आहे. दुसऱ्या शब्दात एक दिवस युद्ध सुरू राहणे याचा अर्थ मध्यपूर्वेतील देश एका वर्षाने माघारणे असा काढला जातो. मध्यपूर्वेतील जागांच्या किमती घसरल्या आहेत. आजवर हा भाग सुरक्षित व समृद्ध मानला जात होता. जगातील अनेक धनाढ्य मंडळींनी दुबईत मोठमोठ्या जागा खरेदी केल्या होत्या. त्या साऱ्यावर आता कुलूप लागण्याची वेळ आली आहे. मात्र, आता हा मुद्दा केवळ खाडी देशांपुरता मर्यादित न राहता तो जागतिक झाला आहे आणि याचा दुहेरी फटका भारतालाही बसणार आहे. एकीकडे ऊर्जा संकट आणि दुसरीकडे खाडी देशांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या एक कोटी भारतीयांवर येऊ शकणारे संकट, अशी दुधारी तलवार भारतावर राहणार आहे.

**कोविडनंतर** : २०२० मध्ये कोरोना विषाणूचा धुमाकूळ सुरू झाल्यानंतर साऱ्या जगात आर्थिक प्रगतीचा वेग मंदावला होता. भारतही त्याला अपवाद नव्हता. मात्र आता भारताची अर्थव्यवस्था कोविडच्या धक्क्यातून सावरू लागली होती. आर्थिक प्रगतीचा वेग वाढू लागला होता. त्याचे प्रतिबिंब २८ फेब्रुवारी रोजी देशाच्या संसदेत- लोकसभेत सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात दिसत होते. मात्र हा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर काही तासांच्या आत अमेरिका-इस्रायल यांनी इराणवर हल्ला चढविला आणि त्याच दिवशी या अर्थसंकल्पाला एक प्रकारचे ग्रहण लागले.

**रुपयाची घसरण** : युद्ध सुरू झाल्यापासूनच्या ३० दिवसांत डॉलर तीन रुपयांनी महाग झाला आहे. म्हणजे रुपया कमजोर झाला आहे. याचा आर्थिक बोजा अर्थव्यवस्थेवर पडणार आहे. या साऱ्या घटनाक्रमामुळे अर्थमंत्र्यांच्या चेहऱ्यावर चिंतेच्या रेषा उमटणार आहेत. कारण, एकीकडे महागाईचा भडका अणि दुसरीकडे डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरगुंडी या दोन संकटांनी भारताला ग्रासले आहे. एकीकडे खाडी संकट आणि दुसरीकडे महागाईची खाई अशा खिंडीत भारताची अर्थव्यवस्था सापडणार आहे.

**जागतिक नुकसान** : दुसरीकडे इराणजवळ गमावण्यासारखे काहीच नाही. याउलट अमेरिकेजवळ गमावण्यासारखे खूप काही आहे. आर्थिक सुबत्ता, आखाती देशांमधून मिळणारा पैसा, त्यातून अमेरिकन कंपन्यांची होणारी भरभराट या साऱ्या बाबींबर आता युद्धाचे ढग जमा झाले आहेत. इराणची संहारक क्षमता एवढी विध्वंसक असेल याचा अंदाज अमेरिकन प्रशासनाला करता आला नाही. मात्र प्रत्यक्षात याचा प्रत्यय आल्यानंतर राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराणसोबत शांतता-सहकार्याची चर्चा सुरू केली आहे.

**अस्थिर नेता** : एका व्यक्तीची अस्थिर मानसिकता साऱ्या जगाला किती व कशी अस्थिर करू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प. आज ते जे बोलतात, २४ तासांत त्यांची भूमिका बदललेली असते. उपराष्ट्रपती व्हान्स, परराष्ट्रमंत्री मार्क रुबियो आणि संरक्षणमंत्री हे तिघेही आतून हादरलेले असल्याचे म्हटले जाते. कारण, ट्रम्प केव्हा काय करतील यावर त्यांचाही भरवसा नाही. स्वाभविकच इराण त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवण्यास तयार नाही. ट्रम्प यांनी खरोखरीच इराणच्या ऊर्जा केंद्रांवर हल्ले केल्यास, त्याची प्रतिक्रिया मध्यपूर्वेत उमटेल. आणि याची प्रतिक्रिया म्हणजे भारतात ऊर्जा संकट तयार होईल.

अमेरिकेने इराणमधील वीज केंद्रे उद्‌ध्वस्त केल्यास, अंधारयुग केवळ या एका देशात येणार नाही तर साऱ्या जगावर त्याचे सावट पडलेले असेल.

## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# 'तिच्या' हाती सत्तेची दोरी!

आपल्याकडे फार पूर्वीपासून म्हटले जाते, 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी'. घरातील माता काय करू शकते, हे काही वेगळ्याने सांगायलाच नको. घराला आकार देणारी, मुलांना घडवणारी, घरात आणि बाहेरचे जग यात समतोल साधणारी अशी ही घरातील आई असते. ती खऱ्या अर्थाने घरातील व्यवस्थेचा कणा असते. मुळात, स्त्री ही कौटुंबिकच नव्हे तर सामाजिक व्यवस्थेच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा किंबहुना अविभाज्य घटक आहे. म्हणून जसजसा काळ बदलला तसा स्त्रीच्या घरातील आणि समाजातील अस्तित्वाचा विचार वेगळ्या पद्धतीने व्हायला लागला. जाहिरात क्षेत्रातील तज्ज्ञांना तुम्ही विचारले तर त्यांचे कामही स्त्रीच्या भोवतीच असल्याचे दिसेल. कारण कंपन्यांच्या दृष्टीने टार्गेट कस्टमर महत्त्वाचा असतो. म्हणून त्यांच्यासाठी देखील स्त्री महत्त्वाची ठरली.

यातून नंतर महिला आरक्षण हा विषय आला. त्याच्या बाता मारून अनेक पक्ष, नेते मोठे झाले, हा इतिहास आहे. 'महिला सक्षमीकरण' हा विषय तर आजही नेत्यांसाठी परवलीचा शब्दप्रयोग आहे. मागील काही वर्षांत तर घरातील स्त्रीचा स्वाभिमान आणि तिचे आर्थिक परावलंबित्व हा विषय ऐरणीवर आला. त्याला 'एनकॅश' करण्याची कल्पना राजकीय नेत्यांच्या डोक्यात आली आणि तिथून सुरू झाल्या महिलाविषयक विविध योजना. या योजनांनी अशी काही जादूची कांडी फिरवली की राज्यांमधील सत्ता पालटल्या. अनेक दशकांपासून राज्य करत असलेले राजकीय पक्ष अशा एका योजनेच्या घोषणेने अक्षरशः सत्तेबाहेर फेकले गेले. एखादा 'ट्रेंड' जेव्हा सुरू होतो तेव्हा त्याची यशस्विता पाहून तोच कित्ता गिरवला जातो. नेमका हाच प्रकार महिलांविषयीच्या योजनांबाबत घडला. आता जो उठतो तो महिलांसाठी योजना जाहीर करतो आणि महिला मतदारांना आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न करतो.

आता पाच राज्यातील निवडणुकीतही तेच चित्र दिसत आहे. पुढील महिन्यात ५ राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. यापैकी चार राज्ये अशी आहेत, ज्यांनी विजयाच्या कथित फॉर्म्युल्यावर म्हणजेच रोख हस्तांतरणावर मोठा डाव लावला आहे. चारही राज्ये महिलांच्या बँक खात्यात थेट २४,५०० कोटी रुपये हस्तांतरित करत आहेत. निवडणुकीचे वचनही हेच आहे की, सत्तेत आल्यास असेच ५ वर्षे पैसे खात्यांमध्ये जात राहतील.

तामिळनाडू सरकारने २-२ हजार रुपये स्पेशल समर पॅकेजच्या नावाखाली महिलांच्या खात्यात जमा केले. आसामच्या सरकारने बिहू साजरा करण्यासाठी ४-४ हजार रुपये दिले. केरळच्या डाव्या सरकारनेही स्त्री सुखम रोख योजना आणली. १० लाख महिलांना दरमहा १-१ हजार रुपये मिळत आहेत. बंगालच्या तृणमूल सरकारने तर फेब्रुवारीमध्ये लक्ष्मी भंडार योजनेत ५०० रु. वाढवले आहेत.

खराब आर्थिक परिस्थिती असूनही ममता बॅनर्जींच्या तृणमूल सरकारला पुढील वर्षी ५ हजार कोटी रुपये द्यावे लागतील. याच योजनेने २०२१ च्या निवडणुकीत ममतांना विजय मिळवून दिला होता. चारही राज्यांमध्ये सर्व योजनांच्या लाभार्थी महिलांची संख्या ४.१ कोटी आहे, तर एकूण मतदार १७.८९ कोटी आहेत. म्हणजेच या रोख योजनांच्या एकूण लाभार्थी २३ टक्के आहेत.

गेल्या पाच वर्षांतील निवडणुकांचा ट्रेंड पाहिल्यास असे दिसून येते की, महिलांना रोख रक्कम हस्तांतरित करणाऱ्या राज्यांची संख्या एकवरून १५ झाली आहे. ही राज्ये १३ कोटींहून अधिक महिलांना वार्षिक २.४६ लाख कोटी रुपयांपर्यंत रोख रक्कम हस्तांतरित करत आहेत, जी या राज्यांच्या एकूण अर्थसंकल्पाच्या ०.७ टक्के आहे. झारखंडसारखे राज्य आपल्या ग्रामीण विकासाच्या एकूण अर्थसंकल्पाचा ८१ टक्के हिस्सा महिलांना रोख हस्तांतरणात देत आहे.

परंतु, ट्रेंड असाही आहे की, जी राज्ये विकास योजना थांबवून रोख योजनांवर खर्च करत आहेत, तिथे अनेक योजना सुरू होऊ शकत नाहीत. मुळात, राजकीय पक्षांनी हे लक्षात घ्यावे की, केवळ अशा योजना फार काळ चालणार नाहीत. राजस्थान हे त्याचे सर्वांत मोठे उदाहरण आहे. येथे इंदिरा महिला सन्मान योजनाही काँग्रेस सरकारला वाचवू शकली नाही. त्यामुळे या ठिकाणी डॉ. कलाम यांनी दिलेला फॉर्म्यूलाच राजकीय पक्षांनी अंगीकारला पाहिजे. कलाम म्हणाले होते की, मुद्यांचे, व्यक्तींचे राजकारण करण्यापेक्षा विकासाचे राजकारण करा. केवळ मोफत योजना आणि फुकट पैसे वाटून विकास साधता येणार नाही. स्त्रियांसाठी सन्मान योजना असाव्यात पण, त्याला कालमर्यादा असावी. त्याची कल्पना राजकीय पक्षांनी निवडणुकीच्या काळातच द्यावी. फुकट आणि आयत्या मिळालेल्या गोष्टींची किंमत राहत नाही, हे कायम लक्षात असू द्यावे. स्त्रीने देखील अशा योजनांचा आधार शोधण्यापेक्षा स्वावलंबी होण्यावर भर द्यावा. यामुळे जास्त चांगला आदर्श ती कुटुंब आणि समाजासमोर प्रस्थापित करू शकते.

७७५५९३८८२२

## कानोसा

अमोल पुसदकर

# बुद्धिमतां वरिष्ठम्

हनुमंताची स्तुती करताना आपण म्हणतो, ''मनोजवं मारुततुल्यवेगम्'', या श्लोकामध्ये हनुमंताचे वर्णन करताना आपण म्हणतो की हनुमंत बुद्धिमतां वरिष्ठम् आहे. म्हणजे बुद्धिमान लोकांमध्येही वरिष्ठ आहे, श्रेष्ठ आहे. रामायणामध्ये हनुमंताची भूमिका बघताना पदोपदी त्याच्या असीम सामर्थ्याचा आणि बुद्धिमत्तेचा परिचय मिळतो.

सीतेचा शोध घेण्यासाठी वानर वनामध्ये फिरत असताना अनेक दिवस लोटूनही सीता त्यांना सापडत नाही. तेव्हा ते शोध घेत घेत एका विवरामध्ये प्रवेश करतात. तेथे स्वयंप्रभा नावाची एक वृद्ध तपस्विनी तपश्चर्या करीत असते. त्या जागेचे महत्त्व असे असते की तेथे प्रवेश करणारा कोणीही जिवंत तेथून बाहेर जाऊ शकत नाही.

अशा ठिकाणी वानरांसहित हनुमान तेथे प्रवेश करतो. परंतु स्वयंप्रभा ज्यावेळेस हनुमंताला विचारते की, ''तुम्ही कोण आहात? येथे कशासाठी आले आहात?'' त्यावेळेला हनुमान तिला सांगतो की, ''आम्ही रामाचे सेवक असून सीतेचा शोध घेत येथे आलो आहोत. आपल्याला त्रास देण्याचा आमचा कुठलाही हेतू नाही.'' अशा पद्धतीचे उत्तम भाषण हनुमान करतो. त्यामुळे स्वयंप्रभा संतुष्ट होते व त्यांना समुद्रकिनाऱ्यावर जाण्याचा मार्ग सांगते व एवढेच नव्हे तर त्या सर्वांना ती डोळे मिटायला सांगून वानरांसहित हनुमंताला समुद्रकिनाऱ्यावर एका क्षणात पोहोचवते. यामध्ये सुद्धा हनुमंताच्या वक्तृत्वकलेचा परिचय आपल्याला मिळतो.

आपल्याला माहिती आहे की, हनुमान हा असीम सामर्थ्याचा होता, तरीही त्याला त्याच्या शक्तीचा विसर पडलेला होता. समुद्र कसा पार करावा, याचा विचार ज्या वेळेला सर्व वानर करीत होते, त्यावेळेस जांबुवंत हनुमंताला त्याच्या शक्तीची आठवण करून देतो व त्यानंतर हनुमान तत्काळ रामकार्य करण्यासाठी लंकेला जायला सिद्ध होतो.

आकाशमार्गाने हनुमान ज्या वेळेला जात असतो, त्या वेळेला नागमाता सुरसा त्याची परीक्षा घेण्याकरिता समुद्रातून बाहेर येते व हनुमंताचा मार्ग अडवते. ती हनुमंताला म्हणते की, ''मला भूक लागलेली आहे, त्यामुळे तू माझ्या तोंडामध्ये प्रवेश कर.'' हनुमंत म्हणतो की, ''मला रामकार्यासाठी ताबडतोब जायचे आहे,'' तरीही ती त्याचा रस्ता सोडत नाही. त्यामुळे हनुमंत आपले स्वरूप विशाल करतो. ती सुद्धा आपला जबडा खूप मोठा करते. असे करता करता हनुमंताचे शरीर विशाल होत जाते व तिचा जबडा सुद्धा विशाल होत जातो. शेवटी हनुमान तत्काळ आपले लघुरूप घेतो व तिच्या तोंडामध्ये प्रवेश करून लगेच बाहेर येतो व तिला म्हणतो की, ''तू मला तुझ्या तोंडात प्रवेश करायला सांगितले होते. मी तुझ्या तोंडामध्ये प्रवेश करून आलो आहे. त्यामुळे आता तू मला जाऊ दे.'' अशा प्रकारे हनुमंताने आपल्या बुद्धीचा उपयोग करून आपला मार्ग मोकळा करून घेतलेला आहे. लंकेमध्ये प्रवेश करताना सुद्धा त्याने रात्रीचा वेळ निवडलेला आहे. तो असीम पराक्रमी असून सुद्धा त्याने मांजरा एवढे छोटे रूप धारण केले व लंकिनी या राक्षसीचा पराभव केल्यावर तो सीतेचा शोध घेत लंकेमध्ये फिरू लागला. जेव्हा सीता कुठेही मिळत नाही, त्यावेळेस तो अशोकवाटिकेमध्ये प्रवेश करतो व तेथे सीता त्याला दिसते. सीता दुःखी असते, रावणामुळे भयभीत झालेली असते. त्यामुळे हनुमान तिच्यासमोर एकदम प्रकट होत नाही, तर तो तिच्या जवळच्या एका झाडावर बसून राहतो व हलक्या आवाजामध्ये रामकथा म्हणायला सुरुवात करतो. रामकथेचा आवाज सीतेच्या कानावर ज्या वेळेला पडतो, त्यावेळेला ती हळूहळू हनुमंताकडे बघते, तिची भीती कमी होते व ती हनुमंताशी प्रश्नोत्तरे करते. त्यानंतर हनुमान तिच्यासमोर प्रकट होतो व तिला रामाने दिलेली अंगठी देतो. यावरून सुद्धा संकटात असलेल्या व्यक्तीची मदत कशी केली पाहिजे, हे आपल्या लक्षात येते.



सीतेचा शोध तर लागलेला असतो, म्हणजे मुख्य कार्य संपन्न झालेले असते; तरीसुद्धा एखादे मुख्य कार्य करताना अनेक छोटे-छोटे कार्य उत्पन्न होतात. तर बुद्धिमान पुरुष त्या कार्यांनाही करून टाकत असतो. त्यामुळे हनुमंताला वाटते की रावण कसा आहे, त्याचे सैन्य कसे आहे, त्यांचे बल किती आहे व माझे बल किती आहे, याचा थोडासा अंदाज घेतला पाहिजे आणि यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे. म्हणून तो अशोकवाटिकेमध्ये उपद्रव करतो. त्यामुळे रावण त्याच्या ऐंशी हजार किंकर सैन्याला पाठवतो. हनुमंत त्या सर्वांना सांगतो की, ''अरे, मी तर एक सामान्य वानर आहे. तुम्ही इतके हजारो राक्षस माझ्यासाठी युद्ध करायला आलेले आहात; परंतु बघा, मी तुमच्या सगळ्यांचा कसा पराभव करतो. आमचे राजे सुग्रीव यांच्याकडे माझ्यासारखे हजारो वानर आहेत, जे रामासोबत लंकेला येतील व तुमच्या सर्व राक्षस सैन्याचा पराभव करतील.''

हनुमान असे पाहिले तर सुग्रीवाच्या सैन्यातला सर्वोत्कृष्ट आणि सर्वांत बलशाली होता; परंतु तरीही तो आपल्या सैन्याचे वर्णन करताना नम्रतेने सांगतो की, ''माझ्यापेक्षाही अधिक बलशाली वानर आमच्याकडे आहेत.'' म्हणजे मी जर तुमच्या सगळ्यांचा पराभव करू शकतो, तर बाकीचे आले तर तुमचे काय होईल, अशा पद्धतीची भीती तो त्यांच्या मनात निर्माण करतो. हनुमंताचे हे कृत्य म्हणजे आजच्या आधुनिक युद्धाच्या भाषेत ''सायकोलॉजिकल वॉरफेअर'' म्हणजेच मानसिक युद्ध आहे. लंकादहनाच्या वेळी हनुमान रावणाचा मंत्री प्रहस्त याच्या महालावर जाऊन बसला व त्याने त्याच्या महालाला आग लावली. त्यानंतर हनुमंताने महापार्श्व, अतिकाय, शुक, सारण, जांबूमाली, सुमाली इत्यादी अनेक प्रमुख राक्षस वीरांच्या महालांना आग लावली. फक्त बिभीषणाचे घर हनुमंताने सोडून दिले. यावरून विध्वंस करत असतानासुद्धा चांगल्या लोकांना त्रास होऊ नये, हा हनुमंताचा हेतू कायम होता. आपल्या महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेल्या समर्थ रामदास स्वामी आणि अनेक संतांनी रामासोबतच हनुमंताची उपासना सुद्धा लोकांना सांगितलेली आहे. हनुमान नुसताच शक्तिमान नव्हता, तर तो बुद्धिमान होता. हनुमंताची भक्ती व बलोपासनेमुळेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यामध्ये सामील होण्यासाठी मुघलांच्या काळामध्ये तरुण निर्माण झाले व त्यांच्यामध्ये गुलामगिरी झुगारून देण्याची भावना निर्माण झाली. हनुमंताची भक्ती म्हणजे सामर्थ्याची भक्ती आहे, बुद्धिमत्तेची भक्ती आहे. हनुमानाच्या या सर्व शक्तींचे स्मरण आपण केले पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### अपघात कमी करण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन आवश्यक

तरुण भारतात स्कूटरवर तीन मुलं जातानाचे छायाचित्र नुकतेच प्रकाशित झाले आहे. या छायाचित्रात दोन मुलं समोर व एक मुलगा मागे तोंड करून बसलेला आहे आणि त्या तिसऱ्या मुलाच्या हातात मोबाईल आहे व यापैकी कोणीही हेल्मेट घातलेले नाही. तसेच एका छायाचित्रात छोटा स्विमिंग ट्रॅक दुचाकीवरून नेताना दोघांचे छायाचित्र प्रसिद्ध झाले आहे. छायाचित्रकारांना असे नियम न पाळणारे मुलं व लोक दिसतात. आपल्यालाही अशी मुलं जी हेल्मेट न घालता दुचाकीवर त्रिपल सीट जाताना दिसतात. हे प्रकार रस्ते अपघातांसाठी कारणीभूत ठरतात. आपल्याला प्रत्येक चौकात सिग्नल तोडणाऱ्या व्यक्ती दिसतात. नियम न पाळणाऱ्या व्यक्तींसाठी चौकामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत की नाही? ते कार्यरत आहेत की नाही? अशी शंका आहे. दुचाकीस्वारांसाठी जेव्हा हेल्मेट आवश्यक केले तेव्हा बरेच लोक हेल्मेट न घालता दिसायचे, परंतु जेव्हा हेल्मेट न घालणाऱ्यांना हजार रुपये दंड आकारण्यात आला तेव्हापासून आता ८० ते ९० टक्के लोक हेल्मेट घालूनच दुचाकी चालवताना दिसतात. रस्ते अपघात कमी करावयाचे असतील तर वाहतूक विभागाने सीसीटीव्ही कॅमेरे योजना कार्यान्वित करावी व वाहतूक नियम न पाळणाऱ्यांना योग्य तो दंड आकारण्यात यावा, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### लोणार सरोवराचे संवर्धन होणे आवश्यक

आपल्या राज्यातील जागतिक वारसा असलेल्या लोणार सरोवरातील पाण्याची वाढती पातळी हा जागतिक चिंतेचा विषय झाला आहे. देशातील महत्त्वाचे भूवैज्ञानिक वैभव म्हणून लोणारच्या सरोवराकडे पाहिले जाते. बुलढाणा जिल्ह्यातील हे ठिकाण हजारो पर्यटकांचे आकर्षणाचे स्थळ झाले आहे. सुमारे १.८८ किलोमीटर व्यासाच्या उल्काविवरात निर्माण झालेले खाऱ्या पाण्याचे आणि अत्यंत अल्कधर्मी स्वरूपाचे हे सरोवर पृथ्वीवरील एक नैसर्गिक आश्चर्य मानले जाते. केंद्र सरकारकडून लोणार सरोवराला नॅशनल जिओ हेरिटेज साईट म्हणून अलीकडेच घोषित करण्यात आले. बेसाल्टीक खडकात घडलेल्या या सरोवराचे संवर्धन आणि जतन होण्यासाठी व्यापक पातळीवर प्रयत्न झाले पाहिजे. पर्यटनाचा विकास करण्यासाठीदेखील ही बाब महत्त्वाची ठरू शकते.

मागील वर्षी देशातच नव्हे तर महाराष्ट्रातदेखील सरासरीपेक्षा अधिक पर्जन्यवृष्टी झाली आहे. त्याचा परिणाम म्हणून या सरोवरात जास्त पाणी येणे साहजिकच बाब आहे. सरोवराच्या जलपातळीत आणि विस्तारात वाढ का होते आणि ती कशी थांबवावी याबद्दल; सध्या तज्ज्ञांमध्ये विचारविमर्श सुरू आहे. पर्जन्यमान हे नेहमीच बेभरवशाचे असते. त्यामध्ये काहीवेळा कमी तर कधी जास्त पाऊस पडणे ही नैसर्गिक क्रियाच आहे. पुढील काही वर्षांत कमी पाऊस पडल्यास उन्हाळ्याच्या दिवसात लोणार सरोवरातील पाण्याचे बाष्पीभवन होण्याचे प्रमाणही वाढू शकते. लोणार सरोवरासारख्या पाणथळ जागा स्थानिक रहिवाशांना अन्न, पाणी, फायबर, भूजल पुनर्भरण, जलशुद्धीकरण, पूर आणि धूप नियंत्रण तसेच हवामान नियमन यासारखी महत्त्वपूर्ण संसाधने आणि परिसंस्था सेवांची विस्तृत साखळी पुरवत असतात. मात्र, अलीकडच्या काळात विकासाच्या नावावर पर्यावरण ऱ्हासाला हातभार लावला जात आहे. परिणामी पाणथळ जागा नष्ट होत चालल्या आहेत. लोणार सरोवरासारखे जागतिक महत्त्वाचे स्थळ टिकवून ठेवण्यासाठी या परिसरातील पर्यावरणाचे संतुलन सांभाळावे लागणार आहे. अन्यथा लोणार निसर्गाच्या पोटात लुप्त होऊन जाण्यास काही वेळ लागणार नाही.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### ५ किलो गॅस सिलेंडरचा तुटवडा; कामगार उपाशीपोटी

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे गॅसचा तुटवडा भासत असून त्याचा मोठा फटका पुणे परिसरातील मोशी, चिंबळी, चाकण शहरातील कामगार वर्गाला बसत आहे. चाकण हे कामगारांचे शहर म्हणून ओळखले जात असून येथे मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग ५ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरवर अवलंबून आहे. मात्र सध्या गॅस तुटवड्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅस एजन्सीकडे दररोज केवळ ४० ते ५० सिलेंडर उपलब्ध होत असल्याने ''जे लवकर पोहोचतील त्यांनाच सिलेंडर मिळेल'' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हे कामगार रात्रीपासूनच रांग लावून ठेवत आहेत. एवढेच नव्हे तर सिलेंडरसाठी नंबर लावून हे कामगार जिथे जागा मिळेल तिथे झोपून रात्र काढत आहेत, जेणेकरून त्यांना सिलेंडर उपलब्ध होईल. काही व्यावसायिक अवैधरीत्या घरगुती सिलेंडरमधील गॅस काढून पाच किलोचे सिलेंडर भरून देतात. त्याला पूर्वी किलोमागे शंभर रुपये घ्यायचे. आता त्याचेही दर वाढल्याने परप्रांतीय कामगारांना उपाशीपोटी राहावे लागते. कामगारांनी प्रशासनाकडे ५ किलो व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा वाढवण्याची मागणी केली आहे.

**नितीन दुर्बुडे**/९५०३६४८६३०

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### पोलिस खात्यात निवडीबद्दल जय सदाफुले यांचा सत्कार

**टेंभुर्णी, दि. २९ मार्च-**
टेंभूर्णी (ता. माढा) येथील होमगार्ड मध्ये पाच वर्षांपासून कार्यरत असलेले जय रामेश्वर सदाफुले याची महाराष्ट्र पोलीस दलामध्ये सोलापूर ग्रामीणमध्ये नुकत्याच झालेल्या भरतीमधून पोलीस कॉन्स्टेबलपदी निवड झालेबद्दल त्याचा फेटा बांधून शाल, श्रीफळ भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सचिन जगताप, शिवसेना तालुका उपप्रमुख सुरेश लोंढे, महामानव प्रतिष्ठानचे यशपाल लोंढे, शिवसेनेचे माजी शहरप्रमुख सोपान ढगे, पत्रकार संतोष वाघमारे, आशिष लोंढे, सुमीत गायकवाड उपस्थित होते.



### डॉ. आंबेडकर पुतळ्याच्या कामाची दिल्लीत पाहणी

**इंदु मिल येथील स्मारकाला गती देण्याची मागणी**

**मुंबई, दि. २९ मार्च-**
मुंबईतील इंदू मिल येथे उभारल्या जाणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकात उभारण्यात येणाऱ्या डॉ. आंबेडकर यांच्या पुतळा कामाची विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांनी शिष्टमंडळासह दिल्ली दौऱ्यादरम्यान गाझियाबाद येथील शिल्पकार राम सुतार यांच्या स्टुडिओमध्ये भेट देऊन पाहणी केली. यासंदर्भात मुख्यमंत्री यांची भेट घेऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करणार असल्याचे बनसोडे यांनी स्पष्ट केले. २०१८ मध्ये या प्रकल्पाचे कंत्राट राम सुतार यांच्या कारखान्याला देण्यात आले असून, वाढीव खर्चामुळे निर्माण झालेली तफावत तातडीने कंत्राटदाराला देण्याची गरज असल्याचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांनी सांगितले. यासंदर्भात मुख्यमंत्री यांची भेट घेऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सध्या ३५० फ ूट उंचीच्या पुतळ्यापैकी सुमारे ५० फूट काम पूर्ण झाले असून, बूट व पँटचा काही भाग तयार झाला आहे. उर्वरित काम गाझियाबाद येथे सुरू आहे. प्रकल्प २०२७ पर्यंत पूर्ण होण्याचे उद्दिष्ट असले तरी, विलंब होऊन २०२८ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दादर येथील चैत्यभूमीजवळील ४.८४ हेक्टर जागेवर उभारण्यात येणाऱ्या या स्मारकात ४५० फूट उंच 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज' हा मुख्य आकर्षण राहणार आहे. यामध्ये ग्रंथालय, प्रदर्शन केंद्र, ध्यान हॉल, ३६० अंश दृश्य गॅलरी आणि उद्यानाचा समावेश आहे. अंदाजे १ हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प भविष्यात देश-विदेशातील अनुयायांसाठी प्रमुख पर्यटन व प्रेरणास्थळ ठरेल, असा विश्वास बनसोडे यांनी व्यक्त केला. या पाहणीवेळी नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष प्रा. सुनील मगरे, बाळासाहेब कर्डक, संजय औसरमल, अतुल जगताप, दशरथ कसबे, बाळासाहेब गायकवाड, बबन शिंदे, मिलिंद रामटेके, डॉ. विजय आंबुरे, नागसेन कांबळे, अरुण साबळे, नितीन जाधव, संतोष नरवडे, उमेश सोनवणे, संजय खंदारे, सुरेश बनसोडे, बाळासाहेब सोनकांबळे, गौतम धावणे, शंकरराव घेवंदे, सुधाकर बागुल, सुरेश काळे, रुपेश कुमार गवई, विनोद पट्टेबहादूर, संदीप बेलखेडे, प्रशांत झांबरे, तानाजी वडवे, महेंद्र शिरसाट, गणेश पुजारी, राजेंद्र जाधव, प्रसाद पाटणकर, रमाकांत धावणे आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### उजनी सिंचन विभागाकडे शेतकऱ्यांनी पाणी मागणी फॉर्म भरा

**नियमांचे पालन करा अन्यथा दंडात्मक कारवाई : मेजर सलगर**

**मंगळवेढा दि. २९ मार्च-**
उजनी सिंचन विभागाचे प्रमुख अधिकारी मेजर दशरथ सलगर यांनी शेतकऱ्यांना उन्हाळी पाणी वितरणाबाबत अत्यंत कठोर सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यातील कोरड्या कालावस्थेत शेतकऱ्यांना पिकांसाठी पाण्याची तीव्र गरज असताना, अनुचित वागणुकीवर दंडात्मक कारवाई होईल, असा इशारा दिला.

ज्या शेतकऱ्यांना पाण्याची मागणी करायची आहे, त्यांनी आज आणि उद्या ऑफिसमध्ये फॉर्म भरावा. अन्यथा नंतर वादविवाद करणे निरर्थक राहील, असे सलगर यांनी स्पष्ट केले.ज्यांनी आधीच फॉर्म भरले आहेत, त्यांच्या शेतात पाणी जाण्याचा ओढा, नाला किंवा मार्ग सुस्थितीत असावा. पाणी वितरणादरम्यान कोणत्याही शेतकऱ्याने अडचण निर्माण केल्यास महाराष्ट्र सिंचन कायदा १९७६ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल. वितरण 'टेल टू हेड' पद्धतीने होत असल्याने, टेलच्या शेतकऱ्यांना प्राधान्य मिळेल. हेडच्या शेतकऱ्यांनी पाणी अडवण्याचा किंवा चोरून घेण्याचा प्रयत्न केल्यास दंड बसणार आहे.

**दंड होण्याजोगे प्रकार:**
ओढा/नाल्यात पाणी मागणी करून स्वतःहून दरवाजे उघडणे. पाईपलाइन किंवा साईफन सिस्टमद्वारे अनधिकृत पाणी उपसणे. म ोटरधारक शेतकऱ्यांनी रीच सर फॉर्म न भरणे. सलगर म्हणाले, पाणी व्यवस्थापन ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. प्रशासनाला पूर्ण सहकार्य करा. तसेच, ३० मार्च (सोमवार, मार्चचा शेवटचा दिवस) पर्यंत सिंचन पाणीपट्टी भरण्याचे आवाहन केले.

पाणीपट्टी दिलेल्यांनी पावती घ्यावी आणि उन्हाळी हंगामासाठी फॉर्म भरा. सदर सुविधा शेतकऱ्यांसाठीच असली तरी नियमांचे काटेकोर पालन आवश्यक आहे. दरम्यान, पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी उजनी विभागाकडे अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने अडचणी येत आहेत. सध्या केवळ मर्यादित मनुष्यबळ उपलब्ध असून, पाणी वितरण, देखरेख आणि फॉर्म प्रक्रियेसाठी पुरेसे हात नाहीत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. विभागास चार अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी तात्काळ प्रयत्न करावेत, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांनी या सूचनांचे गांभीर्याने पालन करून पाणीटंचाई टाळावी, असे मत व्यक्त केले जात आहे.

# समर्थ, रॉयल्स, शिवशंभो, ग्लोबल वॉरियर्स संघांची विजयी घौडदौड

**इंडियन मॉडेल पेरेंट्स क्रिकेट लीग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**
येथील रेल्वे मैदानावर सुरू असलेल्या 'इंडियन मॉडेल पेरेंट्स क्रिकेट लीग' १६व्या पर्वात समर्थ, रॉयल्स, शिवशंभो व ग्लोबर वॉरियिरस संघाची विजयी घोडदौड केली आहे.

शनिवारी झालेल्या सामन्यात रॉयल्सने मॉडर्न संघावर ७ गडी राखून हरविले. दुसऱ्या सामन्यात समर्थ संघाने थंडरला ४ गडी राखून नमविले. शुक्रवारी झालेल्या पहिल्या सामन्यात शिवशंभो संघाने


महेश आरकाल


एकनाथ शिंदे


महादेव वरळे


इस्माईल पिरजादे

अल्फा संघावर ५ गडी राखून विजय मिळविला. दुसऱ्या सामन्यात ग्लोबल वॉरियर्सने माऊली मास्टर्स ३३ धावांनी मात केली. महेश आरकाल (४२ धावा २ बळी), एकनाथ शिंदे (१३ धावा २ बळी), महादेव वरळे (३-१३), इस्माईल पिरजादे (३४ धावा व २/६) हे सामन्याचे मानकरी ठरले.

**संक्षिप्त धावफलक**
**मॉडर्न:** १२ षटकांत ९ बाद ९०. (अंबादास तोरा १४, अहमद शेख १४, अब्दुल पिरजादे १४, महेश अरकाल २/१६, प्रमोद मेंगपल्ली २/१६) **पराभूत विरुद्ध रॉयल्स:** ११.१ षटकांत २ बाद ९४ (महेश अरकाल नाबाद ४२, शरणप्पा पालोली नाबाद २९, बालाजी बोल्ली १२. हाजी तांबोळी, नितीन कोडमुर प्रत्येकी १ बळी).

**थंडर:** १२ षटकांत १० बाद ८४. (प्रवीण नरोटे १६, अजिंक्य माने १३, अमोल पांढरे १२ धावा, एकनाथ शिंदे २/११). **पराभूत विरुद्ध समर्थ :** १०.२ षटकांत ७ बाद ८५ धावा. (सिराज शेख नाबाद २७, इम्तियाज अत्तार १७, एकनाथ शिंदे १३. प्रभूराज चितापुरे ३/५, अजिंक्य माने २/४).

**अल्फा:** १० षटकांत सर्वबाद ७३ (मुकद्दर शेख ११, मोहसिन शेख नाबाद ११, महादेव वरळे ३/१३, श्रीकांत कुरापाटी २/५) **पराभूत विरुध्द शिवशंभो:** ५ षटकांत ७७ धावा. (अनिरुद्ध एक्कलदेवी नाबाद १६, राकेश उदिगिरी नाबाद १६, अंबाजी कडरा ११. अनिल जाधव २/११).

**ग्लोबल वॉरियर्स:** ११ षटकांत सर्वबाद ९२ धावा. (इस्माईल पिरजादे ३४, सुनील कडरे २३. जयराज मडोळे ३/१३) **विजयी विरुद्ध माऊली मास्टर्स:** १० षटकांत सर्वबाद ५९ धावा. (अतुल परदेशी नाबाद १४, जावेद नाईकवाडी १०, इस्माईल पिरजादे २/६, मल्लिकार्जुन आवटे २/११, राजेश शर्मा २/७, मुकुंद वाघमारे २/१८).

## चिमुरड्यांच्या हाती झाडू; ग्राम स्वच्छता मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**
येथील ग्रामदैवत श्री धुळी महांकाळेश्वर यात्रा महोत्सव व श्री हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून शिंगडगाव ग्रामविकास मंच, स्वामी विवेकानंद हायस्कूल आणि समस्त ग्रामस्थांच्या वतीने 'ग्राम स्वच्छता मोहीम २०२६' उत्साहात पार पडली. स्वच्छ गाव, सुंदर गाव, आमचे शिंगडगाव या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या या मोहिमेत विद्यार्थ्यांनी आणि ग्रामस्थांनी संपूर्ण गाव चकाचक केले.

रविवारी सकाळी ८ वाजता श्री धुळी महांकाळेश्वर मंदिर येथून मोहिमेला सुरुवात करण्यात आली. गावातील मुख्य मार्ग, चौक आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करत ही मोहीम ग्रामपंचायत समोरील श्री चन्नवीर शिवाचार्य स्वामी मठ येथे समारोप झाली. यावेळी बोलताना ग्रामविकास मंचच्या प्रतिनिधींनी सांगितले की, स्वच्छता ही केवळ



एक दिवसाची मोहीम नसून ती प्रत्येकाच्या मनामनात भिनली पाहिजे. गाव स्वच्छ राहिल्यास आरोग्य सुधारेल आणि गावाचे सौंदर्य वाढेल. सहभागी विद्यार्थी आणि शिक्षकांनी घोषणाबाजी करत ग्रामस्थांना स्वच्छतेचा संदेश दिला. या मोहिमेसाठी रविशंकर बोधले सर यांच्या वतीने सर्व सहभागींसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. शिंगडगाव ग्रामविकास मंचच्या नियोजनाखाली ही मोहीम यशस्वीरित्या संपन्न झाली असून, ग्रामस्थांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. याप्रसंगी ग्रामसेवक जेऊरे, महारुद्र बडूरे, मल्लिकार्जुन पनशेट्टी, मुख्याध्यापक सुभाष भिमणवरू व सर्व शिक्षक वर्ग आणि विद्यार्थी, चन्नवीर भिमणवरु, शिवानंद बोधले सर, दिनेश अचलेरे, सुनील भिमणवरु, उमेश कोरे, मल्लिनाथ बाळगी, सतीश बोधले, गंगाधर कोरे, सिद्धाराम अचलेरे, अमोल पाटील, बाबुशा बडूरे, चाँद शेख/नदाफ, राम व्हनकडे सर, सुशांत स्वामी, मल्लिकार्जुन बडूरे, संगमेश्वर फताटे, शरणप्पा मोळे, महिला बचत गटाच्या अंबिका म्हेत्रे/गुरव, भाग्यश्री बंडे आणि विविध मंडळांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रिलस्टार कुस्तीपटू सोनाली मंडलिकचा कुस्तीला अखेरचा रामराम

**महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेतील पराभवानंतर घेतला निर्णय**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च -**
सोलापुरातील हरीभाई प्रशालेच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या ४ थी महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत ओपनमध्ये निवड न झाल्यामुळे अहिल्यानगरची रीलस्टार कुस्तीपटू सोनाली मंडलिक हिने कुस्तीला अखेरचा रामराम केला आहे.पहिल्या दिवशी अपेक्षा पाटील हिच्याकडून सोनाली हिला पराभवाचा धक्का बसला. त्यांनतर स्वतःच्या प्लॅटफॉर्मवर तिने अश्रूंना वाट मोकळी करत आपण आर्थिक अडचणीमुळे, स्पॉन्सरशीप व खुराक मिळू न शकल्यामुळे तसेच ओपनला खेळण्यासाठी ६५ च्या पुढे वजन न वाढल्यामुळे आपणास स्पर्धेतून बाहेर पडावे लागले असल्याची खंत बोलून दाखवली आहे.

सोनाली मंडलिक ही अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील कापरेवाडी येथील एक प्रतिभावंत महिला कुस्तीपटू आहे. खेलो इंडिया मध्ये तिने सुवर्ण पदक पटकावलेले आहे.गरिबीमधून तिने संघर्ष करत राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख



निर्माण केली . मात्र सोलापुरातील चौथी महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत निवड न झाल्यामुळे तिने कुस्तीला रामराम ठोकण्यात आल्याची घोषणा केली आहे.

सोनाली मंडलिकिने अत्यंत कठीण परिस्थितीतून कोणत्याही साधनांशिवाय पत्र्याच्या शेडमध्ये असलेल्या तालमीमध्ये कुस्तीला सुरुवात केली.

ओतूर येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत तिने चांदीची गदा आणि रोख पुरस्कार जिंकला आहे. सोनाली हिच्या कुस्तीमुळे आदर्श घेऊन अनेक महिला कुस्तीपटूंनी राज्यभरात नाव मिळवले आहे.

मात्र सोलापुरातील महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेत ओपन गटात निवड होऊ न शकल्यामुळे नाराज झालेल्या सोनाली मंडलिकने तातडीने सोलापूर सोडले आणि सोशल मीडियावर रडत रडत कुस्तीला रामराम करत असल्याची घोषणा केल्यामुळे महिला कुस्ती खेळाडूंमध्ये चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

## वडवळ येथे 1 ते 3 एप्रिल व्याख्यानमालेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २९ मार्च-**
मोहोळचे माजी उपसभापती स्व.भाऊसाहेब मोरे यांच्या ७८ व्या जयंतीनिमित्त ज्ञानेश्वर मोरे बिगरशेती ग्रामीण पतपुरवठा संस्था वडवळ यांच्या वतीने लोकरत्न भाऊसाहेब मोरे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन वडवळ (ता. मोहोळ ) येथे करण्यात आले आहे. बुधवार दि. १ एप्रिल ते शुक्रवार दि. ३ एप्रिल २०२६ या कालावधीत ही तीन दिवसीय व्याख्यानमाला जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा वडवळ येथील मैदानात होणार आहे.

बुधवार दि. १ एप्रिल रोजी सायं. ७ वा. पोपटबुवा शिवपुजे खर्गे महाराज आणि आकाशबुवा शिवपुजे खर्गे महाराज यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उदघाटन होईल. यावेळी नूतन जि.प. सदस्य सचिन जाधव, विमल खताळ, बालाजी नरुटे, लखन शिंदे यांचा सत्कार होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील असणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार यशवंत माने उपस्थित असणार आहेत. सायं. ७.३० वा. व्याख्यानमालेचे पहिले पुष्प राहुल गिरी (गेवराई) हे गुंफणार आहेत. संस्काराची शिदोरी वर्तमान पिढीची जबाबदारी हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. गुरुवार दि.२ एप्रिल रोजी सायं. ७.३० वा. व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प दि. २ एप्रिल रोजी प्रबोधनकार गणेश शिंदे (अहिल्यानगर) हे गुंफणार आहेत हे जीवन सुंदर आहे हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. शुक्रवार दि. ३ एप्रिल रोजी ७.३० वा. तिसरे पुष्प शिवव्याख्याते ज्ञानदेव काशिद (बीड) हे गुंफणार आहेत. असा राजा होणे नाही हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. अध्यक्षस्थानी उपनिबंधक सहकारी संस्था मोहोळ सुमित कवडे व प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक निबंधक एस. टी. तेलंगरे असणार आहेत. कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन पतसंस्थेचे चेअरमन राहुल मोरे यांनी केले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बापूसाहेब दळवे, सूर्यकांत मोरे, शाहू धनवे, सुशांत मोरे, निलेश व्यवहारे, संतोष पवार, दीपक काकडे, अमोल शिंदे, लक्ष्मण मळगे, बापू शिंदे व भाऊसाहेब मोरे प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

## शिवीगाळ का केली असे विचारले असता चाकूने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**
भिमनगर उळे येथील घरासमोर जाऊन दि. २७ मार्च रोजी विकी नारायण गायकवाड, वय ३१, रा. उळे, ता. दक्षिण सोलापूर येथे विनाकारण शिवीगाळ का केला असे विचारलेच्या कारणावरून चाकूने नारायण जालिंदर गायकवाड यांच्या छातीवर पोटावर वार केला. त्यावेळी सोडवण्यास गेले असता विकी गायकवाड यांच्या डाव्या बाजूच्या काकेखाली तसेच भाऊ आदर्श यांच्या छातीवर पोटावर आते भाऊ राहुल सर्वगोड यांच्या उजव्या गुडघ्यावर व दीपक अरुण वडवेराव यांच्या हातावर वार करून गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. याबाबत सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात दि. २८ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास घोडके करत आहेत.

## महिलांनी घर आणि चूल या पलीकडेही जगावे

**उपजिल्हाधिकारी अंजली मरोड; निसर्गाच्या सानिध्यात एकता महिला मंचचा जल्लोष**

**तभा वृतसेवा**
**वैराग दि. २९ मार्च-**
ग्रामीण भागातील महिलांनी केवळ घर आणि चूल यापुरते मर्यादित न राहता आपल्या हक्काचा आनंद घेतला पाहिजे. स्वतःच्या आयुष्यासाठी वेळ काढून जगण्याची नवीन उमेद निर्माण करणे आवश्यक आहे. एकता महिला मंचने आयोजित केलेला हा उपक्रम कौतुकास्पद असून, अशा कार्यक्रमांमुळे म हिलांच्या आत्मविश्वासात वाढ होते, असे मत उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांनी व्यक्त केले.

धकाधकीच्या आयुष्यातून स्वतःसाठी थोडा वेळ काढून निसर्गाच्या कुशीत मनसोक्त जगण्याचा आनंद 'एकता महिला मंच'च्या सदस्यांनी लुटला. वैराग येथील 'प्रशांजली ग्रो टुरिझम' मध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'वन डे फुल्ली एन्जॉय ट्रिप'मध्ये महिलांनी विविध खेळ, गाणी आणि गप्पांच्या मैफिलीत आपला दिवस उत्साहात साजरा केला. त्यावेळी ते बोलत होते.



कार्यक्रमात महिलांसाठी संगीत खुर्ची, गाण्याच्या भेंड्या अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्या महिलांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. निसर्गरम्य वातावरणात महिलांनी पाळणे, झोका आणि कृत्रिम धबधब्यांचा मनसोक्त आनंद घेतला. 'मड हाऊस' (मातीचे घर) हे या सहलीचे खास आकर्षण ठरले. महिलांनी एकमेकींसोबत सेल्फी काढत आणि मनमोकळ्या गप्पा मारत आपला दिवस संस्मरणीय बनवला. एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी यावेळी सांगितले की, महिलांच्या कलागुणांना वाव देणे आणि त्यांना मानसिक विरंगुळा मिळवून देणे हा या ट्रिपचा मुख्य हेतू होता. ग्रामीण भागातील महिलांना एकत्र आणून त्यांना पाठबळ देण्याचे काम मंच सातत्याने करत राहील. सूत्रसंचालन सुचिता कुटे यांनी केले, तर प्रास्ताविक रेश्मा मुकटे यांनी मांडले. शेवटी आशा विभुते यांनी आभार मानले. याप्रसंगी गीतांजली जोशी, लक्ष्मी सुतार, रेश्मा मुकटे,स्वाती शिंदे,सुचिता कुटे सुनिता नवले, शामबाला सुतार, पद्मजा आवटे, राणी गवळी, सारिका जाधव,आशा विभुते,मनीषा गवळी, रत्नप्रभा गायकवाड, प्रगती कासार, वंदना कासार, रेणुका चौगुले, सुनिता जांभळे, प्रभावती साबळे, शितल दीक्षित, सुचिता कासार उपस्थित होत्या.

## दहा जणांनी मिळून केली मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**
राहते घर, उळे, ता. दक्षिण सोलापूर येथे दि. २७ मार्च रोजी नारायण गायकवाड, बुद्धभूषण उर्फ विकी गायकवाड, यल्लाप्पा सर्वगोड, सुनील गायकवाड, सुरज गायकवाड, आदर्श गायकवाड, प्रज्ञा आकांक्षा गायकवाड, मनीषा गायकवाड सर्व रा. ओळी ता. दक्षिण सोलापूर सुरते रा. सुरतगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव व इतर दोन ते तीन जणांनी मिळून साक्षी रतिकांत गायकवाड, वय २४ उळे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर यांच्या पतीला मारहाण करून दमदाटी केली. तसेच जाऊ भाग्यश्री यांना मारहाणी मध्ये काहीतरी लागल्याने हाताला जखम झाली व शिवीगाळ केली. याबाबत दहा जणांविरोधात सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात दि. २८ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास भंडारी करत आहेत.

Classifieds

**पाहिजेत**
पार्ट-फुल टाईम
राहत्या घरातून
ऑनलाईन, ऑफलाईन
काम करून अधिक
इन्कम मिळवा.
संधी सार्वांसाठी.
प्रियांका मॅडम
मो. 9226340650

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

### जाहीर नोटीस

ता. २९/०३/२०२६

तमाम लोकांस विशेषतः बार्शी नगरपरिषद ता. बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डी. सोलापूर सब. डी. व तालूका बार्शी पैकी बार्शी म्युनिसीपल हद्दीतील बिनशेती गट नंबर ९७७/१ मधील प्लॉट नं. १८ क्षेत्र १२४.00 चौ. मी. चे चौ. फुट १३३४.२४, याची चतुः सिमा पुर्वेसः ०९.00 मीटर रुंदीचा रस्ता, दक्षिणेसः सदर गट नंबर पैकी प्लॉट नंबर १९, पश्चिमेसः सदर गट नंबर पैकी प्लॉट नंबर १५. व उत्तरेसः- सदर गट नंबर पैकी प्लॉट नंबर १७ आहे. ही खुली प्लॉट जागा श्री देवदत्त सोपानराव मोरे. यांचे खरेदी यांचे मालकीच्या असुन हक्कपत्रकी त्यांचे नाव दाखल आहे. सदरच्या मिळकती हया आमचे पक्षकार यांनी खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकती हया निर्वे ध व निजोखमी असल्याचा निर्वाळा खरेदी देणार यांनी आमचे पक्षकारास दिलेला आहे. आमचे पक्षकार यांनी सदर जागेची बाजार भावाने होणारी योग्य ती किंमत देऊन खरेदी घेण्याचे ठरविले असुन तसा करार खरेदी देणार व आमचे पक्षकार यांचे दरम्यान झालेला आहे व इसारादेखील दिलेला आहे.

तरीदेखील वर नमुद मिळकतीसंबंधाने कोणाचेही कसलेही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास उदा. साठे-करार, खरेदीखत, गहाण, दान, लीज, लीन, पोटगीहक्क, वारसाहक्क, फेडपत्र, भाडेपट्टा, टाच, बोजा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्याची शाबिती संबंधिताने ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन सात दिवसात कागदपत्रानिशी आमचे ऑफीसमध्ये येऊन तशी आमच्या पक्षकाराची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कसलीही लेखी हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असुन सदर मिळकतीशी कोणाचाही कसलाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही, व असल्यास त्याने तो स्वतः होऊन सोडून दिलेला आहे असे समजुन खरेदी व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून कोणाचीही, कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. मुदतबाह्य तक्रारींचा विचार केला जाणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सर्वांच्या माहितीकरिता हे जाहिर प्रसिध्दिकरण केले असे. ता. २९/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. प्रवीण पी. करंजकर**
**''रघु कुल'', कर्मवीर नगर, पाटील प्लॉट,**
**बार्शी. ४१३४११ मो. नं. ९८२२०६५६६१**

### जाहीर प्रसिध्दीकरण

अर्ज-वारस प्रमाणपत्र मिळणेचा
दिवाणी किरकोळ अर्ज नं. १७/२०२६ नि.५

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर साहेब यांचे न्यायालयात**

१) **श्री. मधूकर खंडू कापसे,**
वय - ६७ वर्षे, धंदा - पेन्शनर,
२) **श्री. अजिंक्य मधूकर कापसे,**
वय - ३४ वर्षे, धंदा - व्यापार,
३) **श्री. आदित्य मधूकर कापसे,**
वय - ३२ वर्षे, धंदा - व्यवसाय,
अर्जदार नं. १ ते ४ सर्व रा. ७३९/४/२७,
'दिव्यरत्न' पाटील प्लॉट, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** - **सामनेवाला**

१) ज्याअर्थी, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज यातील अर्जदार नं. १ ची पत्नी व अर्जदार नं.२ व ३ ची आई सुनिता मधुकर कापसे व अर्जदार १ ची मुलगी व अर्जदार नं. २ व ३ ची बहिण मयूरी मधुकर कापसे यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत व तसे वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता या मे. कोर्टात दाखल केला आहे.

२) त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, वर नमुद अर्जदारांचे अर्जातील मागणी व विधाना संबंधाने जर कोणाचेही आक्षेप असतील तर हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेली ता. ३०/०४/२०२६ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विधीज्ञामार्फत हजर होऊन आपले तकारी, हरकती लेखी स्वरुपात सादर करावयात अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टात पुढील हुकूम होतील.


हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे. ता. २७/०३/२०२६

| सही/- | शिक्का | सही/- |
|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | | सहाय्यक अधिक्षक |





## महत्त्वाचे

### १९ वर्षीय किमी अँटोनेली जपानिज ग्रांप्री रेस विजेता



**सुझुका** : मर्सिडीजच्या १९ वर्षीय इटालियन किमी अँटोनेलीने रविवारी झालेल्या जपानिज ग्रँड प्रिक्समध्ये मॅकलारेनच्या ऑस्कर पियास्ट्रीला मागे टाकत आपली सलग दुसरी फॉर्म्युला वन शर्यत जिंकली आहे. अँटोनेलीने ऑस्ट्रेलियन ड्रायव्हर पियास्ट्रीवर १३.७ सेकंदांची मोठी आघाडी घेतली. फेरारीचा चार्ल्स लेक्लेर्क तिसऱ्या, तर मर्सिडीजचा जॉर्ज रसेल चौथ्या स्थानी राहिला. मध्य जपानमधील सुझुका सर्किटवर वसंत ऋतूतील एका निरभ्र, सूर्यप्रकाशित दुपारी झालेल्या या शर्यतीत मॅकलारेनचा लँडो नॉरिस पाचव्या, तर फेरारीचा लुईस हॅमिल्टन सहाव्या स्थानी राहिला. दोन आठवड्यांपूर्वी चीनमध्ये अँटोनेलीने आपल्या कारकिर्दीतील पहिली फॉर्म्युला वन शर्यत जिंकली होती व तो इतिहासातील दुसरा सर्वात तरुण विजेता ठरला आहे. यापूर्वीचा सर्वात तरुण विजेता २०१६ मध्ये वयाच्या १८ व्या वर्षी मॅक्स व्हर्स्टेपेन होता. चीनमध्येही अँटोनेलीने पोल पोझिशनवरून विजय मिळवला होता. तीन शर्यतींमधून अँटोनेलीने ७२ गुण मिळवले असून, तो आता या हंगामातील ड्रायव्हर्सच्या क्रमवारीत अव्वल स्थानी पोहोचणारा सर्वात तरुण ड्रायव्हर ठरला आहे. चॅम्पियनशिपबद्दल आताच विचार करणे खूप घाईचे होईल, पण आमची स्थिती चांगली आहे, असे अँटोनेली म्हणाला.

### कोको गॉफला हरवून सबालेन्का विजेती



**मियामी** : बेलारूसच्या आर्यना सबालेन्काने महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात कोको गॉफला ६-२, ४-६, ६-३ असे हरवून मियामी ओपन टेनिस स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या सबालेन्काने, चौथ्या क्रमांकावर असलेल्या गॉफवर पहिल्या आणि तिसऱ्या सेटमध्ये आपल्या जबरदस्त ग्राऊंडस्ट्रोक विनर्सच्या जोरावर मात केली आणि २०२२ मध्ये इगा स्वियाटेकनंतर सनशाईन डबल (एकाच हंगामात इंडियन वेल्स आणि त्यानंतर मियामी स्पर्धा जिंकणे) पूर्ण करणारी ती पहिली खेळाडू ठरली. गॉफच्या मूळ गावी होणाऱ्या मियामी ओपन स्पर्धेत सबालेन्काचे हे सलग दुसरे विजेतेपद होते. या विजयाबरोबरच सबालेन्काचा गॉफविरुद्धच्या विजयाचा रेकॉर्ड ७-६ असा झाला. कोकोने मला एक चांगली खेळाडू होण्यासाठी प्रेरित केले आहे, असे सबालेन्का म्हणाली. हा सामना २ तास, ११ मिनिटे चालला आणि गॉफची चौथ्यांदा सर्व्हिस ब्रेक झाल्यावर एका वाइड बॅकहँडमुळे तो संपला. सबालेन्काने आपले २४ वे व्यावसायिक विजेतेपद पटकावले.



### चेन्नई सुपर किंग्सचा ब्रेविस आयपीएलच्या सुरुवातीच्या २-३ सामन्यांमधून बाहेर

**मुंबई** : आयपीएल २०२६ मध्ये चेन्नई सुपर किंग्सचा डेवाल्ड ब्रेविस सुरुवातीच्या २-३ सामन्यांमधून बाहेर पडला आहे. वृत्त अहवालानुसार, ब्रेविसला साइड स्ट्रेनचा त्रास होत आहे. एक दिवसापूर्वी एमएस धोनी देखील दोन आठवड्यांसाठी संघाबाहेर झाला होता. ब्रेविसच्या जागी मॅथ्यू शॉर्ट किंवा सरफराज खानला संधी मिळू शकते. चेन्नई सुपर किंग्स आपला पहिला सामना ३० मार्च रोजी राजस्थान रॉयल्सविरुद्ध खेळेल. त्यानंतर संघ पंजाब किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी भिडेल. चेन्नईचा वेगवान गोलंदाज नॅथन एलिस हे हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे संपूर्ण हंगामातून बाहेर झाले आहेत. त्यांच्या जागी स्पेन्सर जॉन्सनला संघात समाविष्ट करण्यात आले आहे.

# रहाणे, रघुवंशीची अर्धशतके

### मुंबई इंडियन्सविरुद्ध केकेआर ४ बाद २२०







◆ **मुंबई, २९ मार्च**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी वानखेडे स्टेडियमवर कर्णधार अजिंक्य रहाणे व युवा फलंदाज अंगकृश रघुवंशीच्या दमदार अर्धशतकी खेळीच्या जोरावर कोलकाता नाईट रायडर्सने मुंबई इंडियन्सविरुद्ध मर्यादित २० षटकांत ४ बाद २२० धावा उभारल्या आणि मुंबई इंडियन्ससमोर विजयासाठी २२१ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले.

पाच वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्स संघाचा कर्णधार हार्दिक पांड्याने नाणेफेक जिंकून केकेआरला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. कर्णधार अजिंक्य रहाणे व फिन ॲलनने केकेआरच्या डावाची झकास सुरुवात केली. या दोघांनीही मुंबईच्या गोलंदाजांचा जबरदस्त सामना केला व पहिल्या गड्यासाठी ६९ धावांची भागीदारी केली, मात्र ही जमलेली जोडी शार्दुल ठाकूरने फोडली. तिलक वर्माकडून झेलबाद होण्यापूर्वी फिन ॲलनने १७ चेंडूंत ६ चौकार व २ षट्काराच्या मदतीने ३७ धावांची खेळी केली. पुढे अनुभवी रहाणेने कॅमरोन ग्रीनच्या मदतीने केकेआरला शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला. कॅमरोन ग्रीन फटकेबाजी करण्याच्या नादात असताना तो शार्दुल ठाकूरच्या गोलंदाजीत डीप मिडविकेटवर रदरफोर्डकडून झेलबाद झाला. ग्रीनने १० चेंडूंत १८ धावांची भर घातली.

अनुभवी रहाणे व युवा खेळाडू अंगकृश रघुवंशी यांची खेळपट्टीवर चांगली जोडी जमली, त्यांनी तिसऱ्या गड्यासाठी ३६ धावांची भागीदारी करून संघाला दीडशे धावांच्या जवळपास आणले. शार्दुल ठाकूरने अजिंक्य रहाणेच्या रुपाने आपला तिसरा बळी मिळविला. रहाणेने अवघ्या ४० चेंडूंत ३ चौकार व ५ षट्कारांसह ६७ धावांचे योगदान दिले.

अंगकृश रघुवंशीची फटकेबाजी सुरुच राहिली. त्याने रिंकू सिंगच्या मदतीने केकेआरच्या धावसंख्या वाढविण्याचा चांगला प्रयत्न केला. हार्दिक पांड्याने अंगकृश रघुवंशीला तिलक वर्माकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. रघुवंशीने आपल्या बॅटची चमक दाखवित २९ चेंडूंत ५१ धावांची अर्धशतकी खेळी केली, यात त्याने ६ चौकार व २ षट्कार खेचलेत. रघुवंशीने रिंकूसोबत चौथ्या गड्यासाठी ६० धावांची भागीदारी करून केकेआरला दोनशे धावांचा टप्पा ओलांडून दिला. पुढे रिंकू सिंगने रमणदीप सिंगच्या साथीने नाबाद खेळी करीत केकेआरला मर्यादित २० षटकांत ४ बाद २२० धावांचा टप्पा गाठून दिला. रिंकू सिंगने २१ चेंडूंत ४ चौकारांसह नाबाद ३३ धावांची, तर रमणदीप सिंगने नाबाद ४ धावांची खेळी केली.

मुंबई इंडियन्सकडून शार्दुल ठाकूरने ३ बळी, तर हार्दिक पांड्याने एक बळी टिपण्यात यश मिळविले. (वृत्तसंस्था)

# यवतमाळच्या साक्षी बुरकुलेला सुवर्ण

### पहिली खेलो इंडिया वनवासी क्रीडा

◆ **रायपूर, २९ मार्च**

येथे सुरू असलेल्या पहिल्या खेलो इंडिया वनवासी क्रीडा स्पर्धेत महिलांच्या भारोत्तोलन स्पर्धेत यवतमाळ, महाराष्ट्राच्या साक्षी बुरकुलेने सुवर्णपदक पटकावले. भारोत्तोलनाच्या ८६ किलो वजन गटात सर्वाधिक एकूण १५० किलो वजन पेलून साक्षी बुरकुलेने पदार्पणातच सुवर्णपदकाचा करिश्मा घडविला.

साक्षीने स्नॅच प्रकारात ६८ किलो व क्लीन ॲण्ड जर्कमध्ये ८२ किलो असे एकूण १५० किलो वजन उचलून अव्वल स्थान पटकावले. यजमान छत्तीसगडच्या रूषिका कश्यपने १२१ किलोसह रौप्यपदक जिंकले. ११८ किलो वजनाची कामगिरी करणाऱ्या आसामच्या बितूपूर्णाला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.साक्षीच्या या सुवर्णमय कामगिरीमुळे पदकतालिकेत महाराष्ट्रानेही आपली स्थिती सुधारली. साक्षीने केलेल्या वर्चस्वपूर्ण कामगिरीच्या जोरावर राज्याला दुसरे सुवर्णपदक मिळाले.

त्यानंतर, कुस्तीपटू विनोद साळकर याने पुरुषांच्या १२५ किलो फ्रीस्टाईल गटातील नॉर्डिक स्पर्धेत अव्वल स्थान पटकावत महाराष्ट्राच्या पदकतालिकेत एका सुवर्णपदकाची भर घातली.



सुवर्णपदक विजेती साक्षी बुरकुले

**झारखंड, हिमाचल प्रदेशच्या कुस्तीपटूंना प्रत्येकी दोन सुवर्ण**

अंबिकापूर येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया वनवासी कुस्ती स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी झारखंड आणि हिमाचल प्रदेशने प्रत्येकी दोन सुवर्णपदके पटकावली. यादरम्यान भारोत्तोलनात मिझोरमने दोन सुवर्णपदके जिंकली. झारखंडने आपल्या सुवर्णपदकांच्या खात्याची सुरुवात पूनम ओरांव हिच्या विजयाने केली. पूनमने महिलांच्या ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत तेलंगणाच्या गीता के. हिचा ६-३ अशा गुणांनी पराभव केला. तर, पुरुषांच्या ६७ किलो वजनी गटाच्या ग्रीको-रोमन प्रकाराच्या अंतिम फेरीत अंजित कुमार मुंडा याने गुजरातच्या मुकेश वासवाचा तांत्रिक श्रेष्ठतेच्या जोरावर पराभव करत सुवर्णपदक जिंकले.

हिमाचल प्रदेशची दोन सुवर्णपदके नवश कुमार (९७ किलो ) आणि प्रियांका चौधरी (महिला ६२ किलो) यांच्या माध्यमातून आली. दुसरीकडे, मिझोरमने आपल्या सुवर्णपदकांची एकूण संख्या चारवर नेली. झोसांगझुआली (महिला +८६ किलो) आणि डेव्हिड झोह्मिंगमाविया (पुरुष +११० किलो) यांनी आपापल्या गटात अव्वल स्थान पटकावले. या सुवर्णपदकांमुळे मिझोरमची एकूण पदकतालिकेत पाचव्या स्थानावर झेप घेतली.

कर्नाटक १५ सुवर्ण, ६ रौप्य आणि ४ कांस्य पदकांसह एकूण पदकतालिकेत अव्वल स्थानी कायम आहे, तर ओडिशा ९ सुवर्ण, ४ रौप्य आणि १० कांस्य पदकांसह दुसऱ्या स्थानावर आहे. यजमान छत्तीसगडला एक रौप्य व एक कांस्यपदकासह नवव्या स्थानावर आहेत. जम्मू-काश्मीरनेही रविवारी कुस्ती स्पर्धेत एक सुवर्ण आणि एक रौप्यपदक जिंकत आपल्या पदकांची खाती उघडली. (वृत्तसंस्था)

# जागतिक वुशू अजिंक्यपद स्पर्धेत भारताची चमकदार कामगिरी

◆ **तियानजिन (चीन), २९ मार्च**

येथे रविवारी पार पडलेल्या १० व्या जागतिक वुशू अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी दोन कांस्य पदके पटकावली, तर अन्य चार खेळाडूंनी विविध गटांमध्ये अंतिम फेरीत धडक मारली.

उपांत्य फेरीच्या लढतींमध्ये, भारताच्या अनुला चीनच्या झांग लिनिंगकडून कडव्या आव्हानाचा सामना करावा लागला; या लढतीत पराभव पत्करावा लागल्याने मुलींच्या गटात तिला कांस्य पदकावर समाधान मानावे लागले. दुसरीकडे, मुलांच्या गटातील उपांत्य फेरीत गौतम मानकसला त्याच्या प्रतिस्पर्ध्याकडून पराभव पत्करावा लागला, ज्यामुळे त्यालाही आणखी एक कांस्य पदक मिळाले.



वुशू स्पर्धेतील एक क्षण

याव्यतिरिक्त, चार भारतीय खेळाडूंनी आपापल्या लढतींमध्ये विजय नोंदवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

उपेंद्रो थौगमने इजिप्तच्या अहमद मोहम्मदचा पराभव करून अंतिम फेरीत स्थान मिळवले, तर पामा हेइबा सिंगने सेनेगलच्या अलिमोऊ सीला नमवून विजेतेपदाच्या लढतीतील आपले स्थान निश्चित केले.

युवराजने फिलिपिन्सच्या झिव्हिएल बंतालीचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला, तर व्हिक्टरने इजिप्तच्या सईद करीम मोहम्मदवर मात करत विजेतेपदाच्या अंतिम लढतीकडे कूच केले. (वृत्तसंस्था)

# सेमेन्याची आयओसी अध्यक्ष कोव्हेंट्रीवर टीका

◆ **केप टाऊन, २९ मार्च**

दोन वेळा ऑलिम्पिक विजेती धावपटू कॅस्टर सेमेन्याने रविवारी, ट्रान्सजेंडर खेळाडूंना ऑलिम्पिकमध्ये सहभागी होण्यावर बंदी घालण्याच्या निर्णयावरून आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या (आयओसी) अध्यक्षा कर्स्टी कोव्हेंट्री यांच्यावर जोरदार टीका केली आहे. कोव्हेंट्री या झिम्बाब्वेच्या व आफ्रिकन खंडातील आहेत.

कोव्हेंट्री यांच्यासारख्या महिला नेत्याकडून मला अधिक अपेक्षा होत्या. वैयक्तिकरित्या, एक नेत्या म्हणून व एक आफ्रिकन म्हणून, त्यांना हे समजते की आम्ही आफ्रिकन लोक आहोत. तुम्ही जनुकीय रचनेवर नियंत्रण मिळवू शकत नाही याची त्यांना चांगली कल्पना आहे, असे दक्षिण आफ्रिकेची असलेल्या सेमेन्याने म्हटले. (वृत्तसंस्था)

# समर्थमध्ये रंगणार क्रीडा महोत्सव!

### ५२ वे वासंतिक प्रशिक्षण शिबीर दादरमध्ये होणार

**मुंबई** : दादरमधील क्रीडांगण पुन्हा एकदा जोश, जल्लोष आणि जिद्दीने थरारून जाणार आहे! श्री समर्थ व्यायाम मंदिरतर्फे आयोजित ५२ वे समर्थ वासंतिक क्रीडा प्रशिक्षण शिबीर यंदा शताब्दी महोत्सवी परिपूर्ती वर्षाच्या पार्श्वभूमीवर अधिक भव्य आणि दिमाखदार स्वरूपात साकारत आहे. दि. १७ ते २६ एप्रिल या कालावधीत रंगणारे हे शिबीर म्हणजे क्रीडाप्रेमींसाठी एक पर्वणीच ठरणार आहे.

हे भव्य शिबीर छत्रपती शिवाजी महाराज मैदान, समर्थ क्रीडा भवनासमोरील क्रीडांगण, दादर येथे आयोजित करण्यात आले आहे. शिबिराची वेळ सकाळी ७ ते ८:३० आणि सायंकाळी ७ ते ८:३० अशी ठेवण्यात आली आहे. ५ वर्षांवरील कोणालाही या शिबिरात सहभागी होता येणार असून, क्रीडाप्रेमींसाठी ही एक सुवर्णसंधी आहे.यंदाच्या शिबिरात तब्बल २००० शिबिरार्थींना प्रवेश देण्याचा मानस असून, त्यामध्ये सकाळी ८०० व सायंकाळी १२०० शिबिरार्थी सहभागी असतील. शिबिरार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी किमान २५० प्रशिक्षित प्रशिक्षकांची फौज सज्ज असणार आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर होणारे हे शिबीर म्हणजे 'समर्थ'च्या संघटनक्षमतेचे जिवंत उदाहरण ठरणार आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत विशेष सोहळे

या शिबिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दररोज होणारे भव्य सोहळे! १० दिवसांत दररोज ४ मान्यवर अतिथी अशा एकूण ४० नामवंत मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण व ध्वजावतरण पार पडणार आहे. या मान्यवरांच्या उपस्थितीमुळे शिबिरार्थींना प्रेरणेचा नवा स्रोत मिळणार आहे.

शिबिरातील सर्व २००० शिबिरार्थी आणि मानसेवी प्रशिक्षकांना पौष्टिक खुराक देण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. शारीरिक विकासाबरोबरच आरोग्याची काळजी घेणारा हा उपक्रम 'समर्थ'ची खास ओळख ठरला आहे.

श्री समर्थ व्यायाम मंदिर दादर

शताब्दी महोत्सवी परिपूर्ती वर्षाच्या निमित्ताने या भव्य शिबिरासाठी पालकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. कमी शुल्कात दर्जेदार प्रशिक्षण आणि उत्कृष्ट सुविधा मिळत असल्याने क्रीडाप्रेमींसाठी ही एक सुवर्णसंधी आहे असे 'पद्मश्री' व शिवछत्रपती पुरस्कार यांसारख्या सर्वोच्च पुरस्कारांनी सन्मानित व श्री समर्थ व्यायाम मंदिरचे प्र. कार्यवाह उदय देशपांडे यांनी स्पष्ट केले आहे. ५२ वे समर्थ वासंतिक क्रीडा प्रशिक्षण शिबीर हे केवळ प्रशिक्षण शिबीर नसून, क्रीडा संस्कारांची जपणूक करणारे एक प्रेरणास्थान आहे. शताब्दी महोत्सवी परिपूर्ती वर्षाच्या श्री समर्थ व्यायाम मंदिरच्या या उपक्रमामुळे नवोदित खेळाडूंना नवी दिशा आणि नवी ऊर्जा मिळणार आहे. दादरचे मैदान पुन्हा एकदा घोषणांनी दुमदुमणार आहे ''खेळा, जिंका आणि समर्थ बना!''

# राजस्थान रॉयल्स सीएसकेविरुद्ध लढणार

### सॅमसन, जडेजा आपल्या जुन्या संघांविरुद्ध खेळणार

◆ **गुवाहाटी, २९ मार्च**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी पाच वेळचा विजेता चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) व राजस्थान रॉयल्स यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. संजू सॅमसन व रवींद्र जडेजा आपल्या जुन्या संघाविरुद्ध खेळण्यासाठी सज्ज झाले आहेत.

संजू सॅमसन आता सीएसकेकडून राजस्थान रॉयल्सविरुद्ध एका भावनिक लढतीसाठी सज्ज झाला आहे. राजस्थान रॉयल्सचे नेतृत्व करत सॅमसनने एक दशकाहून अधिक काळ संघाला आकार दिला होता. त्याचवेळी रवींद्र जडेजा राजस्थान रॉयल्सकडून आपल्या पूर्वीच्या सीएसकेविरुद्ध खेळणार आहे.

सॅमसन हे आरआरचे नाव झाले होते व तो संघाच्या फलंदाजीचा आधारस्तंभ, कर्णधार व सर्वकालीन सर्वाधिक धावा करणारा खेळाडू होता. त्याने आरआर संघाला २०२२ च्या अंतिम सामन्यापर्यंत पोहोचवले होते.

सीएसकेमधील महेंद्र सिंह धोनीप्रमाणेच सॅमसन ही राजस्थान रॉयल्सची ओळख होती, परंतु एका मोठ्या अदलाबदलीत जडेजा आरआरकडे परतला व आता केरळचा सॅमसन हा फलंदाज सीएसकेकडून खेळत आहे, त्यामुळे सीएसकेच्या विकसित होत असलेल्या मुख्य संघात एक नवीन पैलूची भर पडली आहे.



ऋतुराज गायकवाड



रियान पराग

भारताच्या विजयी टी-२० विश्वचषक मोहिमेत निर्णायक भूमिका बजावल्यामुळे सॅमसनसुद्धा उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. वेस्ट इंडीज, इंग्लंड व न्यूझीलंडविरुद्धच्या जिंकणेच आवश्यक असलेल्या सामन्यांमध्ये ५० पेक्षा जास्त धावांची हॅट्ट्रिक साधल्यामुळे तो देशाचा स्टार झाला आहे आणि आता आयपीएलमध्ये हा यष्टिरक्षक-फलंदाज आत्मविश्वासाने मैदानात उतरेल.

पायाच्या पोटरीच्या स्नायूला झालेल्या दुखापतीमुळे धोनी किमान दोन आठवडे संघाबाहेर राहणार आहे. सॅमसन व कर्णधार ऋतुराज गायकवाड हे संघाचे मुख्य नेतृत्व करतील. धोनी संघासोबत गुवाहाटीला गेलेला नाही, त्यामुळे त्याच्या अनुपस्थितीमुळे सॅमसन व गायकवाडवर सर्वांचे लक्ष असेल.

देशांतर्गत टी-२० मध्ये छाप पाडणारा २० वर्षीय डावखुरा फिरकी अष्टपैलू प्रशांत वीर व देशांतर्गत क्रिकेटमधील षट्कारांसाठी ओळखला जाणारा नवोदित खेळाडू कार्तिक शर्मा यांसारख्या उदयोन्मुख खेळाडूंनाही संधी मिळेल. सीएसकेने कार्तिकला १४.२ कोटी रुपयांत करारबद्ध केले आहे.

डेवाल्ड ब्रेविस परिपक्वतेची चिन्हे दाखवत असल्यामुळे शिवम दुबे मधल्या फळीतील एक विश्वासार्ह खेळाडू म्हणून उदयास येत आहे व युवा खेळाडू आयुष म्हात्रे झपाट्याने प्रगती करीत असल्यामुळे सीएसके संघ पुनर्रचनेसाठी अधिक सुसज्ज दिसत आहे. नूर अहमद, अकील होसेन, मॅट हेनरी व खलील अहमदचा समावेश असलेला त्यांचा गोलंदाजीचा मारा वैविध्य आणि नियंत्रणही देईल.

राजस्थान रॉयल्ससाठी, सॅमसनचे जाणे हे एका युगाचा अंत आहे. रियान परागच्या नेतृत्वाखालील दुसऱ्या युगाची सुरुवात दर्शविते. रियान आपल्या घरच्या मैदानावर खेळून कर्णधारपदाच्या कारकिर्दीला सुरुवात करेल.

जडेजाच्या पुनरागमनामुळे अनुभव व संतुलन आले आहे, परंतु त्याचे कमी होत असलेले फिनिशिंग कौशल्य रॉयल्ससाठी चिंतेचा विषय ठरू शकते. त्यांची फलंदाजी यशस्वी जयस्वालभोवती केंद्रित असेल. त्याच्यावर आता सर्वात वरिष्ठ अव्वल फळीचा खेळाडू म्हणून मोठी जबाबदारी आहे.

त्याच्यासोबत, किशोरवयीन प्रतिभावान खेळाडू वैभव सूर्यवंशी आणि फॉर्मात असलेला शिमरॉन हेटमायर विशेषतः पॉवरप्लेमध्ये आक्रमक फलंदाजी करतील अशी अपेक्षा आहे. गत हंगामात राजस्थान रॉयल्स सर्वात स्फोटक संघांपैकी एक होता. तथापि, त्यांची गोलंदाजी ही चिंतेची बाब आहे. २०२५ च्या निराशाजनक हंगामानंतर संघात मोठे फेरबदल करूनही, जोफ्रा आर्चरच्या नेतृत्वाखालील वेगवान गोलंदाजी विभागाच्या सातत्यावर प्रश्नचिन्ह कायम आहे. फिरकी विभागाला जडेजा व रवी बिश्नोईवर अवलंबून राहावे लागेल. आता सीएसके व राजस्थान रॉयल्स हे दोन्ही संघ पुन्हा एकदा चांगली कामगिरी करण्याच्या प्रयत्नात असतील. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**राजस्थान रॉयल्स वि. चेन्नई सुपर किंग्स**
**स्थळ** : गुवाहाटी
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# मेरी कोम वळली व्यावसायिक मुष्टियुद्धाकडे

◆ **नवी दिल्ली, २९ मार्च**

मी व्यावसायिक बॉक्सिंगमध्ये प्रवेश करण्याचा विचार करत आहे, असे ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती आणि सहा वेळा विश्वविजेती ठरलेली भारतीय मुष्टियोद्धा एम. सी. मेरी कोमने रविवारी सांगितले.

२०१२ च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकून ऑलिम्पिक पदक मिळवणारी पहिली भारतीय महिला मुष्टियोद्धा ठरलेली ही ४३ वर्षीय खेळाडू, आता हौशी बॉक्सिंगमध्ये भाग घेण्यासाठीच्या वयोमर्यादेच्या पलीकडे गेली आहे.

सहा विश्वविजेतेपदे जिंकणे अविश्वसनीय होते. वयोमर्यादेमुळे मला देशासाठी हौशी मुष्टियुद्धामध्ये पुढे खेळता येत नाही, तरी व्यावसायिक मुष्टियुद्धामध्ये एक नवीन संधी निर्माण झाली आहे, असे ती संडेज ऑन सायकल या कार्यक्रमाच्या निमित्ताने म्हणाली.

मी सध्या यावर विचार करण्यासाठी थोडा वेळ घेत आहे. मी कठोर परिश्रम करत आहे आणि मी अजूनही काय करू शकते हे लोकांना दाखवण्यासाठी पुनरागमन करण्याचा प्रयत्न करत आहे, असे ती म्हणाली. मेरी कोमची तळागाळातील विकासासाठी असलेली वचनबद्धता सर्वश्रेष्ठ हौशी मुष्टियोद्धापैकी एक म्हणून ओळख आहे. मेरी कोमने मणिपूरमधील आपल्या अकादमीच्या माध्यमातून तळागाळातील विकासासाठी असलेल्या तिच्या वचनबद्धतेवरही जोर दिला. (वृत्तसंस्था)

# भारतीय मुष्टियोद्धे आशियाई स्पर्धेसाठी सज्ज

◆ **उलानबातर, २९ मार्च**

सोमवारी येथे सुरू होणाऱ्या आशियाई मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय मुष्टियोद्धे सज्ज झाले असून ते उत्कृष्ट कामगिरी करण्याचे ध्येय बाळगून आहेत. या अत्यंत व्यस्त हंगामातील संधींचा पुरेपूर फायदा घेत, वर्षाच्या उत्तरार्धात होणाऱ्या बहु-क्रीडा स्पर्धांसाठी थेट प्रवेश निश्चित करण्यावर त्यांचा भर असेल.

ही स्पर्धा या अत्यंत व्यस्त हंगामातील पहिलीच मोठी आंतरराष्ट्रीय मोहीम आहे. या हंगामात ग्लासगो येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा (जुलै-ऑगस्ट), जपानमधील ऐची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धा (सप्टेंबर-ऑक्टोबर) आणि उझबेकिस्तानमधील जागतिक मुष्टियुद्ध चषक अंतिम फेरीचा समावेश आहे.






केवळ पदकांच्या शर्यतीमुळेच नव्हे, तर या स्पर्धेला आणखी विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या निवड धोरणानुसार या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणाऱ्या खेळाडूंना राष्ट्रकुल व आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी थेट पात्रता मिळणार आहे.

भारतीय संघ गत १५ दिवसांपासून मंगोलियामध्ये येथील वातावरणाशी जुळवून घेत आहे. त्यांनी येथे आयोजित बहु-राष्ट्रीय शिबिरांमध्ये सराव केला असून, मंगोलिया, चीन, जॉर्डन व थायलंडच्या मुष्टियोद्ध्यांसोबत सराव लढतींचा अनुभव घेतला आहे.

महिला संघाचे नेतृत्व ऑलिम्पिक पदक विजेती लवलिना बोर्गोहेन (७५ किलो), दोन वेळा विश्वविजेती ठरलेली निखत झरीन (५१ किलो), तसेच विद्यमान विश्वविजेत्या मीनाक्षी हुडा (४८ किलो) व जैस्मिन लंबोरिया (५७ किलो) या खेळाडू करतील.

ही आशियाई अजिंक्यपद स्पर्धा आमच्यासाठी एक कठीण परीक्षा असेल. आम्हाला याची जाणीव आहे की, गेल्या एका दशकात आशियाई मुष्टियुद्ध क्षेत्राचा दर्जा लक्षणीयरीत्या उंचावला आहे, असे महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक सॅण्टियागो नीवा यांनी सांगितले.

महिला संघाकडून दमदार कामगिरीची अपेक्षा असली, तरी पुरुष संघाला मात्र गेल्या वर्षीच्या निराशाजनक जागतिक अजिंक्यपद स्पर्धेनंतर आपली कामगिरी सुधारण्यासाठी आणि पुन्हा एकदा आपला ठसा उमटवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत. गेल्या वर्षीच्या स्पर्धेत, १२ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर पहिल्यांदाच भारतीय पुरुष खेळाडूंना एकही पदक जिंकण्यात अपयश आले होते. प्रशिक्षण व्यवस्थेतही बदल करण्यात आला असून, लष्करी पृष्ठभूमी असलेले सी.ए. कुट्टप्पा हे मुख्य प्रशिक्षक म्हणून आपल्या तिसऱ्या कार्यकाळासाठी परतले आहेत.

पुरुषांच्या संघात विश्वचषक पदक विजेते जादुमणी सिंग आणि सचिन सिवाच (६० किलो), तसेच आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेता नरेंद्र बेरवाल यांच्यावर मुख्य भिस्त असेल.जादुमणीने ५० किलोवरून ५५ किलो वजनी गटात प्रवेश केला आहे. (वृत्तसंस्था)

## थोडक्यात...



### सुयश विद्यालयाच्या चिमुकल्यांचा बेस्ट स्टुडंट म्हणून गौरव

**बार्शी, दि. २९ मार्च-**
सुयश विद्यालय येथे नर्सरी, ज्युनिअर व सिनीयर के.जी.च्या विद्यार्थ्यांचा द बेस्ट स्टुडंट ऑफ द इयर पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या निवड प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांची विविध निकषांवर कसून चाचणी घेण्यात आली. उत्कृष्ट वाचन कौशल्य, गोष्टी सांगण्याची क्षमता, स्टोरी नंबर, रीडिंग स्किल्स, वैयक्तिक स्वच्छता तसेच शालेय उपस्थिती या सर्व बाबींचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात आले. या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची स्टुडंट ऑफ द इयर म्हणून निवड करण्यात आली. निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान संस्थेचे संस्थापक शिवदास नलवडे यांच्या हस्ते मेडल देऊन करण्यात आला. कार्यक्रमाला प्रशालेच्या मुख्याध्यापिका अलका जगताप, उपमुख्याध्यापक येवले उपस्थित होते.

### स्वामिनी संस्थेतर्फे अश्विनी पुंड यांचा सन्मान

**बार्शी, दि. २९ मार्च-**
तालुक्यातील भोयरे येथील केरबा बाबा पुंड यांची मुलगी व महाराष्ट्र पोलीस सेवेतील अमोल व लखन पुंड यांची बहीण अश्विनी पुंड यांची सोलापूर ग्रामीण पोलीसपदी निवड झाली. त्याबद्दल स्वामिनी बहुउद्देशीय सामाजिक संस्था महाराष्ट्रच्यावतीने अध्यक्ष विक्रांत पवार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी केरबा पुंड व विशाल पुंड उपस्थित होते. आपल्या पुतण्यासह मुलाचे पोलीस सेवेतील उल्लेखनीय काम पाहता माझी मुलगी अश्विनी हिचे अतिशय कष्टाने व मेहनतीने अभ्यास करुन पोलीस भरती व्हायचे स्वप्न आज पूर्ण झाले आणि गावातील तसेच पुंड कुटुंबीयातील पहिली महिला पोलीस झाली. .

### शेतकऱ्यांसाठी सिंगल फेज वीजपुरवठा सुरू ठेवण्याची मागणी

**मोडनिंब, दि. २९ मार्च-**



शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन सकाळी व सायंकाळी ६ ते ९ या वेळेत सिंगल फेज वीजपुरवठा सुरू ठेवावा, अशी मागणी समाजकल्याण समितीचे माजी सभापती शिवाजी कांबळे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे. सध्याच्या वीजपुरवठा वेळापत्रकामुळे शेतकरी, विद्यार्थी व दुग्ध व्यवसायिकांना मोठ्या अडचणी येत असून, या वेळेत वीज उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. सध्या शेती पंपासाठी थ्री फेज वीज सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत पुरविली जाते. त्यानंतर सायंकाळी ५ ते ६ या कालावधीत अल्प वेळ सिंगल फेज वीज उपलब्ध होते. सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत सिंगल फेज वीज पूर्णतः बंद ठेवण्यात येते. रात्रपाळीत थ्री-फेज वीज रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत दिली जाते. परंतु, त्यानंतर सकाळी ६ ते ९ या वेळेत सिंगल फेज वीज उपलब्ध नसते. सकाळी व सायंकाळी ६ ते ९ या वेळेमध्ये शेती पंपासाठी सिंगल फेज वीजपुरवठा सुरू ठेवण्याबाबत संबंधित विभागास आवश्यक त्या सूचना द्याव्यात, असे निवेदनात म्हटले आहे.

## निधन वृत्त...

### दत्तात्रय साखरे



**कासेगाव, दि. २९ मार्च-**
कासेगांव (ता. पंढरपूर) येथील दत्तात्रय काशीनाथ साखरे (वय ८४) यांचे शनिवारी २८ मार्च २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्यावर कासेगाव येथील त्यांच्या शेतामध्येच अंत्यसंस्कार करण्यात आले. (कै.) साखरे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सहा मुली, सुना, नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार आहे.

### तारामती व्यवहारे



**मोहोळ, दि. २९ मार्च-**
नांदगाव, (ता. मोहोळ) येथील रहिवाशी तारामती गोरक व्यवहारे (वय ६५ वर्ष) यांचे हृदय विकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना,एक मुलगी, जावई व नातवंड असा परिवार आहे. नांदगाव येथील सामाजिक कार्यकर्ते अरुण व्यवहारे यांच्या चुलती होत्या.

### भीमाशंकर आहेरवाडी



**सोलापूर, दि. २९ मार्च-**
केगांव (ता. अक्कलकोट) येथील सामाजिक कार्यकर्ते भीमाशंकर धर्मणा आहेरवाडी यांचे शनिवार, २८ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले आहे. मृत्यसमयी ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात एक भाऊ, एक बहीण, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी रात्री केगांव येथील आहेरवाडी मळ्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. ते केगांव येथील मातोश्री सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री मल्लिकार्जुन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे संचालक होते.

### ललिता दोमल



**सोलापूर, दि. २९ मार्च-**
ललिता दोमल यांचे रविवार, दि.२९ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. सोलापूर महापालिकेच्या मालमत्ता कर विभागातील निरीक्षक अरविंद दोमल यांच्या त्या पत्नी होत.



# टेंभुर्णीत श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा; हजारो भाविकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**
शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या भव्य श्रीराम मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. चार दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्याची सांगता रामकथा वाचन, भारुड, पाळणा, आरती व महाप्रसादाने झाली. या कार्यक्रमाला हजारो भाविक भक्तांनी उपस्थिती लावली होती.

श्रीराम मंदिरात भगवान श्रीराम, सीतामाई व लक्ष्मण यांच्या सुंदर मूर्ती असून येथे रामनवमीसह विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने साजरे केले जातात. यावर्षी मंदिराच्या नूतनीकरणाची कामे-सभामंडप, शिखर, कंपाउंड व रंगरंगोटी-दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने पूर्ण करण्यात आल्याने उत्सव अधिकच भव्य आणि आकर्षक झाला. या निमित्ताने पुणे येथील वासंती धर्माधिकारी यांनी तीन दिवस रामकथा सादर केली, तर सोलापूर येथील हभप कापसे महाराज यांच्या भारुडाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच हभप काजळे महाराज यांचे रामनवमीदिनी कीर्तन झाले. टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे नूतन आयपीएस अधिकारी राहुल आत्राम यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

रामनवमीदिनी इंद्रजित बनसोडे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच चार दिवस अन्नदान कार्यक्रमही राबविण्यात आला. या कार्यक्रमासाठी सौरभ हवालदार, ओंकार पांढरे, धोंडीराम कोठावळे, विलास कोठावळे, रमेश तिपाले यांचे सहकार्य लाभले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रामदेव ट्रस्ट सदस्य व समस्त श्रीराम भक्त परिवार यांनी परिश्रम घेतले.

**दानशूर व्यक्तींचा सन्मान**
मंदिराच्या विकासासाठी मोठे योगदान देणाऱ्या दानशूर व्यक्तींचा यावेळी सन्मान करण्यात आला. इंद्रजित बनसोडे व त्यांच्या पत्नी लता यांनी मंदिराचे शिखर, गाभारा, वॉल कंपाउंड, ग्रील व रंगकामासाठी सुमारे ८ ते ९ लाख रुपये खर्च केले. कॉंक्रीटीकरणासाठी तानाजी भुजंग येवले-पाटील व त्यांच्या आई द्वारकाबाई यांनी योगदान दिले.

तसेच शिवाजी प्रकाश येवले-पाटील, सुरजभैय्या देशमुख, नाना काळे, महेश अरुण थोरात, मुकुंद रामचंद्र सुतार, मोहन विठ्ठल काळे, शशिकांत देशमुख, अविनाश इंगळे, मंजुनाथ रेळेकर (मिस्त्री) आदींनी बांधकाम व इतर कामांसाठी सहकार्य केले. तिन्ही मूर्तींसाठी चांदीचे टोप व सीतामाईस मंगळसूत्र अर्पण केल्याबद्दल सतीश पोतदार व अनंत पोतदार यांचाही सन्मान करण्यात आला.या उत्सवामुळे टेंभुर्णी शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

# रानमळा चोपडी येथे श्री भोजलिंग यात्रा

### ३१ मार्च ते ३ एप्रिलपर्यंत यात्रा महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२९ मार्च-**
रानमळा, चोपडी (ता.सांगोला) येथे दि.३१ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत यात्रा कमिटी व ग्रामस्थ यांच्या वतीने श्री भोजलिंग यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये मंगळवार दि.३१ मार्च रोजी रा.८ वा. संदीप मोहिते महाराज व अतुल हातेकर महाराज यांचा भारुडाची जुगलबंदी कार्यक्रम, बुधवार दि.१ एप्रिल रोजी स.८ वा. सासनकाठीची गावातून मिरवणूक, रा.८ वा. महिलांसाठी व पुरुषांसाठी संगीत खुर्ची व रस्सीखेच स्पर्धा तसेच महिलांसाठी होम मि





निस्टर कार्यक्रम आयोजित केला आहे. गुरुवार दि.२ एप्रिल रोजी स.८ वा. धावण्याच्या व स.९ वा. स्लो बाईक स्पर्धा, रा.८ वा. सिद्धेश्वर संगीत भजनी भारुड मंडळ, दहिवडी यांचा कार्यक्रम तसेच शुक्रवार दि.३ एप्रिल रोजी रा.८ वा. भव्य खुला रेकॉर्ड डान्स स्पर्धेचे लहान व मोठ्या गटात असे आयोजन करण्यात आले असून लहान गटासाठी अनुक्रमे ७ हजार, ५ हजार, ३ हजार तसेच मोठ्या गटासाठी अनुक्रमे २० हजार, १५ हजार, ७ हजार, ५ हजार रुपये अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

तसेच या कालावधीत दररोज सायं.७ वा.आरती व महाप्रसाद याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी यात्रेच्या व कार्यक्रमाच्या संदर्भात अमोल बाबर मो.नं.९४२०५६१९५५ व राहुल बाबर मो.नं.९७६३०४०९५८ यांच्याशी संपर्क साधावा व या कार्यक्रमासाठी भाविक-भक्त व स्पर्धकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यात्रा कमिटीतर्फे करण्यात आले आहे.

# शंभू महादेवच्या यात्रेसाठी माळशिरसच्या कावडी रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २९ मार्च-**
अखिल महाराष्ट्राचे कुलदैवत असलेले शिखर शंभु महादेवाची यात्रा सुरु झाली असून या यात्रेमधील मुख्य आकर्षण असलेल्या मुंगी घाटातील कावडी सोहळा असून या यात्रेसाठी माळशिरस शहर व परिसरातील कावडी आज रवाना झाल्या आहेत.

शिखर शिंगणापूरच्या यात्रेसाठी माळशिरस शहरातून नारायण थोरात, गंगाधर सुतार, तानाजी सुतार, नामदेव कुंभार, विजय बोकफोडे, सुभाष कोळी, गोविंद कोळी, रखमाजी जंगले, महादेव शिंदे,शिवाजी शिंदे,प्रकाश पिसे, सोनवणे, बोराटे यांच्या कावडी यात्रेसाठी



जाण्याची शकडो वर्षांची परंपरा आज ही सुरु आहे.

# वीरशैव व्हिजन उत्सव समिती अध्यक्षपदी बिराजदार

### सचिवपदी अविनाश हत्तरकी





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**
जगज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त वीरशैव व्हिजन उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विजयकुमार बिराजदार तर सचिवपदी अविनाश हत्तरकी यांची निवड करण्यात आली. वीरशैव व्हिजनचे विश्वस्त आनंद दुलंगे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली.

इतर पदाधिकारी असे उपाध्यक्ष गौरीशंकर अतनुरे, सहसचिव मन्मथ कपाळे, कार्याध्यक्ष प्रा. शिव कलशेट्टी, सहकार्याध्यक्ष गणेश घाळे, कोषाध्यक्ष श्रीमंत मेरु, सहकोषाध्यक्ष आनंद नसली, व्याख्यानमाला प्रमुख प्रा. मलकप्पा बणजगोळे, उपप्रमुख राहुल बिराजदार, प्रसिध्दी प्रमुख - शिवानंद येरटे, सांस्कृतिक प्रमुख बसवराज जमखंडी, धानेश सावळगी, नियोजन समिती सोमनाथ चौधरी, गंगाधर झुरळे, अमित कलशेट्टी, विजयकुमार हेले, सिध्देश्वर कोरे, सोशल मिडीया प्रमुख - चेतन लिगाडे, केतन अंबुलगे, पूजा प्रमुख महाराज स्वामी, संगमेश्वर स्वामी, सल्लागार संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, सोमेश्वर याबाजी, नागेश बडदाळ, संजय साखरे, शिवानंद सावळगी, राजेश नीला, मनोज पाटील, बसवराज चाकाई, संतोष अंकद, बद्रीनाथ कोडगी, योगेश कापसे, संगमेश कंठी, नागेश गदगे, अरुण पाटील.

# नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अभ्यास, सराव व मार्गदर्शन आवश्यक : डॉ. पालके

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ मार्च-**
अभ्यास, सराव व मार्गदर्शन नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक आहे, असे मत डॉ. पालके यांनी व्यक्त केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लँग्वेजेस अँड लिटरेचर्स अंतर्गत इंग्रजी विभागामार्फत नेट-सेट पेपर २ इंग्रजी साहित्य विषयावरील एकदिवसीय ऑनलाईन कार्यशाळा संपन्न झाली. ही कार्यशाळा गुगल मीटच्या माध्यमातून आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यशाळेत संसाधन व्यक्ती म्हणून श्री शिवाजी महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. राहुल पालके हे उपस्थित होते. त्यांनी पीपीटी प्रेझेंटेशनच्या माध्यमातून इंग्रजी साहित्यातील विविध वाङ्मयप्रकार नाटक, कविता, कादंबरी, लघुकथा आणि अकाल्पनिक साहित्य यांचे अत्यंत मुद्देसूद व सोप्या भाषेत स्पष्टीकरण दिले. तसेच उतारा आकलनाच्या माध्यमातून चिकित्सक वाचन, विचारप्रक्रिया, तार्किकता व विश्लेषण क्षमता कशी विकसित करावी यावर त्यांनी विशेष भर दिला.

यावेळी नेट-सेट परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांचे स्वरूप, रचना, गुण विभागणी, कट-ऑफ आणि सखोल विश्लेषण यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. भाषा, भारतातील इंग्रजी, सांस्कृतिक अभ्यास, साहित्यिक समीक्षा, दुसऱ्या महायुद्धानंतरचे साहित्यिक सिद्धांत तसेच संशोधन पद्धती या घटकांवरही मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेत सहाय्यक प्राध्यापक रब्बाना शेख, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते यांनीही महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्कूल ऑफ लँग्वेजेस अँड लिटरेचर्सच्या संचालिका डॉ. अंजना लावंड या होत्या. कार्यशाळेमुळे नेट-सेट परीक्षेच्या तयारीबाबत आत्मविश्वास वाढण्यास मोठी मदत झाल्याचे मत सहभागी संशोधक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. गणेश संकपाळ व डॉ. व्ही. एल. लेंडवे यांनी कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले.



# २०७ दिव्यांग मुलांनी घेतला होमिओपॅथिक शिबिराचा लाभ

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ मार्च-**
श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलीत मैंदर्गी-गाणगापूर रोडवरील श्री. स्वामी समर्थ रुग्णालयात २० वर्षांखालील दिव्यांग रुग्ण मुलांसाठी आयोजित करण्यात आलेले होमिओपॅथिक शिबिर आज सकाळी ०८ ते सायंकाळी ४ या वेळेत मोठ्या आस्थेने संपन्न झाले. या होप फॉर होपलेस मोफत होमिओपॅथिक शिबीराचे शुभारंभ मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते डॉ. प्रफुल्ल विजयकर, डॉ.अपर्णा सामळ व वैद्यकीय पथकांच्या उपस्थितीत करण्यात आला. शिबिरात डॉ. प्रफुल्ल विजयकर व वैद्यकीय पथकाच्या वतीने २० वर्षांखालील दिव्यांग मुलांची शारिरीक, मानसिक, बौद्धीक तपासणी करून मोफत औषधोपचार देण्यात आले. २०७ दिव्यांग मुलांनी या मोफत शिबिराचा लाभ घेतला. याकामी देवस्थानचे सेवेकरी रवी मलवे, श्रीकांत मलवे, भीमा मिनगले आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून या आरोग्य शिबिराची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी करमाळा तालुक्यातील पक्षी मित्र कल्याणराव साळुंखे, विशाल स्वामी, मनोज काटगाव यांनी या शिबिरास भेट दिली. याप्रसंगी सर्व वैद्यकीय पथकातील डॉक्टरांचा व कल्याणराव साळुंखे, मनोज काटगाव यांचा मंदिर समितीच्या वतीने सन्मान केला. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा. शिवशरण अचलेर, श्रीकांत मलवे, रवी मलवे, सुनील नायकोडी, श्रीशैल गवंडी, संजय पाठक उपस्थित होते.

# आ. जानकर यांच्या इशाऱ्याने सिंगल फेज लोडशेडिंग थांबले

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २९ मार्च-**
माळशिरस तालुक्यातील ग्रामीण भागात सिंगल फेज वीजेच्या लोडशेडिंग मुळे निर्माण झालेला अंधार अखेर दूर झाला आहे. आमदार उत्तमराव जानकर यांनी केलेल्या आक्रोश जनआंदोलनाचा आणि दिलेल्या कडक इशाऱ्याचा परिणाम म्हणून सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत सुरू असलेले सिंगल फेज लोडशेडिंग थांबविण्यात आले. त्यामुळे तालुक्यातील ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांवरील घरे पुन्हा लाईटच्या प्रकाशाने उजळून निघाली असून शेतकरी व ग्रामस्था मध्ये समाधानाचे वातावरण आहे.

### ग्रामीण वाड्या-वस्त्यांवरील घरे पुन्हा उजळली
### शेतकरी-नागरिकांकडून समाधान व्यक्त



गेल्या काही दिवसांपासून महावितरणच्या गलथान कारभारामुळे ग्रामीण भागातील नागरिक अक्षरशः अंधारात जीवन जगत होते. सायंकाळी ६ ते रात्री १० या महत्त्वाच्या वेळेत वीज नसल्याने शेतकरी, कष्टकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. गुरांना चारा टाकणे, धारा काढणे, दूध डेअरीला घालणे महिलांचा स्वयंपाक यांसारखी कामे अडथळ्यांत येत होती. तसेच वीज नसल्यामुळे छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान होत होते.

या पार्श्वभूमीवर आमदार उत्तमराव जानकर यांनी विधानसभेच्या अधिवेशनातही हा प्रश्न जोरदारपणे उपस्थित केला. ग्रामीण भागातील मूलभूत समस्यांवर ठाम भूमिका घेणारे आमदार म्हणून त्यांनी प्रशासनाला जाब विचारला.

दरम्यान, २७ मार्च रोजी रोजी वेळापूर येथील महावितरण कार्यालयावर आमदार उत्तमराव जानकर यांच्या नेतृत्वाखाली आक्रोश जनआंदोलन करण्यात आले. यावेळी आमदार जानकर यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट इशारा देत, येत्या पाच दिवसांत सिंगल फेजचे लोडशेडिंग पूर्णपणे बंद केले नाही, तर महावितरणच्या कार्यालयात एकही कर्मचाऱ्याला फिरकू देणार नाही, असा इशारा दिला.

तसेच सिंगल फेजवर मोटारी चालविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवरही कडक कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सायंकाळी ६ ते १० या वेळेत सुरू असलेले लोडशेडिंग बंद करण्यात आले असून माळशिरस तालुक्यातील विविध गावे पुन्हा प्रकाशमान झाली आहेत. वाड्या-वस्त्यांवरील ग्रामस्थांनीही फोन करून समाधान व्यक्त करत आमदार उत्तमराव जानकर यांचे आभार मानले.

# कुर्डुवाडी नगरपरिषदेच्या सत्ताकारणात दस्तुरखुद्द 'राष्ट्रवादी'मध्येच दोन मतप्रवाह








## जेटिंग मशीन वापरावरुन पेटला वाद

## शांत आहे म्हणून अंत पाहू नका

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि.२९ मार्च-**

कुर्डुवाडी नगरपरिषदेच्या सत्ताकारणात दस्तुरखुद्द राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्येच दोन मतप्रवाह असल्याचे दिसून येत आहे. नगरपरिषदेकडील जेटिंग मशीन अन्यत्र वापरल्याच्या कारणावरुन हा वाद पेटला आहे. दरम्यान, शांत आहे म्हणून अंत पाहू नका, असे आरोग्य समितीचे सभापती डॉ.मोहसीन मकनू यांनी शिक्षण समितीचे सभापती संजय टोणपे यांना उद्देशून म्हणाले.

शुक्रवारी झालेल्या नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत शिक्षण समितीचे सभापती संजय टोणपे यांनी आरोग्य विभागाकडील मैला उपसण्याच्या जेटींग मशिन वाकाव गावी नेत भ्रष्टाचार केला जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. तेव्हा, आरोग्य समितीचे सभापती या नात्याने डॉ.मोहसीन मकनू यांनी उत्तर देणे अपेक्षित होते. सभेत मौन बाळगलेले डॉ.मकनू यांनी पत्रपरिषद घेत संजय टोणपे यांनी केलेले आरोप खोडून काढले.

वाकावला गेलेली जेंटींग मशिनचे वाहन बिर्जू वाल्मिकी यांची आहे. १५ दिवसांपुर्वी सदर वाहन वाकावला गेली होती. ५ दिवसांपुर्वी नगरपरिषदेकडील वाहन शाम प्लाझा येथे गणेश लोखंडे यांच्याकडील काम करत असताना खोबडा तुटला होता. आरोग्य निरीक्षक अलाट यांना विचारुन, पावती करुन वाहन बाहेर जात असते, असेही डॉ. मोहसिन मकनू यांनी स्पष्ट केले.

# कोल्हापूरची अमृता पुजारी डबल महाराष्ट्र केसरी

## चौथी महाराष्ट्र महिला केसरीचे सोनेट कार व बुलेट दोन्ही बक्षीसे कोल्हापूरला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च -**

कोल्हापूरच्या अमृता पुजारीने चौथ्या महिला महाराष्ट्र केसरीचा मान मिळविला. हा मान तिने दुसऱ्यांदा मिळविला.

कै. सिद्धराम साखरे यांच्या स्मरणार्थ निर्झरा केअर फाउंडेशनने महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर यांच्या सहकार्याने ही स्पर्धा हरिभाई देवकरण मैदानावर आयोजित केली होती. अंतिम लढतीत अमृतास कोल्हापूरच्याच वेदिका ससाणे हीस ७-० असे हरविताना विशेष प्रयास करावे लागले नाहीत. सहा मिनिटाच्या कुस्तीत अमृताने दोनदा एकेरी पट काढीत गुण मिळविले. अमृताने मध्यंतरासच ५-० अशी आघाडी घेत तिने विजयाकडे वाटचाल केली होती. वेदिकाला एकही गुण मिळविता आला नाही.

महाराष्ट्र केसरी गटात विजेतीपदाची दावेदार असलेल्या अपेक्षा पाटीलला उपांत्य फेरीतच कोल्हापूरच्या वेदिका ससाणेने ५-० असा धुव्वा उडवीत पराभवाचा धक्का दिला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात विजेतीपदाचीच दावेदार असलेल्या अमृता पुजारीची कोल्हापूरच्याच सृष्टी भोसले हिस ३-१ असे हरविताना चांगलीच दमछाक झाली. मध्यंतरास अमृताने १-० अशी आघाडी घेतली होती. या गटात तृतीय स्थान कोल्हापूरच्या सृष्टी भोसलेने मिळविले. सृष्टीने पुणे जिल्याच्या रोशनी बोडकेचा ६-० असा पराभव केला.अमृताला पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते चांदीचा गदा व सोनेट कार तर उपविजेती वेदिकाला बुलेट देण्यात आली.

यावेळी महापौर विनायक कोंड्याल,हिंद केसरी योगेश दोडके,आयोजक स्वाती अळळीमोरे-साखरे, अक्कलकोट अन्नछत्र मंडळाचे संस्थापक जन्मेनजयराजे भोसले, ट्रिपल महाराष्ट्र केसरी भाग्यश्री फड, महाराष्ट्र केसरी मुन्नालाल शेख, सम ाधान घोडके, उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले, मौला शेख, उमेश सूळ, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जि.प. उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, रमेश बारसकर, सागर कल्याणशेट्टी, पैलवान लोखंडे, उद्योजक सागर कत्ते, प्रकाश वानकर, सुधा अळळीमोरे, योगेश बोंबाळे, श्रीदेवी फुलारे, युवराज सरवदे, उपस्थितांमध्ये सेरेंटिका रिन्युएबल्सचे सुरजीत नारायण, यांचेसह कुस्ती क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले..

**या स्पर्धेतील अनुक्रमे अंतिम आणि तृतीय क्रमांकाचे निकाल यापमाणे :**

**७२ किलो** : सावरी सातकर (पुणे जिल्हा)विजयी विरुद्ध वेदांतिका पवार (सातारा) १०-४. गौरी धोटे (अमरावती )विजयी विरुद्धप्रतीक्षा ढमढेरे (पुणे जिल्हा) ५-० सायली दंडवते ( कोल्हापूर)विजयी विरुद्ध सृष्टी पाटील (सांगली)५-२.

**६८ किलो** : आकांशा नलावडे(पुणे जिल्हा)विजयी विरुद्ध प्रीती म्हेत्रे (पुणे शहर)१०-४ शिवानी मेटकर (कोल्हापूर शहर)विजयी विरुद्ध आशा कांदे (नाशिक) ५-०. आराधना नाईक (सांगली)विजयी विरुद्ध वैष्णवी धायगुडे (मुंबई उपनगर) ९-५.

**६५ किलो** : आश्लेषा बागडे (सोलापूर शहर) विजयी विरुद्ध दिव्या कुंभार (पुणे जिल्हा) ११-४. प्रांजली कुंभार (रायगड) विजयी विरुद्ध ऋतुजा कोळी (सांगली) ५-५. विशाखा चव्हाण (पुणे जिल्हा) विजयी विरुद्ध अश्विनी गर्जे (बीड) ७-५.

**६२ किलो** : प्रगती गायकवाड (पिंपरी चिंचवड) विजयी विरुद्ध राधिका ढेरे (कोल्हापूर शहर) १०-४. श्रखला रत्नपारखी (संभाजीनगर) विजयी विरुद्ध आर्या बाणेकर (पुणे शहर)५-५. दाली गुप्ता (ठाणे शहर). संस्कृती शिरसाट(नाशिक शहर) ७-५


**५९ किलो** : धनश्री फंड (अहिल्यानगर)विजयी विरुद्ध अमेघा घरत (रायगड) ६-५. प्रिया घरजाळे (मुंबई उपनगर) विजयी विरुद्ध निर्मिती मुऱ्हे (पिंपरी चिंचवड )५-३. रोहिणी वीरकर ( सातारा ) विजयी विरुद्ध धनश्री देवकर (पुणे जिल्हा)५-०.

**५७ किलो** : तन्वी मगदूम (कोल्हापूर जिल्हा) विजयी विरुद्ध सलोनी खोपडे (पुणे जिल्हा) १०-४. सोनाली दरेकर (अहिल्यानगर) विजयी विरुद्ध ऐश्वर्या नवसे (पुणे शहर) ६-५. साक्षी मोरे (सातारा) विजयी विरुद्ध भाग्यश्री डुमणे (हिंगोली) ६-५.


**५५ किलो** : अहिल्या शिंदे (पुणे जिल्हा) विजयी विरुद्ध पूजा पाटील (कोल्हापूर शहर) १६-४. साक्षी चंदनशिवे(सांगली) विजयी विरुद्ध योगिता सरक (सातारा) १३-४. समृद्धी नीलवे (मुंबई उपनगर) विजयी विरुद्ध अंजली लोंढे ( बीड ) ११-४.

**५३ किलो:** शिवानी करचे (सोलापूर जिल्हा)विजयी विरुद्ध म धुरा वायगंडे (कोल्हापूर शहर) ६-५. श्रावणी लवटे (कोल्हापूर जिल्हा) विजयी विरुद्ध दिव्या धावडे (अहिल्यानगर) ५-४. राजनंदिनी रनवरे (सातारा) विजयी विरुद्ध स्नेहल पवार (धाराशिव) ६-३

**५० किलो** : आकांशा जाधव (पुणे जिल्हा) विजयी विरुद्ध गौरी पाटील (कोल्हापूर शहर). ११-४. तृप्ती गुरव (कोल्हापूर जिल्हा) विजयी विरुद्ध भाग्यश्री मासुळे जिल्हा) १०-४ अनुष्का हासपे ( सातारा ) विजयी विरुद्ध अर्पिता गोळे १४-४.





### सोलापूरच्या आश्लेषा बागडे हिला ६५ किलो गटात सुवर्ण

६५ किलो गटात सोलापूरच्या आश्लेषा बागडे हिने सुवर्णपदक पटकाविले. तिने पुणे जिल्ह्याच्या दिव्या कुंभार ११-४ असा पराभव केला. आश्लेषा करमाळा तालुक्यातील अजंनडोह येथील असून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा येथील विध्यार्थीनी आहे.

### पुढील वर्षापासून महिला महाराष्ट्र केसरी

पालकमंत्री गोरे बोलताना म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रतिवर्षी खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा होतात. यासाठी महाराष्ट्र शासन १ कोटी रुपये खर्च करते. पुढील वर्षापासून महिलांच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धा घेण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंजूर करून घेऊ. त्यासाठी ५० लाख रुपयाची तरतूद करण्यात येईल. तसेच चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी २५ लाख रुपयाची मदत त्यांनी जाहीर केली.

# महापालिका सर्वसाधारण सभेत आज होणार अंदाजपत्रक सादर

## झोन निधी कपात विषयाकडे सर्वांचे लागले लक्ष

## भांडवली मूल्यआधारित कररचनेच्या पत्रावर उलटसुलट चर्चा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**

सोलापूर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत आज सोमवार दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सन २०२६-२७ चे अंदाजपत्रक सादर होणार असून, झोन कार्यालयांच्या निधी कपातीच्या मुद्द्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. म हापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सभेत स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते अंदाजपत्रक मांडणार आहेत.

महापालिका आयुक्तांनी सादर केलेल्या १३८३ कोटी ३८ लाख रुपयांच्या प्रशासकीय अंदाजपत्रकात स्थायी समितीने ५ कोटी ६९ लाख रुपयांची वाढ करत एकूण १३८९ कोटी ७ लाख १८ हजार रुपयांचे अंदाजपत्रक बहुमताने मंजूर केले होते. या अंदाजपत्रकात झोन कार्यालये व समाजकल्याण विभागाच्या निधीत कपात करण्यात आल्याने विरोधकांनी तीव्र आक्षेप नोंदवला होता. स्थायी समितीने महसूल उत्पन्नात वाढ सुचवत ९३० कोटी १४ लाख रुपयांचा जमा-खर्च दर्शवला आहे. भांडवली काम ांसाठी आयुक्तांनी सुचवलेल्या ३१ कोटी ७४ लाख रुपयांच्या तरतुदीत मोठी वाढ करून १०१ कोटी ५१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र देखभाल-दुरुस्ती, प्रशासकीय खर्च व विविध योजनांमध्ये कपात करण्यात आली आहे.

या सभेत सभागृहनेते नरेंद्र काळे मुख्य सूचना मांडणार असून, विरोधी पक्षाकडून उपसूचना येण्याची शक्यता आहे. एकापेक्षा अधिक उपसूचना आल्यास त्या मर्ज केल्या जाणार आहेत. अंदाजपत्रकावर सखोल चर्चा होऊन अखेरीस एकमताने मंजुरी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.झोननिहाय निधी कपात आणि विकास कामांच्या प्राधान्यक्रमावर आजच्या सभेत काय निर्णय होतो, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, भांडवली मूल्य आधारित कर रचनेच्या पत्रावर उलट सुलट चर्चा होत आहे. हा प्रशासकीय प्रस्ताव स्वीकारणार का असा प्रश्न सत्ताधारी नगरसेवकांम धूनच उपस्थित होत आहे. सत्ताधारी नगरसेवकांमधून या विषयाला विरोध होत असल्याची चर्चा आहे. ही नवीकर प्रणाली झीजीया कराप्रमाणेच राहणार असल्याचा आरोप आतापासूनच होत आहे. अंदाजपत्रक आढावा बैठकीतील सूचना शिफारसी कितपत स्वीकारण्यात येतील याकडेही लक्ष लागले आहे.

# जि.प.चे माजी अध्यक्ष बळीराम साठे शेतकऱ्यांच्या बांधावर

## तात्काळ पंचनाम्यासाठी प्रशासनाला सूचना



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मार्च**

अवकाळी वारे आणि वादळाच्या तडाख्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील नान्नज गावातील शेतकरी सुरेश विभुते यांची द्राक्षबाग पूर्णपणे कोसळून भुईसपाट झाली आहे. या घटनेम ुळे संबंधित शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या घटनेची माहिती मिळताच माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बळीराम (काका) साठे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची पाहणी केली. यावेळी त्यांनी ही घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचे सांगत, शेतकऱ्यांवर आलेले हे संकट सुलतानी स्वरूपाचे असल्याची भावना व्यक्त केली.

साठे यांनी जिल्हा कृषी अधीक्षक तसेच महसूल प्रशासनाशी दूरध्वनीवरून संपर्क साधून तात्काळ पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत मिळावी यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असेही त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले.

यावेळी शेतकरी सुरेश विभुते यांना धीर देताना साठे म्हणाले की, संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. प्रशासन आणि आपण सर्वजण त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या पाहणीवेळी बाजार समितीचे संचालक प्रकाश चोरेकर, माजी सरपंच दिलीप (पप्पू) माने, शत्रुघ्न घोडके, कपिल जानराव, ओम हाक्के (ग्रामपंचायत सदस्य, नान्नज) तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस नागेश पवार आदी उपस्थित होते.

अवकाळी पावसामुळे वादळी परिस्थिती निर्माण होऊन शेतीचे मोठे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांसाठी तातडीने मदत व योग्य नियोजनाची गरज असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# सेवाकर्मी कार्यक्रमात कार्यक्षमतेचा नवा आदर्श; प्रशासनातील कार्यक्षमतेचा नवा मापदंड

**सोलापूर, दि.२९ मार्च-**

हाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करत सोलापूर जिल्हा परिषदेने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशामुळे सोलापूर जिल्ह्याने प्रशासनातील कार्यक्षमतेचा नवा मापदंड निर्माण केला असून राज्यातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना ''उत्कृष्ट कार्यालय प्रमुख'' म्हणून सन्मानित करण्यात आले. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान सोलापूर जिल्हा परिषदेच्या पारदर्शक, शिस्तबद्ध आणि परिणामकारक प्रशासनाची पावती मानली जात आहे.

ग्रामविकास विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या सेवाकर्मी कार्यक्रमाचा उद्देश स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचाऱ्यांचे कार्यमूल्यांकन करणे हा होता. या कार्यक्रमात विविध निकषांवर आधारित गुणांकन करण्यात आले. सोलापूर जिल्हा परिषदेने सर्व निकषांमध्ये सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी करत १०० पैकी ८० गुण मिळवले आणि राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. जिल्हा परिषदेने ज्येष्ठता सूची अद्ययावत ठेवणे, पदोन्नती व सरळसेवा नियुक्त्यांची प्रभावी अंमलबजावणी, बिंदुनामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करणे, तसेच कर्मचाऱ्यांचे आय.जी. ओ.टी. पोर्टलवरील प्रशिक्षण आणि सेवापुस्तक अद्ययावत ठेवणे या सर्व बाबींमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली.

बहुतांश निकषांमध्ये पूर्ण गुण मिळवत प्रशासनातील शिस्त आणि नियोजनाची उच्च पातळी दाखवून दिली. पदोन्नती नियुक्तीत मंजूर ९५९ पदांपैकी ८२० पदे कार्यरत ठेवण्यात आली असून रिक्त पदांचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यात आले आहे. सरळसेवा नियुक्तीतही १३,००७ पदांपैकी ११,४२५ पदे भरून कार्यक्षमतेचा उच्च स्तर गाठण्यात आला आहे. बिंदुनामावली प्रमाणीकरणात ९४.७४ टक्के संवर्ग प्रमाणित करण्यात आले, तर अनुकंपा नियुक्तीतील सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. आय.जी.ओ.टी. पोर्टलच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावर विशेष भर देण्यात आला असून सुमारे ९५ टक्के कर्मचाऱ्यांनी आवश्यक कोर्स पूर्ण केले आहेत. सेवापुस्तक अद्ययावत करण्याच्या बाबतीतही ९९ टक्क्यांहून अधिक काम पूर्ण करण्यात आले आहे, ही बाब प्रशासनाच्या काटेकोर कार्यपद्धतीची साक्ष देते.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या पालखी परिक्रमाचे पुण्यात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ मार्च-**

अनंत कोटी ब्रम्हांडनायक, राजाधिराज योगीराज सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज की, जय...! च्या जय घोषात श्री क्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या पालखीचे पुण्यात मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. पुण्यातील परिक्रमा मार्गावर पालखी पादुकांचे दर्शन घेण्यासाठी शेकडो पुणेकरांनी दुतर्फा गर्दी केलेली होती.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनम ेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २९ वर्षापासून पालखी पादुका परिक्रमा ही महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा या दोन राज्यात जात असते, श्री क्षेत्र अक्कलकोट येथून नोव्हेंबर २०२५ पासून सुरु झालेली परिक्रमा ही दि. १५ जुलै २०२६ रोजी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे विसावणार आहे. दरम्यान ही परिक्रमा गेल्या ४ म हिन्यात पश्चिम महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा या राज्यातून तळकोकणातून पुणे येथे पोहोचली आहे. या नंतर नवी मुंबई, बृहन्मुंबई कडे मार्गस्थ होणार आहे.





अवधूत चिंतन श्री गुरु देव दत्त सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज की, जय...! च्या जयघोषात अन्नछत्र मंडळाच्या पालखी पादुका परिक्रमेच्या आगमनाने पुणे शहर भक्तीरसात रंगले असून, श्री स्वामी समर्थ महाराजांचा जय घोष, रांगोळीच्या पायघड्या आणि पुष्पवृष्टी पुणेकरांनी उस्पुर्त पणे उत्साहात स्वागत केले.फुलाने सजविलेल्या पालखीच्या दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी झाली होती. श्री क्षेत्र अक्कलकोट येथून आलेली पालखी मंडईतील श्री शारदा गजानन मंदिरापासून वाजत-गाजत निघाली. शहरातील प्रमुख मार्गावरून शोभा यात्रा काढण्यात आली असून, ठिकठिकाणी भाविकांनी पुष्पवृष्टी व रांगोळ्यांनी पालखीचे स्वागत केले. कार्यक्रमाचे आयोजन अण्णा थोरात, विनायक घाटे, नामदेवराव मोहिते, राजाभाऊ वरखडे, विलास चव्हाण यांनी केले आहे. या प्रसंगी शोभा यात्रा पुणे महानगरपालिकेचे महापौर मंजुषा नागपुरे, आम दार हेमंत रासने यांच्या हस्ते तर पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक राघवेंद्र मानकर, ॲड. कुणाल टिळक, नगरसेविका स्वरदा बापट, स्वप्नाली पंडित हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पालखी पादुका दर्शन सोहळा, संस्कृती कार्यक्रम, पुरस्कार सोहळा संपन्न झाला. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये स्वामी भक्ती गीते हर्षद कुलकर्णी यांचे तर बाळासाहेब परदेशी यांचे साई नवनाथ भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम, योगेश तपस्वी यांचा स्वामी गीत सुगंध, स्वरसमर्थ भक्ती गंधर्व मुकुंद बादरायणी यांनी सदर केले.या बरोबरच श्री स्वामी समर्थ पुरस्कार ज्ञानेश्वर माऊली टाकळकर तर सेवा पुरस्कार दिपक वायकर यांना स.भ.मोहन बुवा रामदासी, समर्थ रामदास स्वामी मठ क्षेत्र खातगांव जि. अहिल्यानगर, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, पुणे पोलीस उपायुक्त परीमंडल १ ऋषिकेश रावले, पुणे येथील श्री अक्कलकोट स्वामी समर्थ ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष वीरेंद्र किराड, पुणे महानगरपालिका स्थायी समितीहे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा संपन्न झाला.

सामुदायिक महाआरती सोहळा हा पुणे म.न.पा. नगरसेविका प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, मसोबा देवस्थान खारावडेच्या अध्यक्षा मधुरा भेलके या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. दरम्यान श्री स्वामी समर्थ मंडपा म ध्ये श्री स्वामी समर्थ पादुका अभिषेक सामुदायिक आरती, रक्तदान सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुण्याचे श्रीपाद थोरात, बाबा रोटे, राजाभाऊ शिर्के, माऊली लोणारे, केंपन्ना नाईक, संदीप चव्हाण, संदीप कोकाटे, सचिन परदेशी, लाला गायकवाड, किशोर म्हस्के, उमेश बने, डॉ. संजय खेडेकर, सुरज थोरात, प्रथमेश घाटे, भगवान बलकवडे, बाळू गौडा, हरीश उर्फ दादा मोरे, नारायणराव चांदणे, नंदू कटके, युवराज चिकणे, सिद्धांत (स्वामी) काजळे, कौशल्य सलीम शेख, सोहम वरखडे, श्री क्षेत्र अक्कलकोटचे महाराष्ट्र पालखी परिक्रमा संयोजक संतोष भोसले, पुरोहित संजय कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# धाराशिव शहरात घरफोडी; ३ लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

धाराशिव शहर पोलीस ठाणे हद्दीत अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून दागिने व रोख रक्कम असा सुमारे ३ लाख १ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत फिर्यादी प्रविण प्रल्हाद माने (वय ३७, रा. वडगाव सि., ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.२७ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घराचा कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला.



यावेळी घरातील ५ ग्रॅम सोन्याचे दागिने, सुमारे १७५ तोळे चांदीचे दागिने, १२ किलो पितळी भांडी तसेच ७० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ३,०१,००० रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला.

या घटनेची माहिती मिळताच प्रविण माने यांनी दि. २८ मार्च रोजी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### परंड्यात नूतन सभापतीपदी भाऊसाहेब खरसडे यांचा सत्कार

**परंडा, दि.२९ मार्च -**

धाराशिव जिल्हा परिषद कृषी व पशुसंवर्धन सभापतीपदी भाऊसाहेब खरसडे यांची निवड करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर परंडा येथील भाजपा संपर्क कार्यालयात मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांनी खरसडे यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपा जिल्हा सरचिटणीस ॲड. गणेश खरसडे, दादासाहेब खरसडे, डॉ. दशरथ घोगरे, अंकुश मुळीक, होरे, नितीन गाढवे, प्रकाश दुरुंदे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.



### महिला आरोग्य जागरूकतेसाठी अणदूरमध्ये कार्यशाळा

**अणदूर, दि.२९ मार्च -**

येथील जवाहर महाविद्यालयात शांताकाकी आलूरे महिला सक्षमीकरण कक्ष व विशाखा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने चाळीशी अगोदर व नंतर महिला आरोग्य काळजी व जागरूकता या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेला महिला व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्य मार्गदर्शक डॉ. वैष्णवी लंगडे यांनी अनियमित मासिक पाळी, प्री-मेनोपॉज व मेनोपॉजनंतरची काळजी, तसेच स्तन कॅन्सर प्रतिबंध याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. नगरसेविका मीनाक्षी काळे, कल्पना गायकवाड, मिलन कासार व मीरा घुगे यांची उपस्थिती होती. प्रस्ताविक डॉ. मीना जाधव, सूत्रसंचालन डॉ. दीपा कलशेट्टी व आभार प्रदर्शन डॉ. ज्योती हत्तरगे यांनी केले.



### नवोदय विद्यालयात भारत सरकारच्या केंद्रीय प्रमाण पत्रांचे वाटप

**तुळजापूर, दि.२९ मार्च -**

भारत सरकारच्या केंद्रीय पंचायतराज व ग्रामविकास मंत्रालयातर्फे आयोजित मॉडेल युवा ग्रामसभा कार्यक्रमांतर्गत पीएम श्री नवोदय विद्यालय, तुळजापूर येथील विद्यार्थ्यांनी आदर्श बाल युवा संसद २०२५-२६ चे प्रभावी सादरीकरण करून उत्कृष्टता प्रमाणपत्र पटकावले. या यशासाठी सामाजिक विज्ञान विभागाचे चक्रपाणी गोमारे व परेश भाटिया यांनी मार्गदर्शन केले. दि. २८ मार्च रोजी प्रभारी प्राचार्य दत्तात्रय बडे व वरिष्ठ शिक्षक सी.सी. गोमारे यांच्या हस्ते प्रातःसभेत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्राचार्य बडे यांनी लोकशाही व्यवस्थेतील संसदेचे महत्त्व पटवून देत आदर्श नागरिकत्वाचे गुण आत्मसात करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता कराड यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शिक्षक व कर्मचारी वर्गाकडून अभिनंदन करण्यात आले.

### वाहनधारकांकडून ४.४३ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.२९ मार्च -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांकडून दि. २८ मार्च रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष मोहीम राबवून मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ४६६ प्रकरणे नोंदवून ४ लाख ४३ हजार ५०० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

# घाटपिंपरी ग्रामपंचायतीत ४०.५५ लाखांचा अपहार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

वाशी तालुक्यातील घाटपिंपरी ग्रामपंचायतीतील १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले असून, या प्रकरणी सरपंचासह तिघांविरोधात वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अश्विनी विनोद सातपुते (सरपंच, ग्रामपंचायत पाटपिंपरी), अनिल राजाराम तुपेरे (ग्रामपंचायत अधिकारी, घाटपिंपरी) आणि मनोज पवार (प्रो. रेवा एंटरप्रायझेस, उस्मानाबाद) यांनी संगनमत करून शासनाच्या १५ व्या वित्त आयोगातून मिळालेल्या निधीचा अपहार केल्याचा आरोप आहे. दि.६ मे २०२४ ते ४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध कामांच्या नावाखाली एकूण ४० लाख ५५ हजार ८३ रुपयांची रक्कम अनियमितरीत्या वापरून




सरपंचासह तिघांवर गुन्हा...

स्वतःच्या फायद्यासाठी वळवण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी पंचायत समिती वाशी येथील विस्तार अधिकारी विलास श्रीधरराव माचवे (वय ५३, रा. वाशी) यांनी दि. २८ मार्च २०२६ रोजी वाशी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१६(५) व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर प्रकारामुळे ग्रामपंचायत प्रशासनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. निधीचा अपहार नेमक्या कोणत्या कामांच्या माध्यमातून करण्यात आला, याबाबत पोलीस अधिक तपास करत असून संबंधित कागदपत्रांची छाननी सुरू आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. पुढील तपास वाशी पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

## श्रीराम नवमीनिमित्त उमरग्यात भाजपची शोभायात्रा; शहरात भक्तिमय वातावरण



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ मार्च -**

श्रीराम नवमीच्या पावन पर्वानिमित्त उमरगा शहरात भारतीय जनता पक्षाच्या वतीने गुरुवारी (दि.२६) सायंकाळी भव्य व आकर्षक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. या शोभायात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत संपूर्ण शहरात भक्तिमय व उत्सवी वातावरण निर्माण झाले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून शोभायात्रेची सुरुवात करून श्री राम मंदिरापर्यंत जल्लोषात मार्गक्रमण करण्यात आले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

भगवे फेटे परिधान करून रामभक्त मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. जय श्रीरामच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. युवक-युवतींचा मोठा सहभाग शोभायात्रेचे वैशिष्ट्य ठरला.

भाजप युवा नेते मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व हर्षवर्धन चालुक्य यांच्या मार्गदर्शनाखाली ही शोभायात्रा पार पडली.

यावेळी माजी नगराध्यक्ष हंसराज गायकवाड यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री राम मंदिरात शोभायात्रेचा समारोप करण्यात आला.

## ट्रॅक्टर ट्रॉलीला दुचाकीची धडक; युवकाचा जागीच मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२९ मार्च -**

कळंब-लातूर मार्गावर लोहाटा पाटीजवळ झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समाधान मोहन डोंगरे (वय २६, रा. कोथळा ता. कळंब) हे दि.१ मार्च २०२६ रोजी रात्री ८.२५ वाजता मोटारसायकल (एमएच २५ बीजी ३६२९) वरून जात असताना नॅचरल कारखान्याच्या कार्यालयाजवळ उसाच्या दोन ट्रॉली (क्रमांक नसलेल्या) जोडलेल्या ट्रॅक्टरला मागून धडक दिली. अपघातात ते गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला.

याप्रकरणी शंकर मोहन माने (रा. कोथळा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भा.न्या.सं. कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## परंड्यात ज्वेलर्स दुकानातून ८० हजारांचे चांदीचे पैंजण चोरीस

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२९ मार्च -**

परंडा शहरातील बार्शी रोडवरील ज्वेलर्स दुकानातून अनोळखी चार महिलांनी चांदीचे पैंजण चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी हिरालाल जनार्धन पेडगावकर (वय ६६, रा. स्वाती समर्थ नगर, बार्शी रोड, परंडा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे 'समर्थ ज्वेलर्स खर्डेकर गोल्ड' या दुकानात दि.२६ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे १२.४० वाजता चार अनोळखी महिला ग्राहकाच्या बहाण्याने आल्या. त्यांनी




दुकानातील सुमारे ६०० ग्रॅम वजनाचे ७ जोड चांदीचे पैंजण, अंदाजे ८० हजार रुपये किंमतीचे, चोरून नेले.

या घटनेची माहिती मिळताच पेडगावकर यांनी दि.२७ मार्च रोजी परंडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## परंड्यात 'जय श्रीराम'च्या गजरात भव्य रॅलीचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२९ मार्च -**

परंडा शहरातील महाराणा प्रतापसिंह चौक येथे प्रभू श्रीरामांच्या चरणी वंदन करून भव्य धार्मिक रॅलीचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी मा.आ. सुजितसिंह ठाकूर, युवा नेते मल्हार पाटील तसेच जि.प. सदस्य धनंजय सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शुभक्षणी वातावरण जय श्रीरामच्या गजराने दुमदुमून गेले होते. श्रद्धा, संस्कृती आणि एकतेचा संगम असलेला हा सोहळा केवळ रॅलीचा प्रारंभ नसून भक्तीभावनेचा उत्सव ठरला. उपस्थित भाविकांच्या मनात



श्रद्धेचा दिवा प्रज्वलित झाला. रॅलीचे मार्गक्रमण सुरू होताच पुष्पवृष्टी करून नागरिकांनी रॅलीचे स्वागत करत भक्तिमय वातावरण अधिकच भारावून टाकले.

यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस ॲड. गणेश खरसडे, जिल्हा उपाध्यक्ष ॲड. संतोष सूर्यवंशी, उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, अरविंद रगडे, उमाकांत गोरे, गौतम लटके, जयदेव गोफणे, धनाजी गायकवाड, तानाजी पाटील, शैलाभाभी ठाकूर, ज्योती सावंत, प्रियंका क्षीरसागर, मोनिका पाटील, सुप्रिया रगडे, ज्योती भातलवंडे आदी मान्यवर पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या.

## जगाला युद्धाची नव्हे, बुद्धाची गरज : सुनील गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२९ मार्च -**

चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त दि. २६ मार्च रोजी कळंब शहरात विचारप्रवर्तक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील विरंगुळा सभागृहात हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी सम्राट अशोक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक बौद्धाचार्य सुनील गायकवाड यांनी कलिंग युद्धानंतर अशोकांच्या जीवनातील झालेल्या परिवर्तनावर



प्रकाश टाकत, त्यांनी स्वीकारलेल्या अहिंसा, करुणा व समतेच्या मार्गाचे महत्त्व अधोरेखित केले. बुद्धांच्या धम्माच्या प्रसारासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहितीही त्यांनी दिली.

सध्याच्या जागतिक परिस्थितीत युद्धाऐवजी बुद्धांच्या विचारांची गरज असल्याचे सांगत, अहिंसा व मानवतेच्या मूल्यांवरच खऱ्या अर्थाने शांतता प्रस्थापित होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास सुमित रणदिवे, शिवाजी शिरसाट, राजाभाऊ गायकवाड, मुकेश गायकवाड यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हेडकॉन्स्टेबलपदी वाघमारेची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

तालुक्यातील काक्रंबा येथील अविनाश अरविंद वाघमारे या २० वर्षीय तरुणाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पोलीस हेडकॉन्स्टेबल पदावर यश संपादन केले आहे.



शेतकरी कुटुंबातील आर्थिक अडचणी, कमी उत्पन्न आणि नैसर्गिक संकटांचा सामना करत त्यांनी कठोर परिश्रम व आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले.

भरतीच्या काही दिवस आधी पायाला दुखापत झाली असतानाही त्यांनी हार न मानता स्पर्धेत भाग घेतला. ग्राउंडमध्ये ३८ गुण आणि लेखी परीक्षेत ६७ गुण मिळवत त्यांनी पहिल्याच प्रयत्नात यश मिळवले.

अविनाश यांच्या या यशामुळे कुटुंब व गावाचे नाव उज्ज्वल झाले असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

# आई येडेश्वरीची चैत्र यात्रेनिमित्त वाहतुक मार्गात बदल



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२९ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा येथे आई येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा दि. २ ते ७ एप्रिल दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

यात्रेनिमित्त लाखो भाविक राज्यासह इतर राज्यांतून येत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे.

दि.२ एप्रिल रोजी छबिना तर ३ एप्रिल रोजी देवीची पालखी आमराईमध्ये येणार असून त्याच दिवशी चुनखडी वेचण्याचा मुख्य धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहे.

या पार्श्वभूमीवर वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी तसेच भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचे वाहतूक निर्बंध लागू केले आहेत.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांनी व वाहनचालकांनी दिलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

### पर्यायी मार्ग व्यवस्था...

संभाजीनगर ते बार्शी : येरमाळा उड्डाणपूल-येडशी मार्गे.
बार्शी ते संभाजीनगर : कुसळंब-पांगरी-येडशी मार्गे.
कळंब ते बार्शी : मोहा फाटा-दहिफळ- येडशी-पांगरी-कुसळंब.
बार्शी ते परळी/परभणी : कुसळंब-पांगरी-येडशी-ढोकी-कळंब.
कळंब ते संभाजीनगर : कळंब-मनुष्यबळ फाटा-मांडवा-वाशी फाटा

### 'या' मार्गांवर वाहतुकीस मनाई...

येरमाळा-कुसळंब-बार्शी मार्गावर दोन्ही बाजूंनी वाहतुकीस बंदी.
बार्शी-कुसळंब- येरमाळा मार्गावर संभाजीनगरकडे येणारी वाहतूक बंद.
कळंब-येरमाळा-बार्शी मार्गावर वाहतूक बंद.
बार्शी-येरमाळा-परळी/परभणी मार्गावरील वाहतूक बंद.
कळंब- येरमाळा-संभाजीनगर मार्गावरही वाहतुकीस मनाई आहे.

### 'या' वाहनांना सूट...

पोलीस, रुग्णवाहिका, अग्निशमन दल, अत्यावश्यक सेवा, हलकी वाहने व एस.टी. बसेसना या निर्बंधातून सूट देण्यात आली आहे.



## सामान्य कार्यकर्त्याला संधी; निष्ठेचे फळ मिळाले : सिद्धेश्वर कोरे

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२९ मार्च -**

धाराशिव जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम सभापतीपदी निवड झाल्यानंतर सिद्धेश्वर कोरे यांनी आपल्या यशामागे कार्यकर्त्यांची निष्ठा व पक्षावरील एकनिष्ठतेला कारणीभूत ठरल्याचे सांगितले. माध्यमांशी बोलताना त्यांनी ही भावना व्यक्त केली. नंदगावचे सरपंच, कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य, उपसभापती, पंचायत समिती सदस्य अशा विविध पदांवर काम करताना कार्यकर्त्यांना बळ देणे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण



करणे हेच आपले ध्येय राहिले. पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.

सभापतीपदाच्या शर्यतीत आपले नाव नसतानाही सामान्य कार्यकर्त्याला संधी दिली, याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

# चित्रपटाला वास्तव इतिहास न समजता त्याची शहानिशा करावी - सिने अभ्यासक कोठाडीया

## महाराष्ट्र महाविद्यालयात 'चित्रपट आस्वाद कार्यशाळा' व लघुपट महोत्सव

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २९ मार्च :** चित्रपट आणि वास्तव यातील फरक विद्यार्थ्यांनी, प्रेक्षकांनी समजून घेतला पाहिजे. कोणताही चित्रपट इतिहासाची जागा घेऊ शकत नाही. चित्रपटाची निर्मिती होताना त्यात काल्पनिक घटना, संवाद, याचा भरणा केलेला असतो, हे विसरता कामा नये. त्यामुळे चित्रपटाला वास्तव इतिहास न समजता त्याची शहानिशा केली पाहिजे, असे मत सुप्रसिद्ध सिने अभ्यासक श्री.अनमोल कोठाडीया यांनी व्यक्त केले. निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात आयोजित चित्रपट आस्वाद कार्यशाळेत ते बोलत होते.

या कार्यशाळेत देश-विदेशातील लोकप्रिय लघुपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आलेत व त्यावर विद्यार्थ्यांची संवाद साधून लघुपटाविषयी समीक्षात्मक विचार श्री. अनमोल कोठाडिया यांनी मांडले. यात आकर्षण ठरले ते इराण येथील युद्धजन्य परिस्थितीवर आधारित आर यु फुटबॉल? हा २०१६ मध्ये प्रदर्शित झालेला एक विचार प्रवर्तक लघुपट व दुसरा म्हणजे मराठी भाषेतील गोल्डन टॉयलेट ज्यात शौचालय बांधण्यासाठी आपल्या कुटुंबासोबत संघर्ष केलेल्या एका करारी महिलेची गाथा आहे.

याप्रसंगी सिने अभ्यासक श्री. श्याम जैन यांनी आपली भूमिका मांडताना, महाविद्यालयात सुरू असलेल्या या उपक्रमाबद्दल गौरवोद्गार काढले, ते म्हणाले की यासारखे उपक्रम महानगरात चालतात परंतु गेल्या १३ वर्षापासून एका ग्रामीण भागातील महाविद्यालयात असा उपक्रम चालवणारे मराठवाड्यातील हे एकमेव महाविद्यालय आहे. विद्यार्थ्यांना सिने साक्षर बनविण्यात यासारख्या उपक्रमाची नक्कीच मदत होईल. चित्रपटाकडे मनोरंजन म्हणून न पाहता अभ्यास विषय म्हणून पहावे असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम यांची उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय समारोपात त्यांनी विद्यार्थ्यांना चित्रपट माध्यमाची ताकद फार मोठी आहे, त्याचा नेमका आस्वाद घ्यावा, फक्त मनोरंजन म्हणून त्याकडे पाहू नका. असा सल्ला दिला याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक तथा कॅम्पस फिल्म सोसायटीचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, सचिव डॉ. हंसराज भोसले, कोषाध्यक्ष डॉ. सचिन बसुदे, सदस्य प्रा. मनीषा घोगरे, प्रा. पूनम सातपुते, सौ.रोहीणी गोवंडे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन कु. अंकिता मुळे, कु. प्रीती रांजणे यांनी केले .श्रावणी माने, अमर तुरे ,प्रशांत पाटील, अंकिता आगलावे, श्रुती पवार, हर्षविणा मुळे यांनी कार्यशाळा यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. तर तंत्र-सहाय्यक म्हणून श्री. सुनील वाकळे यांनी काम पाहिले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



## संक्षिप्त...

### श्रीरेणुकादेवी चैत्र पोर्णिमा यात्रा



**रेणापूर :** येथील ग्रामदेवता परीसराचेआराध्य दैवत श्रीरेणुका देवीची चैत्र पोर्णीमा यात्रा गुरुवार रोजी होणार असून या यात्रेनिमित्त विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी रेणापूर येथील श्रीरेणुकादेवीची चैत्र पोर्णिमा यात्रा गुरुवार दिनांक २ रोजी होणार असून परिसरातील भाविक भक्तांनी यात्रेचा लाभ घ्यावा. चैत्र पोर्णीमा यात्रेनिमित्त गुरुवार रोजी विधी पूर्वक महापूजा व दिवसभर प्रसाद वाटप होणार असुन रात्री साडेआठ वाजता श्रीरेणुका देवीची पालखी (छबीना) मिरवणूक गावातून निघणार आहे तरी आराधी मंडळींनी व समस्त गावकरी मंडळ यानी पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे अशी विनंती श्रीरेणुकादेवी मंदिर ट्रस्ट मंडळ यांच्या वतीने करण्यात आली आहे.

### घनसरगाव सेवा संस्थेची शंभर टक्के वसुली



**रेणापूर : तालुक्यातील** घनसरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाची बँक स्तरावर रेणापूर तालुक्यात सर्व प्रथम१००%वसुली झाली त्या बद्दल घनसरगाव येथील विवीध सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन ,व्हा.चेअरमन तसेच गट सचिव,शाखा तपासनि शाखेतील सर्व कर्मचारी संस्थेच्या संचालक मंडळ यांचा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक रेणापूर शाखा येथे सत्कार करण्यात आला.यावेळी

घनसरगाव विवीध सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन सुरेश शिंदे, व्हा.चेअरमन तथा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रमोद बाळासाहेब कापसे, सचिव कसबे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे रेणापूर शाखेचे मॅनेजर,साखरे साहेब,बावची चेअरमन एन टी, रेणापूर चे नगरसेवक सचिन मोटेगावकर,संतोष शिंदे,धर्मराज शिंदे,सुमठानचे साखरे यांच्यासह बँकेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

### निलंगा येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची सभासद नोंदणी



**निलंगा:** मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या आदेशाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून शनिवार दि. २८ मार्च रोजी निलंगा येथे सभासद नोंदणी अभियान जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार यांच्या पुढाकारातून राबविण्यात आले,जे महिनाभर मनसे कार्यालयातून चालू राहणार आहे.यावेळी जिल्हासचिव प्रदीप शेळके,जिल्हाउपाध्यक्ष सुरज पटेल,शहराध्यक्ष अबू बकर,तालुका सचिव गणेश उसनाळे, तालुकाउपाध्यक्ष विकास सूर्यवंशी हे पदाधिकारी उपस्थित होते.मराठी माणसाच्या हक्कांसाठी आणि स्थानिकांच्या विकासासाठी कटिबद्ध असलेल्या मनसेच्या विचारांशी जोडण्यासाठी हे अभियान आयोजित करण्यात आले आहे.

या अभियानाअंतर्गत निलंगा तालुक्यातील विविध गावांमध्ये, शहरांमध्ये तसेच प्रमुख चौकांमध्ये सभासद नोंदणी करण्यात येणार आहे.युवक, शेतकरी, कामगार, व्यावसायिक आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन मनसेच्या विचारांना बळ द्यावे तसेच

सभासद नोंदणीसाठी इच्छुकांनी मनसे कार्यालय,हाडगा नाका येथे मनसे पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा व आपली प्राथमिक सदस्यत्वाची नोंदणी करून घ्यावी असे आवाहन जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांनी निलंगेकरांना केले आहे.या कार्यक्रमासाठी मनसे कार्यकर्ते महेश सावनगिरे, राहुल चौधरी, लखन भालके, रणजीत साळुंखे, रणधीर सोळंके, सोमनाथ मेळे, विष्णू पवार आदींसह अनेकांनी परिश्रम घेतले.

### महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात विद्यापीठस्तरीय युवती नेतृत्व विकास शिबिराचे उद्घाटन

**उदगीर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यापीठस्तरीय तीन दिवशीय युवती नेतृत्व विकास शिबिराचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक विजया मारोतकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर होते. या प्रसंगी उपाध्यक्ष बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष माधवराव नौबदे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार तसेच प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. उद्घाटनप्रसंगी बोलताना विजया मारोतकर यांनी युवतींनी आपल्या अंगभूत गुणांचा विकास करून सक्षम नेतृत्व सिद्ध करावे, असे प्रतिपादन केले. तसेच चांगल्या आचरणातून कुटुंब, समाज आणि देशाचे नाव उंचावावे, असेही त्यांनी आवाहन केले. प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी शिबिरार्थींना शुभेच्छा देत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असे उपक्रम उपयुक्त ठरतात, असे सांगितले.

# हकनकवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह, विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २९ मार्च :** २८ मार्च २०२६ वार शुक्रवार रोजी मौजे हकनकवाडी तालुका उदगीर येथे नामास कीर्तन साधन पै सोपे जळतील पापे जन्म अंतरीची गेल्या ५५ वर्षापासून परंपरागत चालू असलेला, यंदा २७ मार्च शुक्रवार पासून भव्य अखंड हरिनाम सप्ताहची विविध कार्यक्रमाने सुरुवात झाली. यात सकाळी ७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण दुपारी १२ ते ३ श्री ह.भ.प. संगमेश्वर महाराज पटवारी लोणी यांचे शिवपुराण कथा कार्यक्रम वर्ष दुसरा दररोज ७ दिवस आहे दुपारी ३ ते ५ रामायण पोथी सांयकाळी ५ ते ८ महाप्रसादाचा कार्यक्रम रात्री ९ ते ११ नित्य कीर्तने, २७ मार्च विद्या वाचस्पती ह. भ. प. जलाल महाराज सय्यद करंजीकर नाशिक यांचे कीर्तन, २८ मार्च ह. भ. प. तुकाराम महाराज मुंडे शास्त्री परळीकर, २९ मार्च ह. भ. प. भास्कर महाराज सांडोळकर, ३० मार्च ह. भ. प. भागवताचार्य सौ. मैनाताई हिपळनेरिकर देगलूर, ३१ मार्च ह. भ. प. गोविंद महाराज मुंडे परळी, १ एप्रिल ह.भ. प. गोविंद महाराज गोरे आळंदी देवाची, २ एप्रिल रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत लक्ष्मण शक्तीचा कार्यक्रम २ एप्रिल ह. भ. प. सोपान महाराज सानप शास्त्री संध्याकाळी १२ ते ४ गवळण, भारुडे. ३ एप्रिल सकाळी ६ते ९ ग्रंथदिंडी व पालखी सोहळा, ३ एप्रिल सकाळी ९ वाजता ह.भ .प. ज्ञानोबा माऊली अरबूज वाडीकर काल्याचे किर्तन होणार आहे. मृदंगाचार्य- विशारद पंडित महाराज दहिफळे किनगाव, रामायण- प्रकाश फड, बालाजी मुंडे, पारायण- अंकुश महाराज, नित्य हरिपाठ- ज्ञानोबा केंद्रे, मृदंगाचार्य- भानुदास फड, पेटी वादक- रतन राठोड, काकड आरती- कौशल्याबाई फड, गायक- पंढरी चोले, भानुदास मुंडे, याजसाठी केला होता अट्टहास शेवटचा दिस गोड व्हावा भव्य दिव्य असा अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन हकनकवाडी सुरू असून, परिसरातील भाविकांनी याचा आवश्यक लाभ घ्यावा असे समस्त गावकरी मंडळी हाकनकवाडी यांनी कळवले आहे.



# साहित्यिक विलास सिंदगीकर यांच्या 'भाकरीचं झाड' कथेने पुणेरी प्रेक्षकांच्या डोळयाच्या कडा पाणावल्या

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. २९ मार्च :** मराठी वाङमयाच्या इतिहासात मराठी कथा साहित्य निर्मितीला संपन्न वारसा आणि परंपरा आहे. मानवाला कथा साहित्याची देण ही प्राचीन काळापासून लाभली आहे. कथा हा वाङमय प्रकार हा माणसाच्या आवडीचा प्रांत आहे. माणूस हा गोष्टी वेल्हाळ प्राणी आहे. या कथाकथन परंपरेला ७०-८० वर्षाचा इतिहास आहे. आद्यकवी मुकुंदराज यांच्या पासून सुरू झालेला हा वारसा अण्णाभाऊ साठे, अरविंद गोखले, दि.बा. मोकाशी, आणि गंगाधर गाडगीळ यांनी १९६० च्या दशकात कथेला नवा साज दिला. या सर्वांची कथा वाचायची होती, तर व्यंकटेश माडगुळकर,शंकर पाटील, आणि द.मा. मिरासदार यांची कथा ही कथाकथन परंपरा पुढे नेहणारी होती ', असे प्रतिपादन साहित्यिक विलास सिंदगीकर यांनी यासाहित्यिक कलावंत प्रतिष्ठान पुणे येथे कार्यक्रमाचे वेळेस बोलत होते.



साहित्यिक कलावंत प्रतिष्ठान, पुणे आयोजित कोथरूड पुणे येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात शनिवार दि.२८ मार्च २०२६ रोजी २५ वे साहित्यिक कलावंत संमेलनातील कथाकथन सत्राच्या अध्यक्ष पदावरून बोलत होते. यावेळी प्रा.रविंद्र कोकरे आणि मा.श्री. सु .ल.खुटवड आदी कथाकार उपस्थित होते . विलास सिंदगीकरांनी अध्यक्षीय समारोप करताना त्यांनी ' भाकरीचं झाड ' हया नावाची गंभीर स्वरूपाची मराठवाडी ग्रामीण बोलीची कथा सांगून प्रेक्षकांच्या डोळ्याच्या कडा ( पापण्या) पाणावल्या. त्यांनी श्रोतांना मंत्रमुग्ध करून सोडले. श्री.रविंद्र कोकरे यांनी 'पंचनामा', तर सु.ल.खुटवड यां दोघांनीही विनोदी कथा सांगितल्या. तत्पूर्वी प्रतिष्ठानचे कार्यवाह मा.श्री.वि.दा.पिंगळे यांनी स्मृतीचिन्ह,पुष्पगुच्छ आणि अध्यक्षीय भाषण ग्रंथ देऊन कथाकरांचा सत्कार केला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष,पुणे महानगरपालिकेचे माजी महापौर तथा साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष . दिलीप बराटे,संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ.शैलेश त्रिभुवन,कार्यवाह वि.दा. पिंगळे,उपाध्यक्ष राजेंद्र वाघ,ज्येष्ठ साहित्यिक शिवाजी चाळक आदी. मान्यवरास प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते .हया कथाकथन सत्राचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन मा..सतिष सुरवसे यांनी तर आभार मुख्याद्यापक .शिंदे सर यांनी मानले. या कथाकथन सत्राला प्रेक्षकांनी दाद दिली.

# रेणापूर तालुका क्रीडा संकुलाचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. २९ मार्च :** रेणापूर येथे नव्याने विकसित होत असलेल्या साडेतीन कोटी रुपये खर्चाच्या तालुका क्रीडा संकुलाचे भूमिपूजन भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी दि २७ रोजी करण्यात आले.

रेणापूर येथे सुसज्ज क्रीडा संकुल उभे राहावे अशी रेणापूर तालुक्यातील विविध खेळातील खेळाडूंची अनेक दिवसांची मागणी प्रत्यक्षात कार्यान्वित होत असून या क्रीडा संकुलनासाठी आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाकडून ३ कोटी ३८ लाख रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून कबड्डीचे चार मैदान, खो खो खेळाचे दोन मैदान, बॅडमिंटन खेळाचा हॉल, कार्यालयीन इमारत, ४०० मीटर लांबीचा धावनपथ (रनिंग टेक), आणि कंपाउंड वॉल आदी कामे करण्यात येणार आहेत.

रेणापूर तालुका क्रीडा संकुलनाचे भूमिपूजन भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराडे यांच्या शुभहस्ते शुक्रवारी करण्यात आले याप्रसंगी तहसीलदार प्रशांत थोरात, सा बा विभागाचे उप अभियंता लक्ष्मण देवकर, पंस उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभा आकनगिरे, सह अभियंता प्रवीण पवार, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, भाजपाचे महेंद्र गोडभरले, दशरथ सरवदे, अनिल भिसे, सौ पंस सदस्या शितल राऊतराव यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आ कराड यांनी तालुका क्रीडा संकुल कामाची माहिती जाणून घेतली आणि महत्वपूर्ण सूचना केले. याप्रसंगी लक्ष्मण यादव, रमेश कटके, अजय राठोड, निवृत्ती चिद्रे, ओम चव्हाण, नामदेव बोबडे, बाबासाहेब घुले, वसंत करमोडे, राम मोरे, संतोष चव्हाण अच्युत कातळे, राजू आत्तार, अशोक राठोड, गणेश चव्हाण, श्रीकृष्ण पवार, मोहनराव शिरसाट, नारायण राठोड, उत्तम चव्हाण, गोपाळ पडले, राजकुमार आलापुरे, श्रीमंत नागरगोजे, रामा चव्हाण, सुरेश बुड्डे, अजित पाटील, शिवाजी जाधव, सिद्धेश्र्वर मामडगे, राम बडे, लक्ष्मण खलंग्रे, हनुमंत भालेराव, राजू मानमोडे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सम्राट अशोक जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** शांती, अहिंसा आणि मानव कल्याणाचा जयघोष करणारे चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, लातूर २०२६ च्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली.

सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त लातूर शहरात डॉ. आंबेडकर चौक, बौध्दनगर येथून छत्रपती राजर्षी शाहु महाराज चौक, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चौक, गंजगोलाई, हनुमान चौक, महात्मा गांधी चौक ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपर्यंत भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली ६०० फुट पंचरंगी धम्म ध्वज मिरवणूक काढण्यात आली. या पंचरंगी धम्म ध्वज मिरवणूकीचे आयोजन विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, लातूर २०२६ चे अध्यक्ष गोविंद महादेव कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.या भव्य धम्मध्वज मिरवणूकीमध्ये नगरसेवक विनय जाकते, साधूभाऊ गायकवाड, आशाताई चिकटे, चिंटू गायकवाड, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, केशव कांबळे, सुशील चिकटे, राम कोरडे, मिलिंद धावारे, बंटी गायकवाड, रवी कांबळे, विकास कांबळे, प्रशांत माने, तुषार कांबळे, रामदास सोनवणे यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील अनेक मान्यवर आणि बौद्ध उपासक उपासकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# प्रभु श्री रामांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुन आजच्या तरूणांनी जीवनाची वाटचाल करावी : माजी मंत्री आ.संजय बनसोडे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २९ मार्च :** प्रभू श्रीराम हे सत्य, धर्म आणि आदर्श जीवनाचे प्रतीक आहेत. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आपण समाजात एकोपा, शांतता आणि सद्भावना निर्माण करण्याचे काम आपण सर्वांनी करावे. प्रभु श्री रामांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुन आजच्या तरूणांनी आपल्या जीवनाची वाटचाल करावी असे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर शहरात आयोजीत श्री राम नवमीनिमित्त भव्य शोभा यात्रेप्रसंगी बोलत होते.

श्री राम नवमीच्या पावन निमित्ताने उदगीर शहरात पारंपरिक उत्साहात शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. विविध धार्मिक, सामाजिक संस्थांच्या सहभागामुळे वातावरण भक्तीमय झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात, भगव्या पताक्यांनी व फुलांनी सजलेल्या रथांमधून प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेचे दर्शन नागरीकांनी घेतले.

यावेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शोभायात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या पावन प्रसंगी आमदार संजय बनसोडे यांनी सर्व नागरिकांना श्री राम नवमीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी आ.गोविंदराव केंद्रे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, नगराध्यक्षा स्वाती हुडे, उपनगराध्यक्षा सौ.शितल शिंदे,

जि.प. सदस्य दिलीपकुमार मटके, जि.प. सदस्य ज्ञानेश्वर बिरादार, नगरसेविका निकिता अंबरखाने, रेखा उप्परबावडे, विजय निटुरे, आशिष अंबरखाने, धिरज कसबे, धनाजी मुळे, मनोज पुदाले, प्रशांत मांगुळकर, सतिश पाटील, अमोल अनकल्ले, कैलास पाटील, वसंत पाटील, संतोष गिरी महाराज, यमुनाजी भुजबळे, कमलाकर फुले, कुणाल बागबंदे, नरसिंग शिंदे, प्रकाश बिरादार, अमोल निडवदे, आदी उपस्थित होते.

यावेळी आ.संजय बनसोडे यांनी शोभायात्रेच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

शोभायात्रे दरम्यान पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ही शोभायात्रा शांततेत व उत्साहात पार पडली.



CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तरुणांनी शिक्षणाला कौशल्यात रूपांतरित करावे : आदिनाथ सांगवे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** तरुणांनी केवळ पदव्या न मिळवता आपल्या शिक्षणाला कौशल्यात रूपांतर करून जीवन समृद्ध करावे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ उद्योजक आदिनाथ सांगवे यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि मलाबार चॅरिटेबल ट्रस्टद्वारे आयोजित शिष्यवृत्ती आणि प्रमाणपत्र वितरण समारंभात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी विचारमंचावर महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे, प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ.आनंद शेवाळे, पर्यवेक्षक प्रा.नितीन वाणी, जनशिक्षण संस्थेच्या संचालिका सोनी दायमा, मलाबार शाखा लातूरचे व्यवस्थापक तानाजी जगताप, जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य देविदास कोल्हे आणि बाबासाहेब सोन-वणे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून दिप प्रज्वलन करण्यात आले. पुढे बोलताना आदिनाथ सांगवे म्हणाले की, शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले असले तरी सर्वसामान्यांना उच्च शिक्षण परवडणारे नाही. अनेक सामाजिक संघटना वंचित, उपेक्षित, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांकरिता मदतीचा हात देत आहेत.



## विविध वृत्त...

### प्रभावी संवाद कौशल्य, वक्तृत्व नेतृत्व विकासाची भक्कम पायाभरणी

**लातूर :** भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या शिबिरात ''प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व कला'' या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. ज्ञानदेव राऊत (मराठी विभाग, शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी) यांनी आपल्या विस्तृत मार्गदर्शनात सांगितले की, ''संवाद हा केवळ माहिती देण्याचा मार्ग नसून तो व्यक्तिमत्त्व घडवण्याचा मूलभूत पाया आहे. प्रभावी संवादासाठी विचारांची स्पष्टता, भाषेवर प्रभुत्व, आत्मविश्वास आणि श्रोत्यांशी संवाद साधण्याची क्षमता अत्यंत महत्त्वाची आहे. युवकांनी वाचन, चिंतन आणि सतत सराव यांच्या माध्यमातून वक्तृत्व कौशल्य विकसित केले पाहिजे. आजच्या डिजिटल युगातही प्रत्यक्ष संवादाची ताकद कमी झालेली नाही; उलट योग्य संवादकौशल्य असलेला युवक समाजात नेतृत्वाची भूमिका प्रभावीपणे पार पाडू शकतो.''ते पुढे म्हणाले, ''वक्तृत्व ही केवळ भाषण देण्याची कला नसून ती लोकांना प्रेरित करण्याची आणि योग्य दिशादर्शन करण्याची शक्ती आहे. नेतृत्व विकसित करण्यासाठी संवादातील प्रामाणिकपणा, संयम आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे.'' कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना डॉ. जयद्रथ जाधव (मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, रेणापूर) म्हणाले की, ''आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान युगात युवकांनी केवळ शैक्षणिक ज्ञानावर समाधान मानू नये, तर ते प्रभावीपणे मांडण्याची कला आत्मसात करणे गरजेचे आहे. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.या शिबिराच्या माध्यमातून युवक-युवतींमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व कला विकसित होण्यास मोठी चालना मिळत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

### 'प्रकल्प, क्षेत्रीय संकलन व शिक्षणांतर्गत सेवा' विषयावर कार्यशाळा संपन्न !

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद कला महाविद्यालयातील मराठी विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रकल्प, क्षेत्रीय संकलन व शिक्षणांतर्गत सेवा' या विषयावर विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्रमुख साधन व्यक्ती म्हणून डॉ. ब्रिजमोहन दायमा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता व्यावहारिक अनुभवातून शिकावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'प्रकल्प, क्षेत्रीय संकलन व शिक्षणांतर्गत सेवा' या विषयावरील विशेष व्याख्यान आणि कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या प्रसंगी प्रमुख साधन व्यक्ती म्हणून डॉ. ब्रिजमोहन दायमा यांनी व्यवहारातील विविध उदाहरणे देत विद्यार्थ्यांना या विषयाचे महत्त्व पटवून दिले.क्षेत्रीय प्रकल्प करताना पुस्तकांतील ज्ञानालाव्यावहारिक ज्ञानाची जोड आवश्यक असते असे मत प्रतिपादन केले.आपल्या मार्गदर्शनात डॉ. दायमा म्हणाले की, कोणत्याही प्रकल्पाचे यश हे त्याच्या सूक्ष्म नियोजनावर आणि क्षेत्रीय संकलनावर अवलंबून असते. केवळ माहिती गोळा करणे म्हणजे संकलन नव्हे, तर त्या माहितीचे विश्र्लेषण करून त्यातून निष्कर्ष काढणे महत्त्वाचे आहे. दैनंदिन व्यवहारातील सोपी उदाहरणे देत त्यांनी प्रकल्पाची मांडणी कशी करावी, यावर सविस्तर प्रकाश टाकला.

### सक्शन मशीनचे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते लोकार्पण

**लातूर :**स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत रेणापूर नगरपंचायतीला राज्य शासनाकडून मिळालेल्या सक्शन मशीनचा भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते शुक्रवारी लोकार्पण करण्यात आले.राज्य शासनाच्या वतीने स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत मागील काळात बांधकाम केलेल्या घरासह विविध इमारतीतील दुरावस्था झालेल्या अथवा भरलेल्या शौचालय टँकचा उपसा करण्यासाठी रेणापूर नगरपंचायतीला तब्बल १८ लाखाची सक्शन मशीन नुकतीच प्राप्त झाली आहे. सदर सक्शन मशीनचे भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई शामराव आकनगिरे, पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, नगरपंचायत पाणीपुरवठा सभापती दत्ता सरवदे, स्वच्छता निरीक्षक मेहमूद शेख, मारूफ आत्तार, ईश्वर बद्दर, हनुमंत भालेराव, योगेश राठोड, रमेश चव्हाण, मनोज चक्रे, परमेश्वर मोटेगावकर, सोपान सातपुते, शेख शौकत यांच्यासह अनेक जण होते.

### बस पास हरवला आहे

कार्तिक शंकर धावारे या लातूरच्या साने गुरुजी विद्यालयात इयत्ता नववी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा एसटी बस सवलत पास मुरुड अकोला - लातूर बस प्रवासात हरवला आहे. कोणाला सापडल्यास कृपया पुढील मोबाईलवर संपर्क साधावा.

**संपर्क : ७७७५० २११०१**

## संघ शताब्दी वर्षात पंचपरिवर्तनाचा संकल्प

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कार्याला शंभर वर्ष पुर्ण झाले. या शंभर वर्षाच्या काळात संघाने सर्व समाजघटका पर्यंत जाण्याचा ,समाज संघटीत करण्याचा प्रयत्न केला असुन, अनेक गोष्टी झाल्या कांही राहील्या त्या पुर्ण करण्यासाठी संघाने समाजाच्या संवादासाठी संपर्कासाठी पंच परिवर्तनाचे सुत्र समाजा समोर ठेवले असुन त्या निमित्ताने गाव वस्ती पातळीपर्यंत हिंदु संमेलने होत असल्याची माहिती रा.स्वं सेवक संघाच्या पश्चीम क्षेत्र (महाराष्ट्र गोवा गुजराथ) प्रचार प्रमुख प्रमोदजी बापट यांनी लातूरात पत्रकारांच्या संवाद बैठकीत बोलताना दिली.यावेळी जिल्हा प्रचार प्रमुख सीए जगदीश तोष्णीवाल यांनी प्रास्ताविक केल. यावेळी लातूर विभागसंघचालक सीए संजय अग्रवाल,शहरसंघचालक उमाकांत मद्रेवार यांची उपस्थिती होती.



यावेळी बोलताना प्रमोदजी बापट

म्हणाले की, संघाच्या कामात मोठ्या संख्येने तरुण जोडला जात आहे वेब साईटच्या माध्ममातुन महिन्याला सरासरी पस्तीस हजार इतके लोक जोडले जात आहेत. संघाला स्वतःच्या संघटन शक्ती पेक्षा समाज संघटन हे महत्वाचे असल्यामुळे संघाने विविध उपक्रमाच्या माध्यमातुन समाजाशी नाते जोडण्याचा प्रयत्न केला आहे त्याला समाजातील सज्जन शक्ती मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत आहे. देशभरात संघाच्या ८८ हजार शाखा असुन महाराष्ट्रात सहा हजार शाखा आहेत तसेच साप्ताहिक मिलन आणि मासिक मिलनाच्या माध्यमातुन संघकाम होत आहे. संघाच्या संघटन आणि सेवेची १०० वर्ष हे व्यापक गृहसंपर्क अभियानाच्या माध्यमातुन भारतभर घरोघरी माहिती दिली जात आहे. समाजातील प्रमुख नागरिकांच्या एकत्रीकरणातुन संगोष्ठी सारखे कार्यक्रमाचे आयोजन केल जात आहे त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. समाजातील विविध वर्ग आणि संघटन यांच्या सोबत सद्भावना बैठकाचे आयोजन केले जात आहे. व्यापक प्रमाणावर समाज संघटील व्हावा म्हणुन गाव, प्रभाग पातळीवर हिंदु संमेलनाचे आयोजन होत असुन समाज प्रबोधन केले जात आहे. संघाच मुख्य काम व्यक्ती निर्माणाचे आहे असे सांगुन या शताब्दी वर्षात पंचपरिवर्तनाचे सुत्र मांडले आहे. या पंचपरिवर्तना मध्ये सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, कुटुंब प्रबोधन, स्व आधारित जिवन, नागरिक कर्तव्य याचे समाजाने स्वतःच्या जिवनात अचरण करावे यासाठी जनप्रबोधन केले जात आहे.

## माईर एमआयटी लातूर येथे 'विश्वमैदान २०२६' आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचा आज भव्य शुभारंभ

### पाच दिवसीय क्रीडा महोत्सवात अंतिम सामने रंगणार; प्रा. तेजस कराड यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने 'विश्वमैदान २०२६' या आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे भव्य आयोजन करण्यात आले असून, हा पाच दिवसीय क्रीडा महोत्सव ३० मार्च ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत रंगणार आहे.






प्रा. तेजस कराड

या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ सोमवार, दि. ३० मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता माईर एमआयटी शिक्षण संकुलातील विश्वधर्मी विश्व मैदान क्रीडांगणावर पार पडणार आहे. उद्घाटनासाठी महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार विक्रम काळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी सन्माननीय पाहुण्या म्हणून लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच क्रीडा व युवक सेवा विभागाचे उप संचालक महादेव कसगावडे, माजी रणजी क्रिकेटपटू विशाल गिते, आंतर राष्ट्रीय नेमबाज जागृती चंदनकेरे-बोपचंडे, आंतर राष्ट्रीय बेसबॉल खेळाडू ज्योती पवार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

समारोप सोहळा शुक्रवार, दि. ३ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता होणार असून, लातूर लोकसभेचे खासदार डॉ. शिवाजी काळगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी लातूर भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर, लातूर मनपा नगरसेविका प्रेरणा होनराव आणि मनपा उपायुक्त वसुधा फड उपस्थित राहणार आहेत. तसेच कर्करोग तज्ञ डॉ. ब्रिजमोहन झंवर व भूलतज्ञ डॉ. आरती झंवर सहभागी खेळाडूंना मार्गदर्शन करणार आहेत. या क्रीडा महोत्सवा मागे माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संस्थापक डॉ. विश्वनाथ दा. कराड यांची प्रेरणादायी संकल्पना असून, कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

''एकच आव्हान, जिंकूया मैदान!'' या घोषवाक्याखाली होत असलेल्या या स्पर्धांचा उद्देश युवकांमध्ये क्रीडावृत्ती, नेतृत्वगुण, शिस्त आणि संघभावना विकसित करणे हा आहे. ''वसुधैव कुटुंबकम्'' या तत्त्वावर आधारित हा महोत्सव बंधुभाव, एकात्मता आणि जागतिक शांततेचा संदेश देणार आहे.

या स्पर्धेअंतर्गत २२ ते २९ मार्च दरम्यान इनडोअर व आउटडोअर प्रकारातील लीग व नॉकआउट सामने पार पडले असून, विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील ७५३ खेळाडूंनी सहभाग घेतला. उपांत्य फेरीतील विजेत्यांनी अंतिम फेरीत प्रवेश मिळवला असून, ३० मार्च ते ३ एप्रिल दरम्यान विविध क्रीडा प्रकारांचे अंतिम सामने रंगणार आहेत, अशी माहिती संचालक प्रा. तेजस हनुमंत कराड यांनी दिली.

## मतदार यादी विशेष सघन पुनरावलोकन (SIR) मोहिमेत लातूर तालुक्यातील मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा प्रशासनामार्फत मतदार यादीचे विशेष सघन पुनरावलोकन (SIR) कार्यक्रम लवकरच राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत मतदार यादीतील अस्पष्ट फोटो, दुबार नावे आणि 'एसआयआर मॅपिंग' (SIR Mapping) यांसारखी महत्त्वाची कामे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश प्राप्त झाले आहेत.

या पार्श्र्वभूमीवर लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पंचायत समिती सभागृह येथे शहरातील सर्व नगरसेवक, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि बीएलओ पर्यवेक्षकांची आढावा बैठक झाली. या बैठकीत उपस्थितांना एसआयआर कार्यक्रम, मॅपिंग आणि मतदारांमधील जनजागृतीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

सध्या लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे मॅपिंगचे केवळ ५१टक्के कामकाज पूर्ण झाले असून, हे काम ३१ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करणे अनिवार्य आहे. बीएलओ घरोघरी भेट देऊन माहिती संकलित करत असताना अनेक मतदार सहकार्य करत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, माहिती उपलब्ध करून न दिल्यास संबंधित मतदारांना सुनावणीसाठी बोलावले जाईल. ज्या मतदारांचे मॅपिंग पूर्ण झालेले नाही, त्यांना बीएलओमार्फत २ ते ३ वेळा सुनावणीची नोटीस दिली जाईल आणि सुनावणीस उपस्थित राहून पुरावे सादर केल्यास त्यांचे नाव मतदार यादीत कायम ठेवले जाईल. मात्र, सुनावणीसाठी अनुपस्थित राहिल्यास किंवा पुरावे सादर न केल्यास मतदाराचे नाव मतदार यादीतून थेट वगळले जाईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

२३४-लातूर ग्रामीण व २३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदारांनी आपापल्या रहिवास क्षेत्रातील बीएलओ यांची समक्ष भेट घेऊन त्यांना आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी. मतदारांनी स्वतःचा किंवा कुटुंबातील सदस्यांचा २००२ च्या मतदार यादीतील तपशील अधिकृत संकेतस्थळावर किंवा 'ECINET' पवर शोधून बीएलओना सहकार्य करावे, तसेच विवाहित महिलांनी त्यांच्या माहेरच्या नातेवाईकांची २००२ च्या यादीतील माहिती उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी यावेळी केले. या बैठकीस मनपा उपायुक्त पंजाब खानसोळे, नायब तहसीलदार अर्चना मैंदर्गी यांच्यासह बीएलओ, पर्यवेक्षक उपस्थित होते.

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनंतर प्रशासकीय हालचाली, उपोषणाची सांगता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** लातूर जिल्ह्यातील मौजे साई येथे फोफावलेली अवैध दारु विक्री आणि त्यामुळे ढासळलेली कायदा-सुव्यवस्था सुधारण्यासाठी तरुण कार्यकर्ते श्री. सुरज दत्तात्रय पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर येथे २५ मार्चपासून सुरू केलेले उपोषण, प्रशासनाच्या आश्वासनानंतर २६ मार्च रोजी रात्री ८ वाजता मागे घेण्यात आले आहे.

साई गावात राजरोसपणे सुरू असलेल्या अवैध दारु विक्रीमुळे मद्यपींचा त्रास वाढला असून, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. या अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी बंदी घालावी आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, या प्रमुख मागण्यांसाठी श्री. सुरज पाटील उपोषण सुरू केले होते.

या उपोषणाची माहिती मिळताच राज्याचे माजी मंत्री तथा काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी तातडीने दखल घेण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या सूचनेनुसार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्री. अभय साळुंखे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. संतोष देशमुख, श्री. राजकुमार

पाटील आणि पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी संवाद साधून, मागण्या जाणून घेतल्या. यानंतर याप्रश्नी जिल्हा प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी लोकप्रतिनिधींनी केली.

दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर आणि संबंधित

विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत, अवैध व्यवसायांवर कडक कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर श्री. सुरज दत्तात्रय पाटील यांनी आपले उपोषण सोडले.

यावेळी साई गावचे उपसरपंच अमोल पवार, बापूराव पवार, परमेश्वर पवार यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी आणि महिला उपस्थित होत्या. गावकरी आणि महिलांच्या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासनाला आता या अवैध धंद्यांविरुद्ध ठोस पावले उचलावी लागणार आहेत.

## भाजपा मुरुड मंडल नूतन पदाधिकाऱ्यांना आ. कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** भारतीय जनता पार्टी मुरुड मंडलातील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. मुरुड शहराध्यक्ष पदाची जबाबदारी महेश कणसे यांच्यावर देण्यात आली असून सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

भारतीय जनता पार्टी मुरुड मंडल अध्यक्ष सुरज शिंदे यांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली ६१ जणांची कार्यकारिणी केली असून या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना रविवारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वितरण करण्यात आले यावेळी भाजपाचे मंडलाध्यक्ष सुरज शिंदे, बन्सीभाऊ भिसे, प्रताप पाटील, साहेबराव मुळे यांच्यासह इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मुरुड मंडळ सरचिटणीस विश्र्वास कावळे, ॲड. धनराज शिंदे, उपाध्यक्ष राजाभाऊ वैद्य, दत्ता सप्ताळ, बालाजी नाईकवाडे, वैजनाथ हर-ळे, रमेश शिंदे, रमाकांत गायकवाड, चिटणीस - गोविंद मुंडे, दीपक मगर, किशोर घुटे, सुखदेव बर्डे, लहूराजे सव्वाशे, श्रीकांत झाडके, बाळासा-हेब देशमुख, कोषाध्यक्ष प्रशांत साखरे यांच्यासह कार्यकारणीतील सदस्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

मुरुड शहराध्यक्ष महेश कणसे, मुरुड मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष किरण मुंडे, सरचिटणीस आकाश करदुरे, महिला मोर्चा अध्यक्ष जनाबाई साखरे, एससी मोर्चा अध्यक्ष श्रीराम आदमाने, सरचिटणीस गौतम राऊत, ओबीसी मोर्चा अध्यक्ष किशोर सुडके, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष अल्ताफ तांबोळी, सोशल मीडिया अध्यक्ष बालाजी गवळी, संयोजक विशाल मगर, किसान मोर्चा अध्यक्ष संजय सूर्यवंशी यांनाही आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

सर्व नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी पक्ष संघटना मजबूत करण्याबरोबरच केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना सर्वसामान्य गरजू आणि पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचवाव्यात असे बोलून दाखवले. यावेळी भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सुरज शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

